मु. जे. महाविद्यालय, जळगाव

१९४५-९५

# ५०

# अजिंठा

नियतकालिक १९९५-९६

KNOWLEDGE IS POWER

# अजिंठा

## नियतकालिक

## १९९५-९६

### मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

संपादक

प्रा. नंदकुमार भारंबे

## संपादक मंडळ

प्राचार्य - डी. एस. नेमाडे

उपप्राचार्य -
प्रा. ए. बी. पाटील
प्रा. व्ही. जे. चौधरी
प्रा. पी. एल. कोल्हे

प्रा. नंदकुमार भारंबे
प्रा. डॉ. आर. टी. चौधरी
प्रा. डॉ. किसन पाटील
प्रा. डॉ. सौ. वासंती साळवेकर
प्रा. सौ. पी. बी. राणे
प्रा. सौ. सुजाता देशपांडे
प्रा. सौ. यु. एस. मानुधने.

**विद्यार्थी प्रतिनिधी**
किशोर कोल्हे
ऋषीकेश सकळकळे
कु. जयश्री झारे.




# संपादकीय,

बोलता बोलता आपल्या महाविद्यालयाचं सुवर्णमहोत्सवी वर्ष उजाडलं. आपल्या अजिंठा नियतकालिकाचा हा सुवर्णमयी ५० वा अंक आपल्या हाती देतांना मनोमन खूप आनंद होतोय्.

सन १९४५ साली खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या विद्यमाने आपल्या महाविद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली गेली. जशी जन्मदात्री माता तशीच आपली भावनिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जडणघडण करणारी दुसरी माता म्हणजे शिक्षण संस्था! या मातेच्या निर्मितीचा हा सुवर्णक्षण अनुभवायला मिळणारी आपली पिढी निश्चितच भाग्यशाली आहे. पुणे-मुंबईसारख्या वातावरणात शिकायला जाणाऱ्या खानदेशी विद्यार्थ्याला आपल्याच प्रदेशात उच्च शिक्षणाची संजीवनी देण्यासाठी निर्माण झालेली ही संस्था आज ज्या भरभराटीला पोहोचली आहे याचा आपणा सर्वांनाच सार्थ अभिमान वाटतो. नंतरच्या काळात टप्याटप्याने या शिक्षणसंस्थेत पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी आणि पदव्युत्तर विभाग, वाणिज्य विभाग, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, विधी महाविद्यालय, आय.टी.आय., एम.बी.ए. (आय.एम.आर.) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र अशा विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांची सुरूवात करण्यात आली. संस्थेच्या सुवर्णमयी आठवणींचा सुवर्णमहोत्सवी अंक पुढील शैक्षणिक वर्षात आपणास मिळू शकेल याचा आम्हास आनंद होत आहे.

अत्यंत मोजके विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्या प्रयत्नानं प्रारंभ झालेल्या या महाविद्यालयात आज चार हजार विद्यार्थी आणि १७५ तज्ञ प्राध्यापकांच्या सहकार्यानं अध्ययन-अध्यापनाचं कार्य सुरू आहे. कला शाखेत मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, संस्कृत, संरक्षणशास्त्र, अर्थशास्त्र या विषयातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहेत. विज्ञानशाखेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, भूगोल, गणित, संख्याशास्त्र, मायक्रोबायोलॉजी, संगणक, इलेक्ट्रॉनिक्स पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहेत. तसेच वाणिज्य विभागात पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सुविधा आहेत. विविध विभागातील संशोधनासाठी संशोधन विभाग कार्यरत असून त्यासाठी आवश्यक असे सुसज्ज ग्रंथालय असून एम्.फील., पी.एच.डी. च्या अभ्यासकांना त्याचा फायदा होत आहे. महाविद्यालयाची संख्यात्मक आणि गुणात्मक विकासाची ही वाटचाल निश्चितच विलोभनीय असून शिक्षणसंस्थेच्या ५० वर्षापूर्वी लावलेल्या इवल्याशा रोपट्याचा जो महावृक्ष बहरलेला आहे त्याचेच हे सार्थ प्रतीक आहे.

विद्यार्थी हा केवळ परीक्षार्थी असू नये, त्याचा बौध्दिक तसेच शारिरिक, सांस्कृतिक असा सर्वांगिण विकास व्हावा या उद्देशानं विविध शैक्षणिक आणि अभ्यासेतर उपक्रमांची सातत्यानं आखणी करून या शिक्षण संस्थेनं शिक्षणक्षेत्रात आणि परिसरात आज मौलिक असा नावलौकिक कमावलेला आहे. त्या दृष्टीनं आमचा 'अजिंठा' नियतकालिकाचा उपक्रम गेली पन्नास वर्षे सातत्यानं विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि सुप्तशक्तीला योग्य संधी देऊन जोपासण्याचे कार्य करीत आहे. विद्यार्थ्यांच्या सृजनशील काव्यवृत्तीला फुंकर घालून त्यांच्यातील प्रतिभाशाली नवलेखकाला जोपासत आहे. त्यांच्या अनुभवनिष्ठ आणि आत्मनिष्ठ लेखनाच्या दृष्टीने या अंकात खुले आर्थिक धोरण, एन्रॉन प्रकल्प, भ्रष्टाचार, प्रेम आणि युवापिढीच्या मनाचे हुंकार इत्यादि विषयावरील लेखन/काव्य निश्चितच त्यांच्या संवेदनशील मनाचे प्रतिबिंब आहे. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रात त्यांनी मिळवलेल्या यशाला, त्यांच्या कार्यकर्तृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी 'अजिंठा' ही एक महाविद्यालयीन चळवळ म्हणून सुवर्णमयी क्षणांचा आस्वाद घेण्यास सज्ज झाली आहे. या आनंदमय क्षणी कुठे तरी दृढविश्वास निर्माण होतो आणि आठवणींचे पक्षी वर्तमानात झेपावत राहतात पुढील ओळींच्या गुंजारवाच्या आवाजात -

''इवलीशी आहे ज्योत
तेवत या काळोखात
तिमिरांचा करी नाश
पसरी मंद प्रकाश''

– प्रा. नंदकुमार भारंबे

# अनुक्रम


- मराठी विभाग
- संस्कृत विभाग
- हिन्दी विभाग
- इंग्रजी विभाग
- महाविद्यालय वार्ता : अहवाल
- महाविद्यालय वार्ता : प्राध्यापकांचे विशेष कार्य
- विविध पारितोषिके/शिष्यवृत्ती




## श्रध्दांजली



स्व. अप्पासाहेब प्रभाकर रामदास पाटील

उपाध्यक्ष के.सी.ई. सोसायटी, जळगांव.

# ‘आम्ही’

**कु. प्राची रमेश मुजुमदार**
प्रथम वर्ष, कला

‘बालपण गेले अन् तारूण्य नासले’ ह्या सुरेश वाडकरांच्या स्वरांत भिजलेल्या ओळी ऐकल्या, की मन शतश: विदीर्ण होतं. त्यातल्या त्यात ‘तारूण्य नासले’ ह्या ओळी तर मन विषण्ण करणाऱ्या वाटतात का म्हणून आम्ही असे कलंकित? खरं तर जीवनाच्या सगळ्या अवस्थांमध्ये माझी अवस्था सर्वात महत्त्वाची! निरागस, निष्पाप, निर्भेळ अन् खेळण्या बागडण्याच्या वयात सगळ्यांना ओढ लागते ती फक्त माझीच! अन् ते निखळपणानं खळाळणारं बाल्य सरता सरताच मदनाच्या पुष्परातून माझा प्रवेश होतो. आणि माझा प्रवेश होताच तुम्हा सर्वात आमूलाग्र बदल होतात. खरं तर हे सगळं निसर्ग- नियमानं मीच घडवतो, तरी मलाच का वाईट म्हटलं जातं? ‘तरूण पिढी वाया गेली आहे’ किंवा ‘आजचे तरूण दिशाहीन झाले आहेत’ किंवा ‘ये जवानी है दिवानी’ अशा ही शब्दात माझी हेटाळणी होते. माझ्या उपस्थितीत मुलं-मुली अविवेकानं अविचारानं वागतात, त्यांचं पाऊल घसरतं असं म्हटलं जातं एका रसिक शाहीराने तर ‘सोळावं वरीस धोक्याचं’ म्हणून--- माझ्यावर लाल दिव्याचं शिक्का मोर्तब केलंय! पण हे जे सर्व माझ्याबाबतीत बोललं जातं. ह्यात तथ्यांश नाहीय हे--- सांगण्यासाठीच मी इथे आज आलोय! किंवा आलेय! हो! दोघांचाही रोष नको म्हणून मी आपला मधल्या अवस्थेत राहातो म्हणून तर तुम्ही मला ‘ते’ म्हणून संबोधता. तर, माझ्याबद्दल बोललं जातं ते सर्वच दृष्टीनं चूक आहे. माझ्या उपस्थितीत मुलांची पावलं वाकडी पडतात. पण ह्यामागे केवळ मीच कारण आहे कां? ह्याचा दोष मलाच कां? घरातलं वातावरण, संस्कार, आई-वडीलांच्या प्रेमाचा अभाव, आई--- वडीलांची दोघांची नोकरी असल्याने, मुलांना त्यांचा, मिळत असलेला अपुरा सहवास, ह्या सगळ्यांमुळे निराश होवून ते मार्ग शोधायला सुरूवात करतात. तेव्हा त्यांना प्रथम मीच भेटतो. आणि मग जगाला दिसतं, 'आजची तरूण पिढी वाया गेलीय' पण मी एकटा ह्याला मुळीचं जबाबदार नाही. मुलांची बौध्दिक शारिरीक कुवत न जाणून घेता, आई वडील त्यांच्या काळात त्यांची अपूर्ण राहिलेली इच्छा अन् महत्त्वाकांक्षा आपल्या मुलांवर लादतात. त्यांना मोठे-मोठे अभ्यासक्रम देतात. आणि मुलांना हे शिक्षण मनाजोगते किंवा आवडीचे नसल्याने मग अपयश येते. अन् मग अशी मुलं व्यसनाधीन होतात. अशा व्यसनाधीन अन् दिशाहीनांना त्यांच्या मार्गाच्या वळणा-वळणावर आमचीच स्टेशनं लागतात मग तिथं आमची काय चूक? ''युवावस्थेमाजी मदन-खल हा व्याकुळ करी। सदा चित्ती चिंती विविध युवनी रूपलहरी।'' असं सुध्दा माझ्या बाबतीत बोललं जातं.

एवढं मात्र खरं की रती आणि मदन आमचे घरोब्याचे! पण म्हणून आम्ही त्यांचा सगळ्यांवर प्रभाव पाडू, असं नाही हं!..... आता तुमचे विवेकानंदच बघा नां--- आमचे लाख प्रयत्न झाले, पण आम्ही त्यांच्या अणूरेणूतुन वसत असूनही, आमचे प्रयत्न निष्फळ ठरले. आम्ही निष्प्रभ झालो. म्हणून तर आम्ही सांगतो की, आम्हाला फक्त दोष देऊ नका, तर त्या मागचं खरं कारण जाणून घ्या, आमच्याप्रमाणे, समाजात असे इतर अनेक घटक आहेत की जे, तरूणांना बिघडवायला कारण आहेत.

प्रेम! ह्या अडीच-अक्षरी मखमली शब्दाचा अर्थ समजावून घेण्याची आमची अवस्था! शेवटी जीवन म्हणजे काय? प्रेमच नाही कां? तुमच्या इंग्रजीत एक म्हण आहे---- ‘Health is wealth’, पण मी मात्र म्हणेन की--- ‘Youth is wealth’ मला वाटतं आत्तापर्यंत आपण मला ओळखलं असेल नाही कां?

ओळखायलाच हवं! कारण तुमच्याच आतून तर आम्ही बोलतोय!

‘तुमचं तारूण्य! तुमची युवावस्था!!’

★★★

# स्वामी विवेकानंदांचे शिक्षणविषयक विचार

**महेश गोरडे**
द्वितीय वर्ष (वाणिज्य)

मित्रांनो, शिक्षण हा तुम्हा आम्हा सर्वांच्याच जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. शाळा-कॉलेजमध्ये आपल्याला जे मिळते तेच फक्त शिक्षण नव्हे. जन्मल्यापासून तर जीवनाच्या अंतापर्यंत माणूस शिकतच असतो. प्रत्येक घटना, प्रत्येक प्रसंगातून काहीनाकाही घेत असतो. आपण विद्यार्थी आहोत. देशाचे उद्याचे आधारस्तंभ आहोत. अनादीकाळापासून 'ज्ञानभूमी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशाचे आपण संतान आहोत. त्यांच्यासाठीच स्वामी विवेकानंदांनी शिक्षणाबद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत.

ते म्हणतात, ''शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण. ज्ञान माणसाच्या आतच वसत असते. कोणतेच ज्ञान बाहेरून येत नाही. माणसाला ज्ञान होते याचा अगदी काटेकोर मानसशास्त्राच्या भाषेत अर्थ हा की तो 'आवरण' दूर करतो. गुरूत्वाकर्षणाचा नियम न्यूटनने शोधून काढला असे आपण म्हणतो. तो नियम काय एखाद्या कोपऱ्यात त्याची वाट पहात बसला होता? तो होता त्याच्या मनातच. योग्य काली त्याची जाणीव झाली एवढेच. साऱ्या विश्वाचे अनंत ग्रंथभांडार तुमच्या मनातच आहे. बाह्य जग म्हणजे तुमच्याच मनाचे तुम्हाला अध्ययन करायला लावणारे एक निमित्त- केवळ एक संधी होय. राईच्या अगदी एक अष्टमांश कणा एवढ्याही नसणाऱ्या अत्यंत लहान बीजात एकरचे एकर व्यापून टाकणारा संपूर्ण वटवृक्ष सामावलेला असतो. मनुष्याच्या आत्म्यातही अशीच अनंत शक्ती अव्यक्त आहे. मग त्याला तिची जाणीव असो वा नसो.''

एखाद्या रोपट्याला तुम्ही जसे वाढ म्हणू शकत नाही तसेच कुणाही मनाला तुम्ही शिकवू शकत नाही. ते आपल्या स्वाभाविक वाढीनेच वाढते. आपण फक्त मदत करू शकतो. जमीन विसविशीत करा. कुंपण वगैरे घालून ते रोपटे दगावणार नाही याची काळजी घ्या, पाणी, माती, हवा इत्यादी आवश्यक गोष्टीच फक्त तुम्ही त्याला देऊ शकता आणि येथेच तुमचे काम संपते. त्याला लागणाऱ्या साऱ्या गोष्टी ते आपोआप घेईल व आपल्या प्रकृतीनुसार वाढेल. हीच गोष्ट मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीतही लागू होते.

आज शिक्षणाची व्याख्या आपण फारच संकुचित करून ठेवली आहे त्याबद्दल स्वामी विवेकानंदांचे पुढील विचार फारच प्रभावी वाटतात. ''शिक्षण म्हणजे जन्मात कधी पचनी न पडणारे, डोक्यात निरंतर धुडगूस घालणारे आणि आपल्या मेंदूत ठासून कोंबलेले माहितीचे भेंडोळे नव्हे. आपल्याला आवश्यकता आहे जीवन सुसंघटीत करणाऱ्या, 'माणूस' घडविणाऱ्या विचारांची. तुम्ही असे फक्त पाचच विचार जर अगदी आत्मसात केले असतील, ते जर आपल्या जीवनात, चारित्र्यात उतरविले असतील तर सारा ग्रंथसंग्रह रटून, कोळून पिऊन टाकणाऱ्या माणसापेक्षा खासच तुम्ही अधिक सुशिक्षित आहात. शिक्षणाचा अर्थ नुसता माहितीचा संग्रह असाच जर असता तर मग ग्रंथसंग्रहालये जगातील सर्वात मोठे साधू व ज्ञानकोश सर्वात मोठे ऋषी ठरले असते.''

काही पदव्या पदरात पडल्यावर आपल्याला वाटते बस्सं! झाले आपले शिक्षण! आता पैसे मिळविण्याच्या मार्गाला लागावे व आपण तसे करतोही. आपल्या शिक्षणाचा आपण स्वतःसाठीच उपयोग करतो पण त्यावेळी आपल्याला आपल्याच बांधवांची जाणीव असते कां? त्याच्यासाठीही आपला काही उपयोग व्हावा असे आपल्याला वाटते कां? त्याच्यासाठीही आपला काही उपयोग व्हावा असे आपल्याला वाटते कां? याबद्दल स्वामी विवेकानंद म्हणतात, ''परक्या भाषेत दुसऱ्यांचे विचार रटून, ते डोक्यात कसे तरी कोंबून आणि त्यांच्या बळावर विद्यापीठाच्या चार-दोन पदव्या मिळवून तुम्ही स्वतःला सुशिक्षित समजत असता. डोळे उघडून जरा पहा- आपल्या ह्या धनधान्य समृध्दतेसाठी विख्यात असणाऱ्या सुवर्ण भूमीत दोन घास अन्नासाठीच कितीतरी करूणार्त किंकाळ्या उठतांना तुम्हाला ऐकू येतील! काय, तुमचे शिक्षण हे तुमचे दैन्य निवारण करू शकेल? जे शिक्षण चारित्र्यबल निर्माण करू



शकत नाही, जे शिक्षण सिंहपराक्रम उद्दीप्त करू शकत नाही ते शिक्षण काय शिक्षण ह्या संज्ञेला पात्र आहे?''

जे भारतीय तेच फक्त चांगलं व जे परकीय ते सगळं वाईट असा स्वामी विवेकानंदांचा आग्रह नव्हता. आपल्यातील सार अबाधित राखून इतरांमधील जे चांगलं ते सर्व स्विकारण्याविषयी त्यांचा अट्टाहास होता. ते म्हणतात, ''भारतीय शिक्षणाबरोबरच आपल्याला आवश्यकता आहे इंग्रजी भाषेची व पाश्चात्य विज्ञानाची; आपल्याला यांत्रिक विद्येची तसेच इतर अशा सर्व गोष्टींची गरज आहे की ज्यायोगे उद्योग धंद्यांची वाढ होईल व माणूस नोकरीच्या मागे न लागता आपली उपजीविका करू शकेल आणि आपल्या आपत्तींना तोंड देण्यास समर्थ होईल.''

शिक्षणाच्या एकमेव पध्दतीबद्दल ते म्हणतात, ''ज्ञानसाधनेची अगदी एकमेव रीत म्हटली म्हणजे एकाग्रता. शिक्षणाचे सार म्हणजे एकाग्रता. उच्चतम योग्यापासून तो अत्यंत निष्कृष्ट माणसापर्यंत सर्वांना ज्ञानप्राप्तीसाठी या एकाच रीतीचा अवलंब करावा लागतो. एखादा खगोलशास्त्रज्ञ आपल्या मनाच्या साऱ्या शक्ती एकाग्र करून दूरदर्शक यंत्रातून एखाद्या लक्षावर केंद्रीत करतो- लागलीच ग्रह नक्षत्रांच्या ज्योतिर्मय मालिका त्याच्यासमोर नाचू लागून आपली सारी रहस्ये त्याला प्रकट करून दाखवितात. खुर्चीवर बसून विचार करणारा प्राध्यापक, पुस्तक घेऊन अभ्यास करणारा विद्यार्थी किंवा ज्ञानप्रात्यर्थ झटणारा इतर कोणीही घेतला तरी सर्वत्र आपणाला ही एकच रीत अनुसरलेली आढळून येईल. हा एकच मंत्र, ही एकच गुरूकिल्ली आहे की जिच्या योगे निसर्गाची कपाटे उघडून प्रकाशाचे झोतचे झोत दिसू लागतात. एकाग्रतेबद्दल स्वामीजी पुढे म्हणतात की, ''शिकण्याची जर पुन्हा संधी मिळेल तर नुसत्या घटनांकडे मी मुळीच लक्ष देणार नाही. हव्या त्या गोष्टीवर मन एकाग्र करण्याची आणि हव्या त्या गोष्टीपासून मनाला अलग ठेवण्याची माझी शक्ती मी प्रथम वाढवीन आणि त्या संपूर्ण कार्यक्षम साधनाच्या साहाय्याने स्वेच्छेनुसार घटनांचा संग्रह करीत राहीन.''

ज्ञानप्राप्तीच्या साधनांबद्दल ते म्हणतात, ''आपल्या जीवनामधील फार मोठी चूक जर कोणती असेल तर ती ही की आपण ध्येयाकडे इतके आकर्षिले जातो, ते आपल्याला इतके मोहक वाटते, आपल्या मनावर त्याचा इतका प्रभाव पडतो की ते प्राप्त करून घेण्याच्या साधनांच्या तपशिलाकडे आपले दुर्लक्ष होते. मला असे वाटते की साध्याइतकेच साधनांकडे लक्ष देणे ह्या एकाच तत्वात सर्व शिक्षणाच्या यशाचे रहस्य सामावलेले आहे.''

'पुर्वज आणि वंशज यांच्यात असणाऱ्या संबंधाप्रमाणे गुरू आणि शिष्य यांचा संबंध असतो. शिष्याच्या हृदयात गुरूबद्दल श्रध्दा, ज्ञानोपार्जनांची खरी तृष्णा असल्याशिवाय शिष्याची कशातही प्रगती होणे शक्य नाही. ज्या देशात या संबंधाकडे दुर्लक्ष केले जाते. त्या देशात शिक्षक म्हणजे आपल्या पगाराकडे दृष्टी ठेवून व्याख्यान झोडणारा व्याख्याता, विद्यार्थी म्हणजे ती माहिती डोक्यात कोंबून घेणारा श्रोता, आणि दोघेही म्हणजे शेवटी आपापल्या मार्गाने जाणारे इसम अशी स्थिती निर्माण झाली आहे. गुरूची ईश्वर म्हणून पुजा करा, पण त्याचे अंधानुकरण करू नका. त्यांच्यावर शक्य तितके प्रेम करा, पण स्वतः विचार करण्यासही विसरू नका.

आपण चुका करतो कारण आपण दुर्बल आहोत, आणि आपण दुर्बल आहोत कारण आपण अज्ञानी आहोत. आपल्याला अज्ञानी कोण करते? आपणच आपल्याच हातांनी डोळे झाकून आपण आक्रंदू लागतो की चहूबाजूला अंधार पसरलेला आहे. हात बाजूला सारून पाहा की सर्वत्र उजेडच पसरलेला दिसेल. आपल्या इच्छाशक्तीचा सतत उपयोगच तुम्हाला उन्नतीपथावर अग्रेसर करील. हातून काही चूका घडल्या म्हणून घरी जाऊन अंगाला राख फासून रडत बसण्यात काहीच लाभ नाही. त्यामुळे तुम्ही आणखी दुर्बल मात्र व्हाल. ही खोली हजारो वर्षांपासून अंधाराने व्यापली आहे असे म्हणून रडून तुम्ही आकांत मांडाल तर हा अंधार नाहिसा होईल काय? आगपेटीची एक काडी ओढा, एका क्षणात ती सारी खोली उजळून जाईल. 'अरेरे, मी दुष्कृत्य केले, कितीतरी चुका केल्या' असा विलाप सारा जन्मभर करीत बसण्यात काय लाभ? हे सारे तर आहेच आहे, ते सांगावयास कुणाचीही गरज नाही. गरज आहे ज्ञानाच्या प्रकाशाची. तो येऊ द्या की एका क्षणात सारे अमंगल दूर पळून जाईल. स्वरूप प्रकट होऊ द्या आणि इतरही प्रत्येकात त्याचेच आवाहन करा.'

"शिक्षणाचे ध्येय 'माणूस' निर्माण करणे असले पाहिजे. शिक्षणाचा उद्देश आहे माणासांला विकसित होण्याला साहाय्य करणे. ज्या वळणामुळे इच्छाशक्तीचा प्रवाह आणि अविष्कार आपल्या स्वत:च्या नियंत्रणाखाली येऊन सुफलित होतो त्यालाच 'शिक्षण' म्हणतात. आज आपल्या देशाला लोखंडी स्नायुंची व पोलादी नसांची गरज आहे; आज आवश्यकता आहे या विश्याच्या गूढांचा व रहस्यांचा भेद करण्या, वाटेल त्या रीतीने आपले इष्ट साध्य करून घेणाऱ्या, वेळी गरज पडल्यास अगाध समुद्राच्या तळाशी जाऊन मृत्यूशी मुकाबला करणाऱ्या व जिला कोणीही रोधू शकणार नाही अशा दुर्दम्य इच्छाशक्तीची. 'माणूस' घडविणारा धर्म आपल्या हवा आहे. 'माणूस' निर्माण करणारे सिध्दांत आपल्याला हवे आहेत. सर्व तऱ्हांनी 'माणूस' निर्माण करणारे शिक्षण आपल्याला हवे आहे."

★★★

# 'निरोपाच्या वेळी'

- कु. प्राची मुजुमदार
प्रथम वर्ष (कला)

निरोपाच्या वेळी
असे गुंतवायचे नाहीत हातात हात
स्पर्श फक्त सांभाळायचा
रेशमी, मखमली, मृदू हृदयात!
निरोपाच्या वेळी असे मोजायचे
नाहीत भूतकाळातले क्षण!
धुवून स्वच्छ ठेवायचे
झाले-गेलेले व्रण
निरोपाच्या वेळी
असे थांबवायचं नाही एकमेकांना
वाटेवर अंथरायचं
जवळच्या सुंदर, सुगंधी फुलांना!
निरोपाच्या वेळी, अश्या आठवायच्या
नाहीत कटू आठवणी,
आठवायचे ते फक्त
गोड-सुगंधी क्षण!
निरोपाच्या वेळी फक्त एक करायचं!
समोरच्याच्या डोळ्यातलं पाणी
आपल्या डोळ्यात घ्यायचं!!

# "जरा सबुरीने घे"

- प्रज्ञाशील तायडे
द्वितीय वर्ष (कला)

हे मृत्यो,
जरा सबुरीने घे.

तू आलास, स्वागत असो तुझं!
पण, उंबरठ्या बाहेरच
तुला तिष्ठत रहावं लागेल
ही पुर्वसुचनाच समज.
मागं कधी तरी आलास तू 'कॅन्सर' बनून,
आणि अश्वत्थामाची चिरंतर तीव्र सणक
ओरबाडून गेलास;
आमच्या रक्ताच्या सुतास हिरावून!
पण, आता ध्यानी ठेव,
मानवातील शास्त्रज्ञांनी
'शेर-ए-म्हैसूर' समशेर उगारलीय
तुझ्या काळ्या कभिन्न राज्या विरूध्द!

हे मृत्यो,
जरा सबुरीने घे.



# "अंधश्रध्दा आणि मानव"

ललिता ठोंबरे
द्वितीय वर्ष (कला)

माणसे अपूर्ण असतात आणि मानवी मनातल्या श्रध्दा, प्रेम यांची देखील पूर्तता कधीच होत नाही. आईवडिलांचे जरी मुलावर उत्कृष्ट प्रेम असले तरी त्या प्रेमाला अज्ञानाच्या, अविचाराच्या मर्यादा पडलेल्या असतात. असेच आपल्या सर्वांचे आहे. एखादी वास्तव गोष्ट मानवी ज्ञानशक्ती पलिकडे. आहे असे सत्य भासू लागते, तेव्हा ती भासू लागते अंधश्रध्दा!

मुळात अंधश्रध्दा निर्माण होण्याचं कारण त्याच्या पराधिन तेज लपलेलं आहे. यश किंवा अपयश संपूर्ण स्वत:च नसून त्याला काही कारण आहे. समाजातील वंशपरंपरागत रूढी, परंपरा, चालिरीती, दैववादी वृत्ती, वैचारिक अपात्रता, श्रध्देचे स्थान, भयगंड, तत्वहीन आणि आधारशून्य समजूती, अशा अनेक कारणांनी अंधश्रध्दा निर्माण झाल्या.

आजच्या यंत्रयुगात अंधश्रध्देचा जबरजस्त पगडा आहे. आपण म्हणतो की मांजर आडवे जाण्याने काम होत नाही! पण सगळ्यांना तोच अनुभव आजपर्यंत आला आहे कां? दिवसा काही कामे झाली नाही की आपण म्हणतो, सकाळी सकाळी कुणाच अशुभ तोंड पाहिलं कुणास ठाऊक! आता इथेच पहा कुणाचे तोंड पाहीलं ती व्यक्ती चांगली का वाईट हेही माहिती नसतं. खरंतर कार्याच स्वरूप आणि साधनांची उपलब्धता इ. वर यशापयश अवलंबून असते. साप चावलेल्या मांत्रिकाकडे नेणे, देवाला नवस करणे, नशीबावर अवलंबून राहणे, चमत्कार, करणी, भानामती, भुते-खेते हे त्यातीलच खुळे प्रकार! पण हीच अंधश्रध्दा पुढे भयानक वळण घेते.

कुठल्याही सुजाण माणसाच्या अंगावर शहारे आणेल असं 'मानवत' प्रकरण या विज्ञान युगात घडू शकतयं ही गोष्ट काय दर्शवते? अमावस्येच्या दिवशी स्त्रियांनी केस सोडून फिरू नये इथपासून ते भूतबाधा झालेल्यांचे भूत उतरविणे इथपर्यंत! दक्षिणेकडे पाय करून झोपू नये. तिकडे यमाचे राज्य असते. मृत्यू येतो, असे आपले पुर्वज प्राचीन वेदात सांगतात. परंतु यासारख्या अंधश्रध्दा या विज्ञानाच्या अढळ बरूजावर उभ्या आहेत हा शोध आज नवीन लागला आहे. शरीरातील इंद्रियांच्या संबंधावर ही अंधश्रध्दा निर्माण झाली आहे.

पण आज एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर मानवाचे पाऊल पडणार आहे---- छे! छे! तो ओलांडणारही आहे. मग या खुळ्या, अविचारी, पुरातन, समजुतीवर आपण किती विश्वास ठेवायचा? वैज्ञानिक प्रगतीमुळे वास्तवात आलेली भौतिक सुखे एका पारड्यात तर दुसऱ्या पारड्यात अंधश्रध्दा आता नेमकी कोणत्या पारड्यातील वस्तू घ्यावी हे मानवाने स्वत:च्या बुध्दीने ठरवायला हवे. आजच्या गतीशील विज्ञान युगात आपले स्थान टिकवायचे असेल तर अज्ञान आणि अंधश्रध्देची बिनाकामाची रोपटी तोडून टाकून त्या ठिकाणी विज्ञानाचे बी पेरणे आवश्यक आहे. फक्त बी पेरून उपयोग नाही तर त्या रोपट्याला शिक्षण, वैज्ञानिक दृष्टीकोन इ. चं खतपाणी घालून त्याचं मजबूत झाडात रूपांतर करण्याची गरज आहे.

अंधश्रध्दा निर्मुलनासाठी प्रयत्न आताच नाही तर यापुर्वी देखील झालेले आहेत. आपल्या भारतीय समाजालाच अंधश्रध्देचा असाध्य रोग जडलेला आहे असे नाही तर दोन चारशे वर्षापूर्वी जगभर या राक्षसाने थैमान घातले होते. परंतु पाश्चिमात्य राष्ट्रात समाज मनावर क्रांत्या व उठाव याचा परिणाम झाला. ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या, नव्या जाणीवा निर्माण झाल्या, गॅलिलिओ, न्यूटन आणि ॲरिस्टॉटल सारख्या शास्त्रज्ञांनी; तत्वज्ञान, विज्ञान, खगोलशास्त्र इ. क्षेत्रात लावलेल्या विविध शोधांनी वैज्ञानिक दृष्टीकोन रूजण्यास मदत झाली आणि जीवनाकडे पाहण्याची नवीन दृष्टी तयार झाली.

भारतात मात्र 'धर्म' नावाचा बागुलबोवा, जातीपाती, तसेच अनेक फालतू कर्मकांड यातच माणूस अडकून राहिला. शिक्षण हा त्यावरील उपाय आहे शिक्षणाबरोबरच वैज्ञानिक

दृष्टीकोन समजून घेणे आवश्यक आहे. समाजात शिकलेली (विशेष: वैज्ञानिक दृष्टीकोण समजून घेतील असे) लोक अंधश्रध्देच्या आहारी जातांना दिसून येतात. परंपरा, कर्तव्य आणि सामाजिक भीती इ. च्या नावाने त्यावर पांघरूण घालण्यात येते. कधी-कधी तर हे अज्ञान निरपधांच्या मृत्युलाही कारणीभूत ठरतं. जसा गुप्तधनासाठी कुमारिकेचा बळी! म्हणूनच 'लोकशिक्षण' व 'जनजागृती' या दोन विकासाच्या साधनांची कास धरूनच व विज्ञानाच्या कसोटीवर घासून घेतलेले, मनाला पटतील तेच विचार अनुसरले तर एकविसाव्या शतकाची रम्य, निरभ्र पहाट उगवू शकेल अनं मानवतेने पांघरलेला हा अंधश्रध्दांचा बुरखा आपोआप गळून पडेल!

★★★

## मी मन्हाच भौते फिरी न्हास

कु. संगिता रामदास साळुंखे
अर्थशास्त्र पदव्युत्तर (प्रथम)

फेरजोतरी भरेल भासेत धरमा
म्हन चित लागत नाही
काय करवो कस न्हावो
काही बी समजत नाही

दोन पोरे झायात म्हणत
आते फिटीण म्हणी काया
हाई समज मा न्हाना पोऱ्या
दहा वरीसना झाया

कितनाबी चांगला सैपाक करो
सासराले आवडत नही
बागेचकणी नंणद म्हणस
इले सैपाक जमत नाही.

आपू कितलबी काही करो
मरो म्हालेच येडी म्हणतस
मन म्हण कोल्हे सांगतस नही
त्यासले पटीन तस करतस

सासु, सासरा, देर, जेठ
सगळा खाईलेतस घुमकाई
बघुनामा डूकी देखो ते
खल्लन बी उरत नही

कितल्याबी भाकरी घडवो
घट्या दिनभर फिरी न्हास
मरो इचार करी देखो ते
मी म्हनाच भौते फिरी न्हास

कितला दाव यासले सांग
आपू वाला निघी जाऊ
यासना डोकामा राख घुसेल
मीच येडी झाऊ



# एन्रॉन - एक वादळ!

कु. रुपाली विनायक कुलकर्णी
प्रथम वर्ष (कला)

एकविसाव्या शतकाकडे वेगाने वाटचाल करणाऱ्या भारतात औद्योगिकरणाच्या बाबतीत सर्वात प्रगत असणारे राज्य म्हणजे महाराष्ट्र राज्य! भारताच्या आर्थिक राजधानीला म्हणजेच मुंबईला सामावून घेऊन भारताला आर्थिक आधार देणारे महाराष्ट्र राज्य विविध कारणांनी गाजत आहे. विविध घटनांची वादळे या राज्यात उठतात आणि शमतातही असेच एक वादळ संपूर्ण भारताचेच नव्हे तर संपूर्ण जगाचे लक्ष महाराष्ट्राकडे वेधून घ्यायला कारणीभूत ठरले. या वादळाचे नाव आहे, एन्रॉन!

महाराष्ट्रात तारापूर येथे अणुविद्युत निर्मिती केंद्र आहे. उरण आणि कोयना हे जलविद्युत प्रकल्प तर चंद्रपूर, तुर्भे, परळी येथे औष्णीक विद्युत निर्मिती केंद्र आहेत. महाराष्ट्राची वीजनिर्मितीची क्षमता वाढवण्याची गरज महाराष्ट्र सरकारला जाणवत आहे. कमाल वापराच्या काळात महाराष्ट्राला २०० मेगावॅट इतकी वीजटंचाई जाणवत आहे. महाराष्ट्राच्या वीजमंडळाकडे ३००० मेगावॅट वीजेची मागणी करणारे अर्ज प्रलंबित आहेत. केंद्रीय वीजमंडळाने जाहीर केलेल्या १४ व्या ऊर्जा आढाव्यानुसार वीजेची मागणी महाराष्ट्रात दरवर्षाला ८ टक्के या दराने वाढणार असून महाराष्ट्राला १९९९-२००० वर्षाअखेर ११२७२ किलोवॅट विजेची आवश्यकता पडणार आहे. उद्योगधंद्यांची आणि कृषीक्षेत्राची वाढीव उत्पादकता कायम राखण्यासाठी वीजनिर्मितीस वाढ करणे गरजेचे आहे. विजनिर्मितीचे अतिरिक्त ५००० मेगावॅटचे लक्ष तज्ञांना अपुरे वाटत आहे. ते साध्य करण्यासाठी २२००० कोटींची गुंतवणूक करावी लागणार होती. परंतु आठव्या योजनेचा सुधारीत आराखडा २३०००/- कोटी रूपयांचा आहे. म्हणजे विज निर्मितीचे साध्य पुर्ण करण्यासाठी सर्व विकासाची कामे थांबवावी लागली असती. तेव्हा अतिरीक्त क्षमता तातडीने निर्माण करण्यासाठी खाजगी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात वाव देणे आवश्यक होते. थोडक्यात म्हणजे महाराष्ट्र राज्याला विजेची तातडीने गरज होती.

ऑक्टोबर १९९१ मध्ये केंद्र सरकारने उर्जा निर्मिती क्षेत्र खाजगी गुंतवणूकीस खुले केले. त्यानंतर मे- जुन १९९२ मध्ये सरकारतर्फे तीन वरिष्ठ सचिव अमेरीका, युरोप येथील विदेशी गुंतवणूकदारांना आमंत्रीत करून आले. त्यानंतर १० जुन १९९२ ला केंद्रिय उर्जा सचिवांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अध्यक्षांना एन्रॉन कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांना किनारपट्टीवरील विद्युतनिर्मितीसाठी उपयुक्त जागा दाखवाव्या अशी विनंती केली. १५ जुन १९९२ ला पथकाने जागा बघितल्या आणि २० जुन १९९२ ला सहमती ज्ञानपत्रावर शिक्कामोर्तब झाले. अशारीतीने हा करार अतिशय जलद पार पाडण्यात आला. जागतिक बँकेने आणि केंद्रिय विद्युत प्राधिकरण (सी.ई.ए) यांनी सुध्दा या कराराला 'एकतर्फी व एकांगी' असा अभिप्राय (जुले १९९२ आणि २६ जुले १९९२ च्या पत्रांद्वारे व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने ८ डिसेंबर १९९३ ला एन्रॉन पॉवर कॉर्पोरेशन या अमेरीकन कंपनीशी विजेच्या खरेदीविषयक करार केला. १९५६ च्या कायद्यानुसार नोंदणी होऊन एन्रॉनच्या 'दाभोळ पॉवर कॉर्पोरेशन' या कंपनीची स्थापना झाली.

**प्रकल्पाचे ठिकाण :-**

रत्नागिरी जिल्हातील गुहागर तालुक्यात दाभोळ खाडीच्या दक्षिणेला अंजनवेल पठारावर प्रकल्प उभारला गेला. मार्च १९९४ पासुन प्रकल्प उभारणीचे काम सुरू झाले. अंजनवेल, रानवी आणि वेळपूर येथिल सुमारे ७५० हेक्टर जमीन प्रकल्पाखाली आणण्याची प्रक्रिया सुरु झाली. त्यासाठी एन्रॉनने ५० ते ७० हजार रुपये प्रतिहेक्टर हा भाव दिला.

परंतु ही जमीन खाजगी मालकीची होती. तिची किंमत मात्र सरकारी किंमती नुसारलावण्यात आली. पर्यायाने स्थानिक जनता नाराज झाली.

**प्रकल्पाचे स्वरूप :-**

हा प्रकल्प म्हणजे एक औष्णिक वीजनिर्मिती केंद्र असेल. हा प्रकल्प दोन टप्प्यात उभारला जाणार होता.

| | पहिला टप्पा | दुसरा टप्पा | एकुण |
|---|---|---|---|
| स्थापीत क्षमता | ६९५ मेगावॅट | १३२० मेगावॅट | २०१५ मेगावॅट |
| इंधन | आयात इंधन तेल | आयात द्रवीभूत गॅस | |
| भांडवली खर्च | ३००० कोटी रूपये | ६२०० कोटी रुपये | ९२०० कोटी रूपये |

२०१५ मेगावॅट क्षमतेच्या या प्रकल्पासाठी ९२०० कोटी रूपये खर्च अपेक्षीत आहे. त्यासाठी भारतीय औद्योगिक विकास बँक, अमेरीकेतील एक्झीम बँक, बँक ऑफ अमेरीका, डॉर्शका बँक यांनी अर्थसहाय्य पुरवले. मे १९९५ अखेर या प्रकल्पाच्या कामावर सहाशे कोटी रूपये खर्च झाले. यात देशातील १९ कंत्राटदारांना उपकंत्राटे देण्यात आली. तसेच दोन हजार कुशल-अकुशल कामगार या प्रकल्पावर काम करीत आहेत. त्यांच्यासाठी अमेरीकेतुन आणलेले घरांचे सांगाडे, चिपळुण गुहागार भागातील बंगले, तारांकित हॉटेल, वातानुकुलित गाड्या इ. पुरविण्यात आल्या आहेत.

प्रकल्पाचे एकुण स्वरुप अतिशय खर्चिक व महागडे दिसुन येते.

### कामाचे स्वरूप :-

या प्रकल्पाची मालकी दाभोळ पॉवर कंपनी (नोंदणी २३.४.१९९३) यांची आहे. ही तीन कंपन्यांच्या एकत्रित सहकार्यावर निर्माण झाली आहे.यात,

१) एन्रॉन कॉर्पोरेन यांनी प्रकल्पांच्या ८० टक्के भांडवल वाटा पुरवायचा असुन ते कंपनीचे मुख्य प्रर्वतक आहेत.

२) बेक्टेबल एंटरप्रायजेस् यांनी प्रकल्पाच्या १० टक्के भांडवल वाटा पुरवायचा असून प्रकल्प उभारणीची जबाबदारी यांचीच आहे.

३) जनरल इलेक्ट्रिक कंपनी यांनी प्रकल्पाच्या १० टक्के भांडवल वाटा पुरवायचा असून प्रकल्पाला संयत्रे व तांत्रीक मदत पुरवायची आहे.

हा करार दाभोळ पॉवर कंपनी आणि महाराष्ट्र राज्य वीज मंडळ यांच्यात झाला. हा करार नवे सरकार येई पर्यंत गोपनीय दस्त ऐवज होता. वास्तवात गोपनियता राखण्याचे ठोस कारण कोणीही देवू शकलेले नाही. हा करार २० वर्षे मुदतीचा होता आणि तो 'गोपनीय' म्हणून लपवून ठेवण्यात आला होता.

### करारातील वचननामा :-

या करारानुसार महाराष्ट्र राज्य वीज महामंडळाने दाभोळ कंपनीकडून ९० टक्के वीज विकत घेणे बंधनकारक होते. पावसाळ्यात ८६ टक्के आणि इतर वेळी ९२ टक्के वीज घेणे बंधनकारक होते. १९९७ पासून प्रत्यक्ष वीज निर्मिती सुरू होणार होती. वीजेचे दर करारात ठरवण्यात आले. हे दर डॉलरच्या दराप्रमाणे आणि चलन वाढीच्या दराप्रमाणे वाढणार होते. त्याचप्रमाणे खरेदी केलेल्या वीजेची बिले १५ दिवसात महाराष्ट्र वीज मंडळाने देणे सक्तीचे होते. तसे न झाल्यास ती रक्कम महाराष्ट्र राज्याने देण्याची प्रतिहमी दिली होती. एव्हढेच नव्हे तर कायदेशीर तंटा झाल्यास त्या बाबतचे कामकाज भारतातील न्यायालयात न चालता लंडन मधील न्यायालयात होईल हा सुध्दा कराराचा भाग होता.

करारनामा एन्रॉन कंपनीला अनुकुल तर महाराष्ट्राला प्रतिकुल ठरतो. कारण ज्यावेळी राज्याला वीजेची गरज कमी असेल त्यावेळी करारात नमूद केलेली ठराविक टक्के वीज घ्यावीच लागेल. याच वीजेचे दर डॉलर प्रमाणे बदलतील. या करारातील अटींवरुन असे दिसुन येते की एन्रॉन कंपनीला जणू महाराष्ट्र राज्याने कायम नफा देण्याचीच हमी दिलेली आहे. करार करतांना अतिशय घाई झाली होती. तसेच यात केंद्र सरकारने प्रतिहमी दिल्याने एन्रॉनला तोटा होण्याचे कारणच नाही. उलट महाराष्ट्र राज्य आणि केंद्र सरकार वचननाम्यामुळे अटी पुर्ण करण्यास बांधले गेले आहेत.

### एन्रॉन रद्द होण्याची पार्श्वभुमी :-

मार्च महिन्यात महाराष्ट्रात सरकार बदलले आणि या प्रकल्पाचे भवितव्य ही बदलले. या प्रकल्पाचा फेर विचार करुन निर्णय घेण्यासाठी उपमुख्यमंत्री श्री. गोपीनाथ मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली 'एन्रॉन आढावा समिती' स्थापन झाली. त्यातील सदस्य महसूलमंत्री श्री. सुधीर जोशी, उद्योग मंत्री, श्री. लीलाधर डाके, अर्थमंत्री कै. श्री. हशू अडवाणी हे होते. समर्थक आणि विरोधक यांच्यात साधक बाधक चर्चा होऊ लागली. गोपनीय म्हणून दडवलेला दस्त ऐवज बाहेर आणला गेला. सर्वपक्षीय 'एन्रॉन हटाओ कृती समिती' स्थापन झाली.'इंटक' ने शृंगारतळी येथे खास मेळावा घेऊन प्रकल्पाच्या विरोधात आंदोलनाचा



इशारा दिला होता. म्हाळगी समितीनेही आपल्या अहवालात विरोध दर्शवला. त्याच वेळी कॉंग्रेसकडून एन्रॉनचे समर्थन केले जात होते. परंतू समर्थनात कोणताही विशेष प्रभावी मुद्दा नव्हता. गुणांपेक्षा दोषच वरचढ होत होते.

### एन्रॉनचे अपयशी ठरलेले समर्थन :

१) हा प्रकल्प महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी आवश्यक होता. असे समर्थकांचे मत होते. परंतू ह्या करारातील जाचक अटी पाहता तो नाकारणे योग्यच होते.

२) यात वापरण्यात येणारे द्रवीभूत इंधन हे प्रदुषणमुक्त इंधन आहे. परंतू वास्तवात हे गोपनीय अहवालात दडवून ठेवले गेले.

३) कंपनीच्या कामकाजाला विरोध होऊन कामकाजाला विलंब झाला असता म्हणून कराराविषयी गुप्तता पाळली. वास्तविक पाहता या कराराविषयी गोपनीयता पाळण्याची गरज नव्हती. उलट जनमत तयार करून निर्णय घ्यायला हवा होता.

४) ठरलेल्या वेळात आणि ठरलेल्या भांडवलात प्रकल्प उभारण्याचे काम न झाल्यास एन्रॉन कंपनीने नुकसान भरपाई देण्याचे कबूल केले होते असे समर्थन एन्रॉनचे असले तरीही सरकारने १६ टक्के नफा डॉलरच्या रूपात देण्याचे मान्य केले होते. हा नफा २०१६ साली ५९ टक्के होणार होता. म्हणजेच एन्रॉनचा फायदा निश्चीत केला गेला होता.

### अखेर एन्रॉन रद्द-

३ ऑगस्ट १९९५ ला महाराष्ट्र सरकारने हा करार रद्द केला. हा करार रद्द करतांना सरकारने पुढील कारणे दिली.

१) स्पर्धात्मक निविदा न मागविणे
स्पर्धात्मक निविदा न मागवणे हे बेकायदेशीर नाही. परंतु सामाजिक संपत्तीचा विनियोग करतांना पारदर्शकतेसाठी स्पर्धात्मक निविदा मागविणे आवश्यक आहे.

२) व्यवहारातील गुप्ततेचे अवडंबर
या व्यवहारात गुप्ततेचे कोणतेही ठोस समर्थन करण्यात आले नाही. गुप्तता राखण्याची गरज नव्हती.

३) पर्यावरणाची काळजी घेतली नाही
उर्जा प्रकल्पामुळे समुद्राच्या पाण्याचे वाढते तापमान, त्याचा मत्स्यव्यवसायावर होणारा प्रतिकूल परीणाम, तसेच आंबा उत्पादनावर होणारा विपरीत परीणाम विचारात होऊन हा प्रकल्प रद्द केला.

४) प्रकल्पासाठी अवास्तव भांडवली खर्च
दर मेगावॅट मागे ४.४९ कोटी भांडवली खर्च असणार असा अंदाज होता. हा भांडवली खर्च इतर प्रकल्पांच्या तुलनेत जास्त आहे. उदाहरणार्थ गंधार (१९९४) प्रतिमेगावॅट साठी ३.६४ कोटी तर काथळगुटी (१९९५) प्रतिमेगावॅट ४.१५ कोटी खर्च आहे.

५) चढत्या क्रमाने वीजदरात वाढ
जरी उर्जेचा दर एका युनिटमागे रू. २.४० असला तरी रूपये, डॉलर आणि इंधन यांच्या किंमतीनुसार त्यात बदल (अर्थातच वाढ) होईल.

अशा प्रकारे अखेर एन्रॉन प्रकल्प रद्द झाला. या करारातील अनुकूलता आणि प्रतिकुलता लक्षात घेता, प्रतिकुलताच जास्त होती. करारातील अटी ह्या एकतर्फी होत्या. ह्या अटींमध्ये बदल करून त्यातील अनुकुलता प्रभावी करता आली असती. काहींच्या मते एन्रॉन प्रकल्प रद्द झाल्यामुळे भारताच्या मुक्त आर्थिक धोरणावर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल. परंतु अशी शंका चुकीची ठरते आहे. कारण बहूराष्ट्रीय कंपन्या भारताच्या मुक्त आर्थिक धोरणाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षिक होत आहेत. एकूणच ही शंका फोल ठरली.

महाराष्ट्राच्या युती सरकारने एन्रॉन कंपनीशी फेरवाटाघाटी करण्याचा निर्णय घेतला. त्यात प्रामुख्याने,

१) प्रकल्पाचा खर्च कमी करणे.

२) वीजेचा विक्रीदर कमी करणे.

३) प्रदूषण टाळणे.

ह्या अटी ठरवल्या गेल्या, प्रकल्पाचा खर्च १२०० ते १५०० कोटी रूपयांनी कमी करण्यास तसेच विजेचा दर १ रूपये ९० पैसे प्रती युनिटपर्यंत खाली आणण्याची तयारी एन्रॉन कंपनीने दर्शवली.

थोडक्यात करार दोन्ही पक्षांच्या विचारानंतर ठरवला आहे. महाराष्ट्राचा विकास आणि सामान्य जनतेचा कौल लक्षात घेऊन फेरवाटाघाटी करण्यात येतील. एन्रॉनचा अंतीम निर्णय काहीही होवो परंतु एकूणच एन्रॉनमुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्य जगभर गाजले. एन्रॉनचे हे वादळ काही काळांनी शमेल आणि पुन्हा शांतता निर्माण होईल. कदाचित त्यातुनच पुन्हा अशाच एखाद्या वादळाचा जन्म होईल.... ?

★★★

# 'मैत्री - एक अनमोल अनुभव'

सुधीर पितांबर राणे
प्रथम वर्ष (विज्ञान)

खरा मित्र हा मानवाच्या जीवनातील एक अमोल ठेवा आहे. अनेकदा या मित्रांबाबत आपली फसगत होते. 'असतील शिते तर जमतील भुते' या न्यायाने सुखाच्या काळात अनेक मित्र भोवताली जमतात, पण 'कठीण समय येता कोण कामास येतो' या न्यायाने ही जमलेली सर्व पाखरे संकटाच्या वेळी दूर उडून जातात. अशा वेळी जो आपल्या खांद्याला खांदा लावून उभा राहतो तोच खरा मित्र.

खऱ्या मैत्रीचा अनुभव हा एक अमोल ठेवा आहे त्याची बरोबरी कशाशीही होणार नाही. प्रत्यक्ष भगवंतालाही या अनमोल अनुभवाचे आकर्षण वाटले आणि कृष्णावतारात त्यांनी अर्जुनाला आपला 'सखा' मानला. या मैत्रीत कोणतीही गोष्ट आड येऊ शकत नाही. भगवंतांनी आपल्या सख्याचे सारथ्य सुध्दा केले.

शिवबाने बालपणी खेळतांना मावळ्यांना आपले मित्र बनविले या मावळ्यांनी आपल्या मित्रासाठी काही करावयाचे बाकी ठेवले नाही. येसाजी, तानाजी, बाजी या सारख्या मित्रांच्या सहवासात हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना शिवरायाला एक वेगळाच आनंद झाला असेल. या मित्रांनी शिवबाला वाटेल तो त्याग करण्याची तयारी दाखविली. त्यासाठी त्यांनी आपल्या प्राणाची सुध्दा बाजी लावली.

मानवी स्वभावाचे हे वैशिष्ट्य आहे की त्याला सुख-दुःख इतरांनाही वाटावे असे वाटते. आनंदाच्या क्षणी तो आपल्या मित्रांना बोलविती त्याचप्रमाणे दुःख हलके करण्यासाठी त्याला मित्राची गरज वाटत असते. म्हणूनच म्हटले जाते की, 'व्यसने मित्रपरीक्षा!'

मैत्रीची भावना एवढी थोर आहे की जात, पात, धर्म, पंथ यापैकी कोणीही तिला अडथळा करू शकत नाही. आजच्या काळात तर एकमेकांना न पाहीलेल्या दोन व्यक्ती सुध्दा एकमेकांशी मैत्री करू शकतात ही 'पत्रमैत्री' आजच्या काळाची विशेष देणगी आहे.

मानवी जीवनात मैत्री हा एक आनंद आहे, एक अनमोल अनुभव आहे. म्हणून मैत्री करा व मित्र वाढवा.

★★★

# 'मी'

सुधीर पंजाबराव केने
एम.ए. (अर्थशास्त्र) भाग २

भुमिवरती आहेस परिपूर्ण तू अवलंबून
नको करूस अहंकार 'मी' म्हणून
'मी' या शब्दाने नाही होत ध्येय पूर्ण
'मी' हाच शब्द आहे मुळी अपूर्ण
'मी' शिकविती अहंकार
नको करूस गर्व स्वतःवर
अहंकाराचा उपयोग तू न करशील
आणि जर 'मी' ला विसरशील
तर नक्कीच मिळवशील
प्रतिष्ठा तू समाजात
आणि हेच येईल तुझ्या उपयोगात
आयुष्य जगतांना....



# ''तेथे कर माझे जुळती''

कु. सोनाली दिनकर वराडे
द्वितीय वर्ष (कला), अर्थशास्त्र

खालील उतारा 'राग-बोध' या शास्त्रीय संगीतावरील पुस्तकांच्या आधारे घेण्यात आला आहे. ही पुस्तके लेखक- प्रा. बा. र. देवधर यांची असून प्रा. देवधर हे 'देवधर स्कूल ऑफ इंडियन म्यूझिक' येथे भूतपूर्व प्राचार्य होते. ही पुस्तके शास्त्रीय संगीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासास आहेत. या लेखात संगीत क्षेत्रातील दोन मान्यवर व्यक्तीचित्रे रेखाटली आहेत.

## संगीत-सम्राट तानसेन

इ.स. १५०० मधील गोष्ट. ग्वाल्हेर पासून सात मैलावरील 'बेहट' या गावात 'मकरंद पांडे' नावाचे सदाचारी ब्राह्मण गृहस्थ राहात होते. ते सुखवस्तू होते परंतु पुत्र प्राप्ती न झाल्यामुळे ते दुःखी होते. सर्व उपायानंतर ते ग्वाल्हेर च्या महंमद घौस नावाच्या फकीराचे दर्शन करण्यास गेले. फकीराने त्यांना मुलगा होईल असा आशिर्वाद दिला. मुलगा झाला तर तो फकीराच्या चरणी अर्पित करेल असे आनंदी झालेल्या मकरंद पांडे यांनी सांगितले. इ.स. १५३१-३२ मधे त्यांना एक मुलगा झाला. मकरंद पांडे यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्या मुलाचे नाव 'तन्नामिश्र' ठेवण्यात आले. तन्नामिश्र लहानपणापासूनच हुशार होता. लहानपणीच पशूपक्षांच्या आवाजाची हुबेहूब नक्कल तो करीत असे.

एक दिवस मधुरेचे संत व गायक ''हरिदास स्वामी'' आपल्या शिष्यांबरोबर गावाजवळून जात होते. इतक्यात त्यांनी सिंहाची गर्जना ऐकली. त्यांचे शिष्य घाबरले परंतु स्वामीजींनी त्यांना धीर दिला आणि सांगितले की, या वसाहतीत जंगली जनावर असणे असंभव आहे. त्यामुळे आपण स्वतः जाऊन कोण हा आवाज काढत आहे ते पाहू असे त्यांनी सुचविले. तन्नामिश्राला सिंहाची नक्कल करतांना पाहून स्वामी हरीदास प्रसन्न झाले. त्यांनी ओळखले की हा मुलगा पुढे अद्वितीय संगीततज्ञ होईल. त्याच्या वडीलांना समजावून स्वामी हरिदास तन्नामिश्र यास घेऊन मथुरेला निघाले.

तन्नामिश्रने स्वामींची मनोभावे सेवा केली आणि संगीताचे अगदी अत्यल्प काळातच ज्ञान प्राप्त केले. यानंतर पुढे मकरंद पांडे आपला मुलगा कुशलगायक झाला हे पाहून आनंदी झाले. परंतु त्यांना महंमद घौस यांना दिलेल्या वचनाची जाणीव होती. ते तन्नामिश्र यास घेऊन ग्वाल्हेरला गेले. तन्नामिश्रचे गाणे ऐकून फकीर प्रसन्न झाले. आणि प्रसाद म्हणून आपल्या तोंडातील पानाचा रस त्यांनी तन्नामिश्रच्या तोंडात टाकला. मुसलमानाचे उष्टे खाल्ल्यामुळे तन्नामिश्रने गुन्हा केला असे म्हटले गेले आणि म्हणून तन्नामिश्र यास मुसलमान व्हावे लागले. आणि तन्नामिश्रचे 'तानसेन' असे नामकरण करण्यात आले.

तानसेन पुष्कळ वर्ष ग्वाल्हेरच्या राजाश्रयात राहिल्यानंतर रीवाँचे राजा 'राजाराम' यांच्या बरोबर रीवाँला गेले. व तेथे दरबारी गायक बनले. हळूहळू तानसेनची प्रसिध्दी पूर्ण हिंदुस्थानात झाली. ही गोष्ट अकबर बादशाहानेही ऐकली. अकबर रसिक होता. म्हणून त्याने रीवाँच्या राजास त्यांच्या दरबारी संगीतज्ञाचे गाणे ऐकण्याची प्रार्थना केली. रीवाँच्या राजाने सन्मानाने तानसेन यांना अकबराच्या दरबारी पाठविले. तानसेनचे गायन ऐकून अकबर आनंदी झाला. आणि रीवाँचा दरबारी गायक; दिल्लीपति म्हणजे अकबर यास भेट देण्यात आला. अशा प्रकारे १५५६ पासून तानसेन दिल्लीचा दरबारी गायक बनला. आणि अकबराच्या दरबारातील नवरत्नांमध्ये तानसेनची गणना होऊ लागली.

तानसेन जसा गायक होता तसा कवी देखील होता. त्याच्या कितीतरी रागांच्या रचना आज प्रसिध्द आहेत. त्यामध्ये 'मियाँ-मल्हार', 'मियाँ की तोडी', 'दरबारी कानडा' इ. प्रधान रागांची निर्मिती केली. कृष्णलीलेवर लिहीलेली त्याची पद्य रचना प्रचलीत आहे. वैष्णव पंथीयांच्या घराघरात ती ऐकायला मिळते.

इ.स. १५८५ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. ग्वाल्हेरमध्ये

महंमद घौस यांच्या कबरीजवळ त्यांची कबर बनविली आहे. वर्षातून एक दिवस तेथे मोठा मेळा लागतो. दूरदूर वरून गायक-वादक तेथे येतात आणि मोठ्या भक्तीभावाने तानसेनच्या कबरीजवळ गायन-वादन करतात आणि श्रध्दांजली अर्पण करतात.

### अमीर खुसरो

अमीर खुसरो यांना ख्याल गायकीचा जन्मदाता मानले जाते. यांचे वडील अमीर मुहम्मद सैफुद्दीन बलवन हिंदुस्तानात आले. त्यांना एक पुत्र रत्न प्राप्त झाले. तेच अमिर खुसरो होते. अमीर खुसरो यांचा जन्म उत्तर प्रदेशातील 'एटा' जिल्ह्यात इ.स. १२३४ व १२३५ च्या आसपास झाला असे मानले जाते. बुध्दीमान असल्यामुळे त्यावेळच्या सर्व विद्यांमध्ये ते प्रविण झाले. दिल्लीपति गयासुद्दीन बलबन बादशाहाच्या दरबारी ते नौकर होते. त्यानंतर खिल्जी वंशाने हे राज्य जिंकले तेव्हा ते खिल्जी राजाच्या दरबारी नोकरी करू लागले.

इ.स. १२६४ मध्ये अल्लाउद्दीने खिल्जीने देवगिरीवर चढाई केली. त्यावेळी अमीर खुसरो त्यांच्या बरोबर होते. देवगिरी दरबारात गोपाल नायक नावाचे एक गायक होते. अमीर खुसरो यांना गोपाल नायक यांचे गायन खूप आवडत असे. ते गोपाल नायक त्यांना आपल्या बरोबर दिल्लीला घेऊन गेले. आपल्याला प्रसिध्दी मिळवून घेण्यासाठी अमीर खुसरो यांनी गोपाल नायक यांच्या बरोबर स्पर्धा केली आणि त्यांना पराजित केले. परंतु गायनाची विद्या त्यांनी गोपाल नायक यांचेकडूनच प्राप्त केली होती. अमीर खुसरो यांनी 'काफी', 'सरपरदा', 'नीरोज' इ. रागांचा प्रचार केला.

अमीर खुसरो यांनी नवीन प्रकारे रचना केल्या आणि तीच ख्याल गायकीची पहीली रचना होय. अमीर खुसरोच्या काही रचना आजही गायक गातात. सतारीचा देखील त्यांनी आविष्कार केला आणि त्यासाठी 'गत' यांची रचना त्यांनी केली असे मानले जाते. त्यांनी संगीतावर आधारीत काही पुस्तके देखील लिहीली. ते अनेक विद्यांमध्ये प्रवीण होते. म्हणून त्यांचे नाव आजही घेतले जाते. त्यांनी सुरू केलेल्या परंपरेस 'कव्वाल' म्हणतात. त्यांनी काही नवीन तालांची देखील निर्मिती केली. ७२ वर्षाचे असतांना अमीर खुसरो यांचा मृत्यु झाला.

या दोन व्यक्तींशिवाय संगीत क्षेत्रात असे अनेक मान्यवर होऊन गेलेत की ज्यांनी आपले संपूर्ण जीवन संगीतास वाहीले. यामध्ये स्वामी हरिदास, स्व. पं. बालकृष्णबुवा, इचलकरंजीकर, पं. पन्नालाल घोष, इनायत खॉं, पं. विष्णु नारायण भातखंडे, प. विष्णु दिगंबर पलुस्कर इ. नावे सांगता येतील. अशा अनेक मान्यवरांमुळे आपले भारतीय संगीत प्रगत होत गेले. भारतीय संस्कृतीतील एक अविभाज्य घटक म्हणजे संगीत. असे हे संगीत; ज्यास घडविण्यास कितीतरी काळ लोटला; त्या संगीताचा दर्जा टिकविणे आपले कर्तव्य आहे. ज्यांनी संगीतासाठी आपले संपूर्ण जीवन कष्ट घेतले त्यांचे कार्य पाहून मी एवढेच म्हणू शकते -

''दिव्यत्वाची जेथे प्रचिती
तेथे कर माझे जुळती''

★★★

## भ्रष्टाचाराचे काळे ढग

सुरेंद्र माधव मेहेंदळे
द्वितीय वर्ष (वाणिज्य)

उंच उंच जावसं वाटतयं
काही तरी करावसं वाटतयं
पण आडवे य़ेत आहेत ते भ्रष्टाचाराचे काळे ढग
त्या ढगांना लालुचयुक्त वारा घालताय
आपले भ्रष्टाचारी नेते.
यातुन लालुचयुक्त पाऊस पडतोय व नष्ट होत
आहेत नुकतीच वर
आलेली
प्रामाणिकपणाची कणसे असलेली नवयुवकांची पीके.



## विद्यार्थी व आजचे चित्रपट

प्रशांत पाटील
प्रथम वर्ष (विज्ञान)

विद्यार्थी आणि आजचे चित्रपट हे दोन शब्द एकत्र करून त्यावर विचार करण्याची वेळ यावी याचाच अर्थ काहीतरी अघटित घडायला लागलं आहे हे मान्य करावे लागेल. विद्यार्थी म्हटला की त्यांच्याकडून आई, वडील, शिक्षक, समाजाच्या काही अपेक्षा असतात. थोडक्यात तो ज्ञानपिपासू असावा. सालस, जिज्ञासू, अभ्यासू, आज्ञाधारक, कर्तव्यदक्ष, नम्र त्याचप्रमाणे स्वभविष्याबरोबर देशाचे भवितव्य घडविणारा भविष्याचा मानकरी असावा पण.... आजच्या विद्यार्थ्याकडे पाहिले की काय दिसतं? हुषार विद्यार्थी दररोज तास चुकवून सिनेमाच्या रांगेत उभा असतांना पहावयास मिळतो. एखादा सालस म्हणून मान्यता पावलेला विद्यार्थी चोरपावलांनी एखाद्या मुलीच्या घरासमोरील रस्ता झिजवतांना दिसतो तर एखादा ज्ञानपिपासू विद्यार्थी 'फिल्मफेअर, सिनेसमाचार', मायापूरी, स्टारडस्ट, फिल्मसिटी यासारखी मासिके वाचून नटनट्यांच्या भानगडींचे ज्ञान मोठ्या चविष्टपणाने चाखतांना हे घोळताना आढळतो. एखादा नम्रतेचा पाईक मारामारी, खून खटल्यात अडकल्याची ऐकावयास मिळते. तो गुन्हेगार बनतो. विद्यार्थ्यांच्या या पदच्युतीला कारणीभूत आहेत हे 'आजचे चित्रपट!' कारण त्यांचाच पगडा त्यांच्या बालमनावर, जीवनावर, ध्येयधोरणावर जास्त पडलेला पहावयास मिळतो.

चित्रपट हे मनोरंजनाचे सर्वोत्कृष्ट साधन आहे. हे मान्य केले तरी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, नट-नट्या यांच्या चित्रपटांतल कल्पनेचा विकास पाहिला की वाटते चित्रपट हे सर्वोत्कृष्ट मानवी संस्कृतीच्या व आदर्शाच्या विनाशाचे माध्यम ठरावे. आजच्या हिंदी चित्रपटात पहावयास मिळतो तो रोमान्स, बलात्कार, कॅबरे डान्सेस, हाणामारी, गोळीबार, बेफाम नृत्ये, नट्यांची अर्धनग्न शरीरे, खलनायकी बेशरमपणाची वागणूक, काळाबाजार, स्मगलिंग यासारख्या विषयावर अफाट चित्रपटांची निर्मिती होतांना आपण पाहतो.

विद्यार्थी हा संवेदनशील असतो. तो वयाने बाल असतो. बालमानसशास्त्राच्या आडाख्याप्रमाणे तो अनुकरणप्रिय असतो. कोणत्या गोष्टीचे अनुकरण करावे वा करू नये याचे त्याला भान नसते. समाजामध्ये याबद्दल त्याला मार्गदर्शनही होत नाही. असा कोवळा, संवेदनशील, अनुकरणशील विद्यार्थी सिनेमागृहात प्रवेश करतो. पण बाहेर पडतांना मनात विचार करतो तो खुशाल चेंडू नायकाप्रमाणे जीवन जगण्याचा!.... एखादी विद्यार्थिनी विचार करते ती नट्यांसारखे कपडे वापरून, वासनातृप्तीच्या आहारी तात्काळ जाण्याची!

आजचे चित्रपट हे अवास्तव स्वप्नरंजनाने भरलेले असतात. त्यांचा मुलांच्या अपरिपक्व मनावर विपरीत परिणाम झाल्याशिवाय रहात नाही. काहीही काम, अभ्यास न करता नायिकेच्या पाठीमागून फिरणारा नायक पाहिला की विद्यार्थी आपली प्रतिमा त्याच्या ठिकाणी पाहतो. आणि तो कोवळा जीव स्वप्नरंजनाच्या प्रेम नगरीत अडकतो. पण प्रेम म्हणजे काय.... कशाबरोबर चाखायचे याची अजून जाण न आलेला विद्यार्थी मात्र, आपलं व्यक्तिमत्व घडवून समाजामध्ये आदराचे स्थान प्राप्त करून जीवनाश्यक अर्थ मिळविण्याच्या पाठी न लागता, केसांची झुल्फे वाढवून पायघोळ पॅन्ट चढवून खोट्या मिजाशीने रस्त्याने मुलींची टिंगल करत असताना पहावयास मिळतो.

विश्वमित्राच्या नवसृष्टीनिर्मितीची मेनकेनं दांडी उडविली असली तरी अशा कित्येक बनावट मेनकांनी चित्रपटसृष्टी एका वेगळ्याच धैर्याने निर्मिली आहे. तिने विद्यार्थ्यांना इतकी मोहिती घातली आहे की, 'चित्रपटाचे वेड' नावाचा एक महाभयंकर संसर्गजन्य रोग विद्यार्थ्यात कमालीच्या वेगाने पसरत आहे. आजच्या विद्यार्थ्याला नव्या पंतप्रधानांच्या पहिल्या वहिल्या भाषणापेक्षा हेमामालिनीची 'जयमाला' रेडिओवर ऐकावयास महत्वाची वाटते.

हायस्कुल, महाविद्यालयामधून फिरणारे नटनट्यांचे डमीज विद्यार्थ्यांवर होणाऱ्या चित्रपटांच्या परिणामांची निश्चितच खात्री करून देतील. 'आतंक ही आतंक' 'क्रिमीनल', 'गुन्डाराज', 'हैवान जाग उठा', 'दो गज जमीन के निचे'..... यासारख्या किती म्हणून पिक्चर्सची नावे घ्यावीत की, ज्या स्टंटपटातून गुन्हेगारीला प्रोत्साहन मिळत आहे. वर्तमानपत्रातील बातम्या

वाचणाऱ्या तुमच्यासारख्या सुज्ञांना जास्त सांगणे नको. पुण्याचे जोशी अभ्यंकर खून प्रकरण लक्षात घ्या, कोण होते ते खूनी? कोण होते? कला विभागाचे विद्यार्थी.... जातीवंत कलावंत!.... ज्यांनी आपल्या ब्रशच्या फटक्यांनी नवसृष्टी निर्माण करावयाची, जगालाही व स्वत:लाही कलानंदात विसरून जायचे असे हे कलावंत विद्यार्थी मंडळी!... पण.... तीच अमानुष बनून मानवतेला कलंकित कशी झालीत ना? का?... चैनीला पैसा नव्हता म्हणून!.... पण.... न परवडणारी चैन करायला त्यांना कोणी शिकवले? सांगाल याला उत्तर?.... याला उत्तर आहे आजच्या चित्रपटांनी! आणि हे कोणी नाकारू शकणार नाही. वास्तवाचा विसर पाडून अवास्तवाच्या मर्यादा ओलांडणारे हे आजचे चित्रपट म्हणूनच विद्यार्थ्याला गुंड, निष्ठूर, बेफाम बनवतात. काही गुन्हेगार विद्यार्थ्यांनी कबुलीच दिली आहे की जुगनू मधील धर्मेंद्रचा चोरीचा प्लॅन पाहून चोरी केली.

आदर्शाची पायमल्ली करून वासनेच्या चाळ्यांना खुशाल थारा मिळवून देणारे हे चित्रपट बालमनाच्या विकृतीला कारणीभूत ठरतात. जे वय कल्पनेत रंगायचे... ते मन.... ध्येयाने बहरायचं!! जे मन आदर्शांनी स्फुरण पावण्याचे मन....

'आंघोळीला बसले अन माझे मलाच येई हसू गं....' असल्या हलकट, वायफळ, वयोमानाला न पेलणारे गाणे ऐकून बिथरल्या शिवाय रहात नाही. मग बालमन वासनातृप्तीकडे भटकते. विद्यार्थीदशा की, जीमध्ये आयुष्याची कमाई करावयाची असते तीमध्ये हा विद्यार्थी अपरिपक्व वासनेने बरबटलेले एक कोडके बनतो. एखाद्या विद्यार्थ्याने अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची बातमी वर्तमानपत्रात झळकते. जे व्हायचे तेच होते. विकृतीतून विनाशाकडे वाटचाल सुरू होते. वडिलांची आज्ञा न पाळणे. समाजातील नीती-मूल्यांची हरघडी पायमल्ली करणे, आपल्या वैयक्तिक वायफळ गरजा- तृप्तीकडे लक्ष देणे, पुस्तक उघडून न पाहणे, शिक्षकांना तंबी देणे. यासारख्या घटना घडू लागतात. बेबंद जीवन जगण्याकडे त्यांचा कल होता पण जीवनाच्या मध्य पर्वात त्याला कळते आपण चुकलो आहोत. पण..... वेळ टळून गेलेली असते. अधोगतीला लागलेला व नंतरचा मनुष्य आपल्या जीवनात सावरू शकत नाही.

कलेचे कलेवर बनवून तीच कला असे सांगून बाजारात खपवले जाणारे हे चित्रपट मानवी मनाच्या सामान्य अभिरूचीला उत्तेजित करण्याचा प्रयत्न करतात. माणूस हा घडवावा लागतो. कारण तो प्रथम प्राणी असतो. तो घडवण्यासाठी आवश्यक असणारी जीवनावरील निष्ठा, जीवन कलहात अविचल राहण्याची वृत्ती, आदर्श तत्वे, नीतीमूल्ये संस्कार संस्कृतीची ओळख, अविचल ध्येयनिष्ठा यासारख्या बाबी मनावर बिंबवाव्या लागतात. पण त्यांचा मागमूसही आजच्या चित्रपटात पहावयास मिळत नाही. विद्यार्थ्यांच्या चारित्र्यसंवर्धनाची समाजाने अपेक्षा करताना त्यांच्या जीवनावर तीव्र परिणाम करणाऱ्या चित्रपटाकडे समाजाने प्रथम पाहायला नको कां?

आजच्या चित्रपटांवरील माझी विरोधी भूमिका मांडतांना मला याचीही जाण आहे की, आनंद, डॉ. कोटणीस की अमर कहानी, गांधी, श्याम, सारा आकाश, हम है राही प्यार के, रोजा, क्रांतीवीर, हम आपके है कौन, यासारख्या काही बोटावर मोजण्यासारखे चित्रपट जीवनाचा आनंद लुटण्यास शिकवतात. पण हे ही खरे की असंख्य बाष्कळ चित्रपटांतून असले चित्रपट क्वचितच डोळ्यासमोर येतात. त्यामुळे विद्यार्थी वर्गावर बहुसंख्याक चित्रपटांचीच मोहिनी अधिक पडते.

पण... याचा अर्थ विद्यार्थ्यांनी चित्रपटच पाहू नये असे माझे मुळीच म्हणणे नाही. तर आदर्श चित्रपटांची चातकाप्रमाणे वाट पाहून ते त्यांनी पाहिले पाहिजे की, ज्यातून जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळेल. ध्येयमार्गी झुंजताना तत्वाशी अविचल राहण्याचा संदेश मिळेल. विद्यार्थी आनंदयात्री, आनंदराही बनेल. रस्त्यावरील माणसालाही आपलासा मानण्याचे धैर्य त्याच्या ठिकाणी येईल. महारोग्यांच्या आनंदवनात जाण्याची मनिषा तो बाळगेल, मानवी संस्कृती व इतिहास याची त्याला ओळख घेऊन तो आपल्या सुजलाम-सुफलाम देशाप्रमाणेच सर्व जगावर अपार प्रीती करण्यास शिकेल. हसत दुखा:चा स्वीकार करेल. अंधार पिऊन चांदणे वर्षविल. स्वत:च्या डोळ्यातील अश्रू दडवून स्मितहास्य करून जगाला हंसवील.

पण अशा चित्रपटांची निर्मिती आज अभावानेच होते हे तुमचे आमचे, पालकांचे आणि देशाचे दुर्भाग्यच नव्हे काय?

★★★



# १९४२ चा भारत आणि आजचा भारत

कु. संगिता रामदास साळुंके
ज्यु. एम.ए. (अर्थशास्त्र)

१९४२ चा भारत आणि आजचा भारत याची तुलना केली असता असं वाटत की आपण सर्वच भाग्यवान आहोत की आपण स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलो. स्वातंत्र्य मिळून आज जवळ-जवळ अर्धशतक उलटू पाहत आहे. आपण इतिहास शिकतो तेव्हा आपल्याला वाटते की पारतंत्र्य हे किती वाईट आहे. तेव्हा आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात ते स्वातंत्र्य मिळवतांना हसत-हसत भारतमातेचा जयघोष करीत फासावर चढणारे भगतसिंग, सुकदेव, राजगुरू, कोवळ्या रक्ताचा सडा घालणारे तरीही हातातील झेंडा न सोडणारे बाबू गेणू, शिरिष पै, दुरदम्य इच्छा शक्तीने जिब्राल्टची समुद्रधुनी पोहून जाणारे बॅ. सावरकर, तुम्ही मला रक्त द्या मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो असे म्हणणारे आझाद हिंद सेनेचे सरसेनापती सुभाष बाबू ही अशी नावे डोळ्यासमोर चमकून जातात आणि आपण त्याच्या समोर नतमस्तक होतो.

या जहालमतवाद्यांच्या विचारा व्यतीरिक्त संविनय कायदेभंग व अहिंसा तत्व घेऊन स्वातंत्र्याकरता झटणारे महात्मा गांधी, पं. नेहरू, बॅ. जीना, खान अब्दुल गफ्फारखान, राजेंद्र प्रसाद त्याचप्रमाणे दादाभाई नौरोजी, जमशेटजी टाटा, आणि याचप्रमाणे कित्येकांची नावे मीच सांगितली पाहिजे अशातला भाग नाही. ती आपण इतिहासात वाचत आलो आहोत. अशा या पारतंत्र्यातून आपण स्वातंत्र्यात आलो. हे खरं म्हणजे आपल भाग्यच. परंतु आपण खरच स्वातंत्र्यात आहोत का? याचा जरा खोलवर विचार केला तर निश्चितच डोळ्यासमोर प्रश्नचिन्ह उभे राहते.

आजही काही जुनाट म्हातारे चर्चा करतांना आपण ऐकतो की काय तो इंग्रजाचा काळ होता की त्यावेळी बाराणे शेर तुप, आठ आणे शेर जोंधळे, तीन रूपयात धोतर जोडी आणि याच प्रकारच्या चर्चा ऐकल्यानंतर आज स्वातंत्र्योत्तर भाव आणि पारतंत्र्यातले भाव याची तुलना केल्यास पारतंत्र्यातील ते स्वस्ताईचे जगणे कपोलकल्पीत वाटत असेल तरी ते सत्य होते हे मान्यच करावं लागतं. ४२ च्या पूर्वी टाचणी सुध्दा तयार न होणाऱ्या भारतात आज संपूर्ण संगणीकरण झालेले असून ही प्राथमिक जीवन जगण्यासाठी आवश्यक बाबी स्वातंत्र्यात आल्या सारख्या वाटत नाही. ४२ च्या पूर्वी डोंगर कपाऱ्यात राहणारा आदिवासी किंवा खेड्यात राहणारा पददलित यांची स्थिती पारतंत्र्यातून स्वातंत्र्यात आल्यासारखी दिसत नाही. अजुनही जुनी माणसं तो काळ फार चांगला होता आणि आजचा काळ इतका चांगला नाही असे मोठ्या चवीनं सांगतांना दिसतात. ४२ पूर्वी हे मला मान्य आहे की संपूर्ण भारत इंग्रजाच्या तावडीत अडकलेला होता. संस्थानिकांनी आपले जाळे पसरवले होते. मुठभर लोकांच्या हातात भारत होता. त्यामुळे मघाशी वर्णन केलेल्या महात्म्यांनी आपल्या आयुष्याची होमकुंड पेटवून, गरम रक्ताचे अभिषेक करून महत प्रयासाने ही स्वातंत्र्य देवता आपल्या पदरात टाकलेली आहे ही स्वातंत्र्य देवता आपल्या पदरात टाकतांना त्यांनी इशारेही दिले आहेत की,

हम लाये है तुफानसे कस्ती निकालके

इस देश को रखना मेरे बच्चो संभालके

किंवा स्वतंत्र भारताचे संविधान राष्ट्रांच्या हवाली करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या 'प्रीयाम्बल' मध्ये नमुद केले आहे की, "महत प्रयासाने उभ केलेले स्वातंत्र्य जर सर्व भारतीयांसाठी सम प्रमाणात या संविधानाची राबवणूक झाली नाही तर याच भारतातील तळागाळातील माणूस ती स्वातंत्र्य देवता पायाखाली तुडवल्याशिवाय राहणार नाही.

४२ च्या पूर्वी माणूस हा जीवनावश्यक वस्तुच्या बाबतीत आनंदीत दिसतो. मात्र आजच्या बाबतीत तो उदासीन दिसतो. स्वातंत्र्य मिळवण्याकरीता झोपडीतल्या माणसापासून ते महात्मा गांधी पर्यंत सगळ्यांनी हातभार लावले मात्र त्याचा फायदा आज कुणी घेतला याचा जर विचार केला तर विचारांचे बर्फ होऊन पडतात. ज्यांनी इंग्रजांच्या हसत-हसत गोळ्या झेलल्या, अंपग झाले. खनिजे लुटत इंग्रजांना दे माय धरणी ठाय केले असे सुदैवाने वाचलेले सैनिक कुठल्यातरी धुराळ्यात गळप झाले. या बाबतीत मी ऐकलेला एक किस्सा आपल्याला सांगतो.

खान्देशातील सिंधखेडा येथील एक आदिवासी भिल्ल तरूण तहसील कचेरीवर खारीच्या वेगाने झरझर पोलवर चढून तिरंगा फळकावता आला. दुसऱ्या क्षणी इंग्रजाची गोळी पायाला लागून खाली आली आणि आपले दोघ पाय गमावून बसला वयाची ७०, ७२ वर्षे पूर्ण करून दारोदार भिक मागत फिरणारा हा भिल्ल तरूण कुठल्याही स्वातंत्र्य सैनिकांच्या यादित दिसला नाही. अशी कित्येक उदाहरण देता येतील. खळू फड्याशी ज्याची कधी गाठ पडली नाही असे शिक्षक आदर्श शिक्षक म्हणून ठरू लागेल.

४२ च्या नंतर नेहरूजी, इंदिराजी, परवापर्यंचे राजीवजी ही देशाला प्रगतीकडे ,नेणारी माणसं आपण पाहिलीत परंतु त्यांच्या ध्येय धोरणाची राबवणूक ही इतक्या जोमाने झालेली. दिसून येत नाही. अपात्र माणसे राजकारणात येऊ लागली हमाली करणारी माणसे R-DX चा साठा पुरवू लागली मासे पकडणारी माणसे आर्थिक व्यवहार डामाडौल करू लागली. देशाचा गाडा हाकणारे अधिकारी कवडीमोल विकली जाऊ लागली त्यावरही दुर्दैव असं डोळ्याला पट्टी बांधून न्याय देणारी न्याय देवता ज्या पारड्यात त्याच जास्त तिकडे झुकू लागली. आज गुंडाचे साम्राज्य एवढं विखुरलं आहे की सर्वसाधारण माणसाचं जीवन अस्थीर झाले आहे. स्त्रीयांच्या बाबतीत म्हणाल तर वृत्तपत्राचे कोणतेही पान उघडा त्यात तुम्हाला दिसून येईल की महिला ह्या किती असुरक्षित आहेत.

आतापर्यंतच्या विवेचनावरून दिसून येते की, बाराणे शेर तुप, आठ आणे शेर जोंधळे, तीन रूपयाची धोतर जोडी तो काळ किती चांगला होता असे म्हणण अपरिहार्य होत. पारतंत्र्यात असूनही सर्वसाधारण माणसाच्या गरजा पूर्ण होत होत्या. परंतु आज स्वातंत्र्यात असूनही प्राथमिक गरजा तर सोडाच पण कोणत्या क्षणी कुठे बॉम्ब स्फोट होईल हे अगदी पोरखेळ झाले आहे.

तेव्हा आजच्या स्वातंत्र्यात खरं स्वातंत्र्य जगायच असेल तर या देशात माजलेला जात, जातीयता जातीयवाद, हा राक्षस काढला गेला पाहिजे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व याला चालना मिळाली पाहिजे. आणि माणसाला माणसासारखं जगू दिलं पाहिजे. देवाच्या नावाने होणाऱ्या कत्तली थांबल्या पाहिजे. माणसाने कसे वागायला हवे 'माणूसकी घ्यावी माणूसकी द्यावी माणसासारखी' दुसऱ्यालाही माणूस समजून' परंतु दुर्दैव असं या सर्व गोष्टींचा उहापोह करताना विचाराची पातळी ही वजा ०.३२ डी.ग्री. वर येते त्यावेळी विचाराचे बर्फ होऊन पडतात.

शेवटी यापैकी कोणता भाग निवडायचा हा विचार केल्यास स्वतंत्र भारत हेच निवडावे लागेल. कारण स्वातंत्र्य हे स्वातंत्र्य असते आणि गुलामी ही गुलामीच असते. स्वातंत्र्यातल्या चुका/उणीवा दुरूस्त होऊ शकतात म्हणून केव्हाही स्वातंत्र्याचाच पुरस्कार करणे योग्य ठरते.

★★★

# उघड्यावरचा संसार

संदीपकुमार चौधरी
द्वितीय वर्ष (कला)

येतांना जातांना बघतो मी दररोज,
एक उघड्यांवरचा संसार
कडाक्याच्या थंडीत, फाटक्या तंबुत
विसावलेले असतात थकलेले जीव.
बाप हिंडतो मुर्त्या विकत
माय हिंडतें भाकरी मागत
पोरं हिंडतात पक्षी मारत
असा रखडतच चाललाय त्यांचा संसार.
साचलेल्या डबक्याच्या घाणेरड्या पाण्यात
करतात ते मनमुराद आंघोळ
हिंडतात पिण्याच्या पाण्यासाठी दारोदर
असा रखडतच चाललाय त्यांचा संसार.
बंगल्यातले लोक जबाबदारी झटकतात
शोषून त्यांना उघड्यावर नागवतात
वरून त्यांना पारधी म्हणून हिणवतात
असा रखडतच चाललाय त्यांचा संसार.



# “लता सोनेरी सुरांची!”

कु. ललिता हर्डीकर,
तृतीय वर्ष (वाणिज्य)

## सुरसम्राज्ञीचं आरंभीचं अंगावर काटे आणणारं आयुष्य :-

अवघं पाच वर्षाचं वय आणि तिला देवी आल्या अशा आल्या की तिला पुरतं उद्ध्वस्त करायचं असं ठरवूनच. एक मावळली की तिथंच दुसरी उगवायची. कान नाही, नाक नाही, डोळे नाही, जिवंत कोंबडं आगीवर भाजावं तसं चालवलं होतं या दुखण्यानं फरक एवढाच होता भाजण्याआधी साऱ्या अंगाला भोकं पाडून त्यातं मसाला भरला होता. आगीला आग लावावी तसा भडका पण ही आग ती शांतपणे सोसत होती. जिथं ठेवावं- तिथं अंगाला मुंग्या लागत होत्या, आई तिला केळीच्या पानावर ठेवायची, झोक्यात घालून गाणं म्हणत झुलवायची. गाणं म्हणून झोपवलं की गात रहायची उंऽऽ उंऽऽऽ हिचा सूर चालूच, पण डोळे गप्प मिटलेले असायचे. इकडं बोलता येत नव्हंत, पण गाणं थांबायचं नाही. कानातनं पाणी वहायचं, डॉक्टरांना वाटायचं हिचे डोळे बहुतेक गेलेच.

देवीला प्रसन्न करण्यासाठी मावशी डोक्यावर मातीच्या पात्रामध्ये निखारे ठेवून काळे कपडे घालून चमच्याने तिच्या बोटाला स्पर्श केला आणि ती जोरजोरात रडायला लागली तशी वडिलांनी तिला आपल्या छातीशी कवटाळले आणि स्वतःही रडू लागले कारण ती त्यांना प्राणापेक्षाही प्रिय होती.

सर्वांगावरून जीवघेण्या झुंजीच्या खुणा ठेवून तीन महिन्यांनी देवी गेल्या, ऐवढे प्रयत्न करूनही त्यांना (देवींना) तिच्या कंठातलं गाणं आणि काळजातली हिंमत नेता आली नाही. ती बरी झाली, वडिलांनी बँड लावला, आईनं तिच्या आजारपणात तिला बघायला आलेल्या प्रत्येक स्त्रीची खणानारळानं- लुगड्यानं ओटी भरली.

लहानपणी इतक्या यातना सहन करणारी ही मुलगी आहे- जिनं आपल्या आवाजानं, गाण्यानं कोट्यावधी लोकांना मोहून टाकलं आहे त्या ''लता मंगेशकर''

''लता मंगेशकर'' हे सात अक्षरी नाव उच्चारल्याबरोबर सप्तसुरांच्या या स्वामिनीच्या अनेक हळूवार गीतांच्या हिंदोळ्यावर स्वार झाल्याची अनोखी अनुभूती लाभते. लतादीदी आता ६५ वर्षाच्या झाल्या असल्या तरी त्यांचा आवाज मात्र अजुनही अजरच आहे. अगदी ''आयेगाऽऽ आयेगाऽऽऽ आनेवाला'' च्या वेळी 'महल' मध्ये पडद्यावरच्या लावण्यवती मधुबाले एवढेच स्वर-लावण्य लेवून आलेला हा स्वर या घडीला गाजत असलेल्या ''मैंने प्यार किया'' तील भाग्यश्री व ''हम आपके है कौन!'' मधील माधुरी दिक्षीत यांनाही तेवढाच खुलला. या स्वरांचे लावण्य मधल्या ५० वर्षात जराही कमी झाले नाही.

षोडश वयातील भाग्यश्री आणि एकसष्टीतील आदरणीय लतादीदी, परंतू त्यांची जेव्हा तिच्यासाठी स्वर लावला तेव्हा ६१ चे १६ कसे झाले तेच कळेनासे झाले! त्यांच्या स्वराला ही जी देणगी लाभली आहे ती आम्हां रसिकांच्या दृष्टिने अतिशय मोलाची आहे.

'छत्रपती शिवाजी' मधलं 'आज शिवाजी राजा झाला' हे गाणं आठवतंय! हाती आरती घेवून लतादीदी चक्क पडद्यावरही दिसतात. पण हे दिसणं अगदी कमी वेळा! मराठीत 'माझं बाळ', 'पहिली मंगळागौरी' तर हिंदीत 'बडी माँ', 'जीवन यात्रा' अशा थोडक्या चित्रपटात.

मानश्रेष्ठत्वाबरोबरीने संगीताच्या दुनियेतील दुसरी महत्वाची सिध्दी म्हणजे संगीत-दिग्दर्शन ''दिदींनी'' ते ही समर्थपणे केले. 'आनंदघन' या नावाने अप्रतिम चाली- जन्माला आल्या. 'राम-राम पाव्हणं', 'मोहित्यांची मंजुळा', 'मराठा तितुका मेळवावा', 'तांबडी माती' असे संगीताचे आनंदघन बरसणारे चित्रपट लतादीदींच्या नावे आहेत. 'साधी माणसं' मधील 'ऐरणीच्या देवा तूला' तर कायमचं आठवणीत रेंगाळतयं!

संगीत-दिग्दर्शनाबरोबरच 'वादळ', 'झांझर', 'कंचन' आणि अलिकडचा 'लेकिन' असे काही चित्रपट निर्माती म्हणून दीदींच्या नावे जमा आहेत. 'महल' व 'बरसात' ने लतादीदीला

लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचविले. तेव्हापासून ते आतापर्यंत 'त्या' स्वर-संसारावर राज्य करीत आहेत.

मधुर स्वरांची ही ''चांदनी'' अशीच अखंड बरसत राहो, हीच सदिच्छा!

★★★

# निरोप

अनिरूध्द अ. सकळकळे
पदव्युत्तर इंग्रजी (द्वितीय)

एक जापानी हायकू आहे
'तू म्हणालास हल्ली मी तूला
भेटत नाही. तूला काय माहितीय
मी निरोपाची तयारी करतोय'
खरच, निरोप कसा घ्यावा? केव्हा घ्यावा?
'ओळख' आणि 'निरोप' हे जन्म-मृत्यू
इतकंच अपरिहार्य का?
रस्त्यावर चालणाऱ्यात
आपली नजर चुकवली
- तर निरोप घ्यावा.
झाडावरच्या पानानं
फुलासाठी जागा द्यावी
- तसा निरोप द्यावा.
भेटावसं वाटणाऱ्यात
का आलास? म्हणून विचारल
- तर निरोप घ्यावा.
वळणावर वळून
रस्ता दिसेनासा व्हावा
- तसा निरोप द्यावा.
बोलतांना शब्द
निसरडे झाले
- तर निरोप द्यावा.
डोळ्यातल्या पाण्याला
टाळ्यांची दाद मिळाली
- तर निरोप घ्यावा.

# अंतरंग

संजय वडगुजर
तृतीय वर्ष (कला) मराठी

मी आज प्रथमच पाहीले माझे अंतरंग,
विविधालंकारांनी नटलेले माझे अंतरंग,
ते कधी फुल होऊन मोहीत करते,
तर कधी कळी होऊन चूर होते,
मनामनांचे दुःख, यातना यांत आहेत,
त्यांच्या सुखद वार्ताही यात आहेत,
ते कधी लहान मुल होऊन वागडते,
तर थोर होऊन हसत हसत अमर होते,
कधी माथेफिरूंची बंदुकही होते,
व कधी तर मायेचे पांघरूणही होते.
असे अंतरंग तरूणाईतही शिरते,
आणि युगुलांची चांदरातही होते,
असे हे अंतरंग वाचकात जाते,
व त्यांच्या अंतरंगात अंतरंग होऊन राहते.....



# श्रीलंका : एका वादळाचा प्रवास

हृषीकेश सकळकळे
तृतीय वर्ष (वाणिज्य)

श्रीलंका, अर्थात अरब व्यापाऱ्यांचा 'सिरेनदिव', पोर्तुगीजांचा 'सायलो' व ब्रिटीशांचा 'सिलोन'. भारतातील रामेश्वरम् पासून केवळ ४८ कि.मी. अंतरावर वसलेले ६५,६०९ चौ. कि. मी. क्षेत्रफळाचे हे बेट पाचू करिता जगप्रसिध्द आहे. याच छोट्या देशातील वंशवादामुळे खंडप्राय भारत अस्थिर बनत आहे.

श्रीलंका समस्या समजण्याकरिता आपल्याला एक बौध्द दंतकथा उपयोगी पडते या दंतकथेनुसार उत्तर भारतातील सिंहपूर राज्याचा राजा सिंहबाहू हा विजय या त्याच्या मुलाच्या कृत्यामुळे नाराज होतो व त्याला त्याच्या ७०० अनुयायांसकट हद्दपार करतो. विजय व त्याचे अनुयायी लंकेच्या वायव्य किनाऱ्यावर अंमल सुरू करतात. ह्यावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की लंकेतील मूळ सिंहली हे लोकसुध्दा भारताच्याच इशान्य भागातील स्थलांतरीत आहेत. त्यानंतर श्रीलंकेत भारतातून तामिळी लोकांचे स्थलांतर खिस्तपूर्व १७७ सालापासूनच सुरू झाले. इळार व चौल या तामिळी व द्रविड राजघराण्यांनी लंकेत त्यांचे वर्चस्व निर्माण करण्यास सुरूवात केली. या राजांनी तेथील बौध्द धर्माचा प्रभाव कमी करण्यासाठी अनेक कारवाया केल्या, पण त्यात त्यांना यश आले नाही. ह्याच पार्श्वभूमीवर १५०५ साली पोर्तुगीजांनी दालचिनीच्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्याकरिता पहिले पाऊल ठेवले. सशस्त्र पोर्तुगीजांनी प्रथम पासूनच बहुसंख्य सिंहली लोकांची बाजू घेऊन अल्पसंख्यांक तामिळी विरूध्द धोरण ठेवले, अर्थात हा राजकारणाचा भाग होता.

परंतु जेव्हा बौध्द पुनर्जिवनवादी लोकांनी खिश्चन मिशन च्या विरूध्द आवाज उठविण्यास सुरवात केली, तेव्हाच पोर्तुगीजांच्या सत्तेला ग्रहण लागले. त्यातूनच पुढे सिंहली वंश बौध्द धर्म हे ब्रीदवाक्य तयार झाले. श्रीलंका ही केवळ सिंहलींचीच हा प्रचार करण्यात येऊ लागला. राजकीय जीवनात देखील सिंहलींचाच प्रभाव होता. इंग्रजांनी सुरू केलेल्या आधुनिक शिक्षणाचा फायदा तामिळी लोकांनी अधिक मिळविला व महत्वाची क्षेत्रे अधिकारात ठेवली. १८८० सालापासून बौध्द भिक्षूंनी सुसंघटीत होऊन ह्या तामिळी विरूध्द आंदोलन हाती घेतले.

पुढे १९४८ साली श्रीलंका स्वतंत्र झाली. त्याचवर्षी लंकेचे तत्कालिन पंतप्रधान डॉन स्टीफन यांनी नागरिकत्वाचा नवा कायदा संसदेकडून मान्य करून घेतला. या कायद्यामुळे लंकेत वास्तव्य करणाऱ्या १० लाख तामिळी लोकांना मतदान व नागरिकत्वाचा अधिकार नाकारण्यात आला. हा कायदा म्हणूनच तामिळींकरीता बंडाचे स्फुलींग घेऊनच आला. १९४९ साली सिल्वनायकन यांच्या फेडरल पक्षाने सर्वात प्रथम 'इलमची' मागणी खुलेआम केली. दरम्यान प्रभाकरन सारखे तरूण नेते दहशतीमार्गाचा अवलंब करू लागले. पुढे तामिळींचे आंदोलन चिरडण्याकरीता व त्यांना देशद्रोही ठरविण्याकरीता मे १९५६ साली 'सिंहली' हीच राष्ट्रभाषा म्हणून जाहिर केले. हीच पहिली मोठी जखम तामिळींना झाली. दक्षिण भारतात घटनांचे पडसाद पडू लागले. १९७७ साली श्रीलंका व भारतात एकाच पार्श्वभूमीवर सत्तांतर झाले. जयवर्धने सरकारने लंकेची सुत्रे हाती घेतली. श्रीमती गांधी व जयवर्धने ह्यांतील वैयक्तिक संघर्ष देखील पुढील घडामोडींना कारणीभूत आहे. इथूनच तामिळी जनतेला आर्थिक, राजकीय पाठिंबा भारतातून मिळू लागला.

प्रभाकरनने एल.टी.टी.ई. ह्या जहाल अतिरेकी संघटनेची स्थापना केली व ते अधिक सुसंघटित, आक्रमक होऊ लागले. जाफना व बट्टीकलोवा येथे त्यांचे वर्चस्व निर्माण झाले. तेथे जणू तामिळी वाघांनी प्रतिसरकार स्थापले. श्रीलंकन लष्कराला नामोहरम होण्याची वेळ आली. शस्त्रपुरवठा व इतर मदतींमुळे तामिळी वाघांवर १९८३ पर्यंत 'रॉ' या गुप्तहेर संघटनेचे वर्चस्व होते, पण पुढे हा प्रभाव कमी झाला. भिम्पू या गावी प्रथमच तामिळी सरकार ह्यांत वाटाघाटी

सुरू झाल्या पण दरम्यानच बावुनिया येथे २०० तामिळींची हत्या करण्यात आली ही बोलणी फिस्कटली, १० लाख तामिळी निर्वासीत तामिळनाडूत आश्रयाला आले व भारताचा लंकेतील हस्तक्षेप समर्थनीय ठरला. २६ मे १९८७ पासून सुरू केलेल्या 'ऑपरेशन लिबरेशन' ह्या मोहिमेमुळे वाघ प्रथमच अडचणीत आले. तामिळींचे हाल चालू असल्यामुळे राजीव गांधी सरकारवर त्यांना मदत करण्यासाठी दबाव येऊ लागला व शेवटी लंकेची नाराजी पत्करून भारतीय विमानांनी जाफनात अन्न, औषध पुरवठा केला. पण पुढे भारत श्रीलंका मैत्री करार झाला व शांतीसेनेने तामिळींना शरण येण्याचे आवाहन केले. 'श्रीलंकेचे स्वातंत्र्य धोक्यात आणले' हा प्रचार प्रेमदास यांनी केला व अध्यक्षपद जिंकले. राजीव गांधी यांचे हिट लिस्टवर नाव आहे तेव्हापासूनच याचा परिपाक म्हणजे १९९१ रोजी मानवी बॉम्बद्वारा त्यांची हत्या झाली.

वादळ शमलं नव्हतं. श्रीमती भंडारनायके राष्ट्रपती झाल्यावर त्यांनी आता वाघांविरूध्द जबरदस्त युध्द छेडले व लंका जवळपास मुक्त केली आहे. परंतू प्रभाकरन 'बचेंगे तो और भी लढेंगे' असा विचारधारी माणूस, आणि त्याचे साथीदार होत आहेत. शाळेत जाणारी लंकेची भविष्य असणारी कोवळी मुले. एक लढाई तर श्रीलंकन सरकारने जिंकली आहे, पण युध्द मात्र सुरूच आहे.

भारतीय संस्कृतीचा प्रभाव असणाऱ्या तामिळी लोकांनी जर खरोखरच्या अन्यायाला तोंड देण्यासाठी म. गांधींचा मार्ग वापरला तर, लंकेत शांतता देखील नांदेल व वंशसंघर्षाचा शेवट होईल.

★★★

# 'सुंदर स्वप्न'

जावलकर एम. व्ही.
तृतीय वर्ष (विज्ञान)

स्वप्न हे माझे स्वच्छ चांदण्यापरि,
डोळे बंद करून जे पहावे,
ते डोळे उघडल्यावर नाही
स्वप्न आहे म्हणून काय झाले,
समाजाच्या कलंकापासून दूर तरी आहे
सत्य नाही हे खरे,
पण प्रेमाच्या विरहातून मुक्त आहे.
एक दिवस तरी असा येईल,
स्वप्न माझे सत्य होईल,
पण तो दिवस यावा तरी कशाला,
अंधारातील पापं उजेडात आणायला ?
की, सुंदर स्वप्नांची राख रांगोळी करायला.... ?
दिवस उजाडला तरी चांदणं तसच राहावं !
सुंदर स्वप्न मी पहातच राहावं !!!

# ऑल दी बेस्ट

विशाल किरंगे
तृतीय वर्ष (विज्ञान)

तू केले आहेस कष्ट
तर गुण मिळतील उत्कृष्ठ
तू ठरशील श्रेष्ठ,
तू अभ्यासाशी आहेस निष्ठ
कोण अनुत्तीर्ण करेल दुष्ट
काय मती झाली त्याची भ्रष्ट
तुला कोणाची लागू नये दृष्ट
'ऑल दी बेस्ट'



# आजची भारतीय स्त्री

रागिणी वाविस्कर
तृतीय वर्ष (कला)

भारतात पूर्वी हिंदू समाजात स्त्रियांचा सदैव मान राखला गेला होता. त्यांना पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा दिला गेला होता. स्त्रियांचा उल्लेख 'अर्धांगिनी' म्हणून केला जायचा. अशा तऱ्हेने तात्विकदृष्ट्या जरी स्त्रियांचा गौरव केला गेला असला तरी प्रत्यक्षात त्यांना समाजात दिली जाणारी वागणूक ही फारशी चांगली नव्हती. त्यांना दिले गेलेले स्थान अतिशय हीन प्रतिचे होते. कारण भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असल्याने कुटूंबात पुरूष हाच मिळवता होता त्यामुळे जवळ जवळ त्याच्याच मर्जीने व हुकूमतीने कुटूंब चालायचे त्याचे निर्णय स्त्रिला न पटणारे असले तरी मुलतःच सोशिक स्वभाव असणाऱ्या भारतीय स्त्रीला कोणताही विरोध मांडता येत नसे. पुरूषाचे अन्याय कारक निर्णय तिला मुकाट्याने सहन करावे लागत. परंतु आज ही भारतीय स्त्री बदलली आहे.

शिक्षणाच्या प्रसारामुळे भारतीय स्त्रियांच्या दर्जात महत्वपूर्ण बदल घडून आले आहेत. शिक्षणामुळे स्त्रिया या आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्या आहेत. पूर्वीच्या काळी स्त्रिया या प्रामुख्याने नर्सेस, शिक्षिका व टायपिस्ट म्हणून नोकऱ्या करीत परंतु आता त्या पुरूषांच्या बरोबरीने डॉक्टर्स, वकील, इंजिनिअर, पायलट, पंतप्रधान म्हणून काम करू लागल्या आहेत. यावरून असे लक्षात येते की आजच्या भारतीय स्त्रीला केवळ पतीची मर्जी सांभाळत बसणे मान्य नाही.

आजची भारतीय स्त्री ही आधुनिक स्त्री बनून घरची सर्व कामे करून व घर व्यवस्थित सांभाळून अनेक उच्च क्षेत्रात काम करत आहे. श्रीमती इंदिरा गांधी, डॉ. किरण बेदी व मिस वर्ल्ड ऐश्वर्या राय यासारख्या भारतीय स्त्रियांनी तर त्यांची श्रेष्ठता सर्व जगाला दाखवून दिली आहे. आजची भारतीय स्त्री ही बालविवाह, हुंडापध्दती यासारख्या गोष्टींवर मात करीत पुढे पाऊल टाकत आहे. तीने समाजाची सारी बंधने झुगारून देऊन स्वतःचे असे स्वतंत्र अस्तित्व स्त्रीला ही असते हे दाखवून दिले आहे. यावरून असे वाटते की पूर्वीची भारतीय स्त्री (रूढी व परंपरांमध्ये गुरफटलेली स्त्री) ही नविन विचार प्रणालीचा अवलंब करून आधुनिक बनण्याचा प्रयत्न करते आहे. ती पुर्नविवाह करू इच्छिते, हुंडा पध्दती बंद करू इच्छिते, पुरूषांची संसारातील वागणूक त्रासदायक वाटल्यास ती त्यास घटस्फोट देऊ शकते. हुंडा या कारणांवरून त्रास देणाऱ्या आपल्या पती, सासु, सासरे, नणंद यांच्यावर ती गुन्हा दाखल करू शकते. म्हणजे आजच्या भारतीय स्त्रीला कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन होत नाही. परंतु असे असतांनाही आधुनिक काळात भारतीय स्त्रीयांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. म्हणजेच स्त्रीयांची त्यांच्या हालअपेष्टांतून, समाजाकडून होणाऱ्या मानहानीतून पूर्णपणे सुटका झालेली नाही. परंतु तरी देखिल स्त्री-पुरूष विषमता बाजूला ठेवून भारतीय स्त्री आपली कौटुंबिक व्यवस्थेची, आर्थिक व सामाजिक व्यवस्थेची जबाबदारी पूर्णपणे पार पाडत आहे. हे सर्व ती घरातील मंडळीकडून मिळणाऱ्या पाठींब्यामुळेच करते आहे हेही तितकेच खरे आहे. त्यामुळेच तर आजची भारतीय स्त्री ही आपले स्वतंत्र असे अस्तित्व निर्माण करू शकली आहे.

★★★

# उपग्रह दळणवळण

राजेंद्र वसंत वाणी
द्वितीय वर्ष (विज्ञान) संगणक

आपण काही वर्षांनी एकविसाव्या शतकात पाऊल ठेवणार आहोत. आज आणि येणाऱ्या काही वर्षात, माहितीची देवाण-घेवाण, संदेशवहन मोठ्या प्रमाणावर होत आहे व ती वाढत जाणार आहे व ती सुध्दा मोठ्या वेगाने होण्याकरीता आज साऱ्या विश्वात उपग्रह दळणवळणाचे महत्व वाढत असून उपयोग सध्या मोठ्या प्रमाणावर होत आहे.

### उपग्रह दळणवळण म्हणजे काय ?

उपग्रह म्हणजे पृथ्वीभोवती घिरट्या घालणारा मानवनिर्मित कृत्रिम ग्रह होय. (नैसर्गिक उपग्रह सोडून). आज पृथ्वीभोवती शेकडो लहान मोठे, अनेक देशांनी पाठविलेले उपग्रह आकाशात आहे. उपग्रहाचा उपयोग खूप आहे. त्याचे मुख्य दोन उपयोग म्हणजे कोणतीही माहिती संकलीत करून पाठविणे, व संदेश वहन करणे.

उपग्रहाद्वारे आपण अंतराळातील अशा ठिकाणांची माहिती मिळवू शकतो की जेथे मानव जाऊ शकत नाही. उदा. इतर ग्रह उपग्रहाद्वारे तेथील वातावरणाचा अभ्यास व इतर गोष्टींचा अभ्यास करून त्याद्वारे आपण तेथे संवाद साधू शकतो.

उपग्रहाद्वारे जग अगदी जवळ आले आहे. उपग्रहाद्वारे जगातील कुठल्याही कोपऱ्यात घडलेली घटना सर्व जगात सर्वदूर काही क्षणातच प्रसारीत करू शकतो. त्यामुळे जगभरातील कार्यक्रम विविध वाहिन्याद्वारे उपग्रहाच्या माध्यमातून बघू शकतो.

### उपग्रहाचे कार्य कसे चालते ?

उपग्रहाचे सर्व कार्य सौर उर्जेमुळे चालते. ज्या माहितीचे किंवा संदेशाचे वहन करावयाचे आहे त्याचे प्रथम विद्युत चुंबकीय लहरी मध्ये (Electro magnetic signals) रूपांतर करून उपग्रहाकडे पाठविले जातात व उपग्रह त्यांना बरोबर योग्य ठिकाणी प्रसारीत करीतो.

उपग्रहामुळे आपण अंतराळातील घडामोडींचा, मानवाला जाणे शक्य नाही अशा ग्रहाचा, अंतराळातील ठिकाणाचा, वातावरणाचा पर्यावरणाचा (पृथ्वी भोवतालच्या) मोसमी वारे, पर्जन्याचा, जमिनीखालील असलेल्या साठ्याचा, शत्रूच्या हालचालीचा संदेशाचे वहनासाठी जास्त उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने उपग्रहाद्वारे मिळणाऱ्या माहितीसाठी व अभ्यासासाठी उपयोग करून घेऊ शकतो.

★★★

# व्यसनाचे अभंग

– सुरेश पाटील
प्रथम वर्ष (कला)

तुका म्हणे ऐसे सोडावे व्यसन
होती कर्क-रोग त्यापासुन
पान-विडी-तंबाखु नका बाबा खाऊ
सुखी संसाराची ऐसे नको दूर जाऊ
पांडुरंग--- पांडुरंग---
तुका म्हणे सखा नका पिऊ दारू
पैसे वाचवूनी दुध पिऊ
अफु-गर्द-दारू व्यसनाचा पाश
जिवनाचा होई सर्वनाश
पांडुरंग--- पांडुरंग---
तुका म्हणे आता खाता भोम गांजा
विसरले लोक घरे तिन्ही सांजा
व्यसनाचा मार्ग वाईट असतो
सुखी संसाराचा गाडा तो तोडीतो
पांडुरंग--- पांडुरंग---



# तारूण्य

कु. वर्षा शिंपी
तृतीय वर्ष (कला)

पराभवाने खचते, पिचते ते कसले तारूण्य? दिशाहीन जे कुढते, रडते ते कसले तारूण्य, वर्तमान निरखते, परखते होऊन त्याचा ठाव, जुने बदलते, नवे घडविते, यौवन त्याचे नाव! तारूण्य! ज्वलंत धमण्याचं अविरत स्पंदन निसर्गाने मानवाला दिलेला सर्वात श्रेष्ठ वर! निसर्गातल्या साम्राज्यातला बसंत! मनाच्या मयुराचा पुर्ण पसरलेला पिसारा, फुललेला शरीरभुजंगाचा डौलदार असा ठिपकेदारपणा! भावनांच्या उद्यानातील धुंद केवडा! विश्वकर्त्याच्या अविरत धावणाऱ्या रथातील सर्वात ऐटदार घोडा! माणसांना मानानं मिरवायचा काळ! काहीतरी मिळविल्याचा काळ! शक्तीचा आणि स्फुर्तीचा काळ! काहीतरी करावं असा खऱ्या अर्थाने वाटणारा उमेदीचा काळ!

''बालपणातील सर्व वस्तूंना हिरवा रंग असतो, तारूण्यातील सर्व वस्तूंना गुलाबी रंग असतो. क्षितिजाला भिडणाऱ्या आकाशाच्याही पलीकडे तारूण्याच्या दृष्टीची झेप जात असते जे गतिमान आणि प्रकाशमान असते त्याची त्याला सहज ओढ लागते. जिथं-जिथं आणि जे-जे अशक्य असेल ते-ते शक्य करण्याची अंगभूत उर्मी त्याच्यात असते जे सामर्थ्यशाली असते तेच तारूण्य! परंतू.... ''तारूण्याला नशा हवी पण नको अंधभोगाची. तारूण्याला नशा मिळावी ध्येयाची आणि त्यागाची. तारूण्याला झिंग हवी, पण ना फसवी मायावी. तारूण्याला स्वप्नील धुंदी.... स्वप्नी जाग असावी. ''जिवनाच्या रथाचे वेग तारूण्याच्या सारथ्याने आपल्या हाती घेतले की या रथाला पाच घोडे असतात.

''सामर्थ्य, ''महत्वाकांक्षा, ''निर्भयता, ''अभिमान, आणि ''औदार्य.

ज्या तरूणाजवळ 'सामर्थ्य' आहे तो जगातील सर्व पैजा सहजपणे जिंकू शकतो. हे निसर्गाचं देणं तरूणाजवळ असेल तर तो आपल्यावर येणाऱ्या संकटावर सहज मात करू शकतो, अन्यायाच्या पंख निखंदून काढून खऱ्या अर्थाने विजय असतो. ''महत्वाकांक्षा, हा तर तरूणाचा स्थायीभाव! ''मी मोठा होईन जशी परिस्थिती असेल त्या परिस्थितीला मी सहज वाकविन हा तारूण्याचा जोम असतो.

''निर्भयता म्हणजे तरूणाचा जिवन संगीतातलं सगळ्यात उंच शिखर! भय हा स्वराचा फुटलेला चिरका आवाज व चिरका आवाज कुणाला कधी तरी आवडेल का? जग उंच स्वरांनी तान ऐकायला तयार असते चिरका आवाज नाही! ''अभिमान असतो तारूण्याचा आत्मा! ज्या तरूणात अभिमान नाही तो माणूस नाही. तरूण हा आपल्या श्रध्दांचा नेहमी अभिमान बाळगत असतो!

''औदार्य तर तरूणाचा जणू अलंकारच आपल्या शक्तीच्या इतरांसाठी केलेला वापर आपण जगून इतरांना जगविण्याचे अभिमुत साधन!

★★★

# सांत्वन

जितेंद्र सुभाष वाणी
११ वी (वाणिज्य)

गरिबाघरी जन्मलो म्हणून दुःख होते मनी
पण..... सुखावतो एका विचाराने.
कमळ का नसते चिखलात?
पण..... असते नेहमी आनंदात.
वेढलेला असतो काट्यांनी
पण..... खुशीत नाचतो गुलाब.
तापत असतो नेहमी उन्हात
पण..... मधुर फळे देतो वृक्ष आम्हास.

# खुले आर्थिक धोरण

सुधीर पंजाबराव केने
एम.ए. (अर्थशास्त्र)

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचा जलद आर्थिक विकास घडून व त्याद्वारे आर्थिक मागासलेपणा दूर व्हावा यासाठी भांडवल शाही व साम्यवाद यातील मध्यममार्गी व्यवस्था म्हणून समाजवादी समाजरचना स्विकारण्यात आली. आणि पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून जलद आर्थिक विकास घडवून आणण्याचे धोरण आखण्यात आले. यासाठी देशात मिश्र अर्थव्यवस्था असावी असे धोरण आखण्यातआले मिश्र अर्थव्यवस्थेच्या धोरणाची योग्य अंमलबजावणी होण्याचे हेतूने देशाचे धोरण आखण्यात येवून ते जाहीर करण्यात आले.

मुलोद्योग हे सार्वजनिक क्षेत्रात सुरू करण्यात येवून सार्वजनिक क्षेत्राच्या विरताराचे व विकासाचे धोरण आखण्यात आले व त्याची अंमलबजावणी करण्यात आली. सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार व विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल व तंत्रज्ञानाची आयात करण्यात आली. हे धोरण सन १९९० पर्यंत असेच अवलंबिण्यात आले. परंतू या धोरणाचे दुष्परिणाम होऊन योजनाबाह्य खर्च मोठ्या प्रमाणात झाल्याने देशाची आर्थिक परिस्थिती बिघडली व चलनवाढीचा दर वाढत वाढत १७.०५% इतका झाला.

वरील परिस्थितीवर मात करून देशाची अर्थव्यवस्था गतीशील बनविण्यासाठी औद्योगिक व वित्तीय धोरणामध्ये मुलगामी बदल करणे आवश्यक होते. असे औद्योगिक व वित्तीय धोरणात मुलगामी बदल करणारे धोरण म्हणजेच वित्त खुले आर्थिक धोरण होय. .

## 'नवीन खुल्या आर्थिक धोरणाची वैशिष्टे'

वाढती लोकसंख्या कृषी व औद्योगिक उत्पादनातील घट, बेकारी, वाढती चलनवाढ, महागाई, सार्वजनिक क्षेत्रातील अपयश या सर्व समस्यांच्या संदर्भात वित्त खुले आर्थिक धोरण आखण्यात आले असून त्याची अंमलबजावणीही सुरू करण्यात आली आहे. या धोरणाची मुख्य वैशिष्टे आहेत. १) स्पर्धात्मक गुणवत्तेस प्राधान्य २) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभाग ३) उपलब्ध साधन सामुग्रीचा जनसामान्याच्या कल्याणाचे दृष्टीने अधिकाधिक उपयोग ४) परवाना देण्याच्या पध्दतीचे शिथिलीकरण आता खाजगी क्षेत्रातील १८ प्रकारचे उद्योग वगळता इतरांचा औद्योगिक परवान घेण्याची आवश्यकता नाही ५) मोठे उद्योग व उद्योग समुह यांनी करावयाच्या नवीन गुंतवणूकीवरील नियंत्रणे रद्द.

## 'या धोरणाचा सहकारी संस्थावर होणारा परिणाम'

नवीन खुल्या आर्थिक धोरणात स्पर्धात्मक गुणवत्तेत प्राधान्य दिले जाणार असल्याने यापुढे सहकारी संस्थानाही खाजगी व इतर संस्थांच्या स्पर्धेत काम करावे लागेल. तसेच आतापर्यंत ज्या निरनिराळ्या शासकीय सवलती व अनुदाने सहकारी संस्थांना मिळत होती तीही यापुढे हळुहळु कमी केली जातील व काही कालावधी नंतर बंद केली जातील असे दिसते.

नवीन खुल्या आर्थिक धोरणात खाजगी स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी सहकारी संस्थांना पुढील गोष्टींची आवश्यकता आहे.

१) सहकारी संस्थांनी आपल्या भांडवलाचा पाया मजबूत केला पाहीजे. बाहेरील कर्जावर अवलंबून राहून सहकारी संस्था स्पर्धेत यशस्वी होवू शकणार नाही. २) व्यावसायिक आधुनिक व्यवस्थापन आत्मसात करणे आवश्यक आधुनिक व्यवस्थापन हे विकासाचे साधन आहे हे लक्षात घेतले पाहिजे. ३) सहकारी संस्थांनी सेवक व मनुष्यबळ विकास होवून सर्वांनी निष्ठापूर्वक संस्था यशस्वी होण्यासाठी काम करणे आवश्यक आहे. व तसे वातावरण निर्माण करावे लागेल. ४) सरकारवर अवलंबून राहण्याची युक्ती करणे आवश्यक. ५) आपली कार्यक्षमता वाढविणे, नवीन तंत्रज्ञान स्विकारण्यात व ठराविक कालावधीत स्वयंपूर्ण होण्याची योजना आखणे ती पूर्ण करणे अशा अनेक गोष्टी सहकारी संस्थांना अंमलात आणाव्या लागतील.

या सर्व बाबी सहकारी संस्थांनी साध्य केल्यास त्या आपल्या पायावर उभ्या राहून आपला विकास करून घेऊ शकतील.

★★★



# वृक्षवल्ली आम्हा सोयरे

- योगेश प्रल्हाद महाजन
प्रथम वर्ष (कला)

वृक्षाचा सहवास तसा मानवाला अती प्राचीनच. भारतीय संस्कृती, साहित्य आणि कला या वृक्षाच्या अंगाउपांगावरच फुलली आहे. त्याच प्रतिबिंब प्राचीन साहित्यात ठिकठिकाणी उमटल आहे.

ऋषिमुनींनी तर वृक्षाची पुजा-अर्चा करून आपल्या शक्तिसाधनान त्याला देवत्व प्राप्त करून दिले आहे. मानवानेही या सवंगड्याचं ऋण पुजा करून फेडण्याचा प्रयत्न केला आहे.

सावित्रीच्या पतिव्रतानं अमर झालेला वटवृक्ष, भगवान बुध्दाच्या ज्ञानप्राप्तीसाठी गाजलेला बोधीवृक्ष, तसेच शाल्मिली वृक्ष, सर्व गत स्मृतींना उजाळा देत आहे. तसेच अनेक लेखकांनी वृक्षाचं गुणगान करून वृक्षाच्या प्रेमाचा झरा वाहत ठेवला आहे.

वृक्षाचं सौंदर्य आपणाला जागीच खिळवून ठेवत, त्याच नयनरम्य रूप वाहणारी लोभस काया सर्वांगावर फुललेली हिरवीगार पालवी, फुलांना येणारा मंदमधुर पुष्पगंध भरभरून सेवन करावासा वाटतो. त्यामुळे वृक्षाचे मुग्ध सौंदर्यही आगळेच ते सतत न्याहळीत राहावेसे वाटते. वृक्षाच्या पाना-फांद्यातून सळसळणारा कर्णमधुर आवाज ऐकावा अस कुणाला वाटत नाही.

ज्ञानेश्वरांनीही वृक्षाच्या या सात्विक दानाचा उल्लेख केला आहे ते म्हणतात, ''वृक्ष जाणाऱ्या येणाऱ्या मुसाफिरास पान, फुल, फळ व छाया मुक्तपणे देतो. एवढेच नाही तर त्याच्याजवळ चांगला-वाईट, भला-बुरा, गरिब-श्रीमंत असा मानवी भेदभाव नाही. उलट तो साऱ्यांना उपकाराने जखडून ठेवीत असतो. जो त्याची तोडणी करतो व जो त्याची पुजा करतो त्या दोघांनाही वृक्ष सारखेपणानेच वागवीत असतो किती हे त्याचं 'महानपण'. उन्हाळ्यात स्वतः उन्हात तळपायचं पण साऱ्या पांथस्थांना शीतल छाया द्यायची हाच त्याचा धर्म.

छायामन्यस्य कुर्वन्ती।

तिष्ठंती स्वयमतपे॥

वृक्षाच्या जीवनात वाचाळतेला अर्थ नाही ते मुक आहेत. पण त्यांच जीवन कृतीशील आहे स्वतःच शरीर झिजवून आयुष्यभर मोन धरून दुसऱ्यासाठी सदैव झटण्याच त्यांच जीण आहे.

वृक्षाच्या सहवासात वृत्ती प्रफुल्लित होते, चित्त स्थिर होतं मानवाचं दुःख कुठल्याकुठे पळून जात. मानवाला साहित्य, विज्ञान सुचतं वृक्षवनातून फिरताना अनेक शोध लागतात. म्हणून मनुष्य वृक्षाच्या सहवासात सतत राहण्याचा प्रयत्न करतो.

वृक्ष ही जिवात्म्याचीच स्वरूप आहेत शास्त्रीय दृष्ट्याही त्यांना सजीवच मानतात हे सत्य मानवाला तसेच साहित्यकारांना कितीतरी वर्षापूर्वी आकलन झालेलं आहे.

विजयादशमीच्या सणाला सोन्याची लयलूट करून विखुरलेल्या मानव जातीला एकत्र आणणारा आपटा, लग्नसमारंभ, पुजा-अर्चा यात अग्रभागी असलेला आमवृक्ष तसेच स्वतःचे शरीर झिजवून इतरांना सुगंध देणारा चंदनवृक्ष सर्वांना परीचयाचा आहे.

वृक्षाचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे हवा शुध्द करण्याचे काम प्रामुख्याने करीत असतात. वातावरणातील प्रदुषित कार्बन वृक्षाच्या पानाद्वारे शोषला जातो व तेवढ्याच प्रमाणात प्राणवायू हवेत सोडला जातो म्हणजे वातावरणातील विषारी वायूंना शुध्द करण्याचं काम वृक्ष करीत असतो. निसर्गातील एकूण प्राणवायुच्या १/३ प्राणवायू हा हिरव्या वृक्षाद्वारेच आसमंतात फेकला जातो.

जिथे घनदाट जंगल असते तिथे हमखास पाऊस पडतो. कारण झाडे पानावाटे बाष्परूप पाणी आसमंतात सोडतात, हवा थंड करतात ही थंड हवा बाष्पाचे ढग पुन्हा पृथ्वीवर पावसाच्या रूपात आणण्यासाठी मदत करतात याचप्रमाणे वृक्ष औषधी आहेत पर्यावरणाच संतुलन साधतात. वृक्ष जाळण्यासाठी इंधन देतात; इमारतीसाठी लाकूड देतात, कागदासाठी लगदा देतात, वृक्ष फळ, फुल, चारा देतात. थोडक्यात वृक्ष सर्वगुणसंपन्न आहे. तसेच ते 'बहुगुणी' आहेत.

वृक्ष बेरोजगारांना रोजगार देतात. डिंक गोळा करणे, पळसाच्या पायदळी बनविणे, लाख गोळा करणे, फळे गोळा करणे, सरपण गोळा करणे, विड्या बनविण्याची पाने, इत्यादी प्रकारचे रोजगार मानवाला देतात.

वृक्ष मानवाला त्याच्या आयुष्यात संपुर्ण साथ देतो. मनुष्य भूतलावर येतो तो वृक्षानं दिलेल्या लाकडी घरात व त्याचा आयुष्य आसमंतात विलीन करतो तेही काष्ठांच्या रूपात.

पण आज मात्र दु:ख होते की या बहुगुणी वृक्षाची वृक्षतोड मानवाने मोठ्या प्रमाणात सुरू केली. त्यामुळे त्यांची दुर्मिळता, प्रदुषण इत्यादि प्रश्न आपल्यासमोर उभे राहतात. अनेक वृक्ष दुर्मिळ होत जात आहेत. कित्येक तर नष्ट झाले आहे. उदा.- वनदेवतेची शोभा वाढविणारी सायकस, जिंको इत्यादी सारखी झाड लोप पावू लागली आहे.

खरं तर वृक्ष आपल्या कुटुंबियांपैकीच एक आहे. पर्यावरणाचा समतोल साधण्यास, घराची, बागेची, शहराची शोभा वाढविण्यास त्याची मदत होते. अशा या बहुगुणी वृक्षाला आपण प्राणपणाने जपावं म्हणजे तोही स्वत:चे प्राण धोक्यात घालून मानवाचा खरा मित्र राहील यात संशय नाही.

★★★

# प्रेम काय असावे ?

- राजेंद्र वसंत वाणी
द्वितीय वर्ष (विज्ञान)

शोधितो, विचार करीत असतो
प्रेम काय असावे ?
निळ्या नभातील पौर्णिमेचे
शीतल चांदणे तर नसावे
लाजऱ्या बुजऱ्या मुखावरील
गोड स्मित तर नसावे
शोधितो, विचार करीत असतो
प्रेम काय असावे ?
तळपत्या उन्हामध्ये वृक्षाची
शीतल सावली तर नसावे
जीवाची तहान शमविणारे
शीतल नीर तर नसावे
शोधितो, विचार करीत असतो
प्रेम काय असावे ?
जीवनाच्या बागेत उमलणारे
सुवासिक फुल तर नसावे
कदाचित प्रभात समयीचे
गुलाबी स्वप्न तर नसावे
प्रेम हे काय समजण्यासाठी
कुणावरी तरी एकदा प्रेम करावे
प्रेम करावे, प्रेम करावे....



# समान नागरी कायदा आवश्यकच आहे

धनंजय अच्युत देशपांडे
अकरावी (वाणिज्य)

दि. १० मे १९९५ ला सरला मुद्गल वि. भारत सरकार या वादात सर्वोच्च न्यायालयाने सर्व व्यक्तिगत कायद्यांचा परामर्श घेऊन आदेश दिला की समान नागरी कायद्याची अंमलबजावणी लवकरात लवकर होणे अत्यंत आवश्यक आहे. १९८५ ला मोहोम्मद अहमद खान वि. शहाबानो खटल्यात न्या. यशवंतराव चंद्रचूड यांनी दिलेल्या ऐतिहासिक निकालाची पुनरावृत्ती जवळजवळ १० वर्षांनी झाली. आणि मग न्यायालयाबाहेर नवीनच वादाला तोंड फुटलं की समान नागरी कायदा आवश्यक आहे का? या विषयावर कोणाच्याही भावना न भडकावता साधक बाधक चर्चा होण आवश्यक आहे. म्हणूनच हा लेखन प्रपंच.

जनता दल अध्यक्ष एस. आर. बोम्मई वि. भारत सरकार १९९४ या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्या. खंडपीठाने एकमताने एक अभूतपूर्व आदेश दिला.

Under Articles 14, 15 and 16 the constitution prohibits discrimination against any citizen on the grounds of his religion and gurantees equal protection of law and equal opportunity of public employment Article 44 enjoins upon the state to endeavour to secure to its citizens a uniform civil code.

These provisions by implications prohibits the establishment of a theocretic state and prevent the state either identifying itself with or favouring any particular religion or religions sect or denomiration.

The state is enjoined to accord equal treatment to all religions and religions seets and denominations. Secularism is thus more than a passive attitude of all religions tolerance. It is a positive concept of equal treatment of all religions... Any step in consistent with this constitutional policy is, in plain words unconstitutional.

याचा थोडक्यात अर्थ असा की घटनेच्या १४, १५, १६ कलमानुसार व्यक्तिमधे, धर्मामधे, समाजामधे भेदभाव करणं हे घटनाबाह्य ठरतं. तसंच ४४ व्या कलमानुसार समान नागरी कायदा आणण्यासाठी सरकार बांधील आहे. अयोध्या प्रकरणी सर्वोच्च नायालयाच्या निकालाचा उदो उदो करणाऱ्या आणि शहाबानो प्रकरणी घटना दुरूस्ती करणाऱ्या सरकारला सर्वोच्च न्यायालयाने चांगलीच चपराक ठेवली आहे. आपल्या घटनाकारांनी ४४ व्या कलमात सरकारने समान नागरी कायदा आणण्यासाठी प्रयत्नशील असावे. पण आज हिंदू व्यक्तिगत कायदा, मुस्लिम व्यक्तिगत कायदा, पारशी व्यक्तिगत कायदा, खिश्चन व्यक्तिगत कायदा एक ना दोन असे अनेक व्यक्तिगत कायदे आज अस्तित्वात आहेत.

सुरूवातीला हिंदू व्यक्तिगत कायद्यातील त्रुटी - Hindu adoption & maintenance Act चे ८ वे कलम हिंदू स्त्रीद्वारा दत्तक घेतल्या जाणाऱ्या अपत्याविषयी आहे. त्यानुसार केवळ एक अविवाहित अथवा घटस्फोटित स्त्रीच मूल दत्तक घेऊ शकते. विवाहित स्त्रीला मूल दत्तक घेण्याआधी आपल्या पतीची संमती घ्यावी लागते. मात्र विवाहित पुरूषाला मूल दत्तक घेण्याआधी आपल्या पत्नीची परवानगी घ्यावी लागत नाही.

जर न्यायदेवतेच्या नजरेत स्त्री आणि पुरूष समान आहेत तर हा भेदभाव का? हिंदू अविभक्त कुटुंब कायद्यानुसार

हिंदू कुटुंब प्रमुखाला आयकरासाठी दोन खाते दाखवता येतात पण इतर धर्मातल्या कुटुंब प्रमुखाला तसं करण्याचा अधिकार नाही. हिंदू असो वा मुसलमान शेवटी सर्व माणसचं आहेत ना मग हा भेदभाव तरी का?

मुस्लिम व्यक्तिगत कायदा हा शरियत वर आधारित आहे. मुख्यत: मुस्लिम पुरूषच घटस्फोट घेण्यात पुढाकार घेतो. घटस्फोटसुध्दा केवळ त्रिवार तलाक म्हणूनच घेतला जातो. घटस्फोटीत स्त्रीला तिच्या पतीकडून एका ठराविक मुदतीपर्यंतच भत्ता मिळतो. त्यानंतर ती असहाय महिला या व्यवहारी जगात एकटीच ठरते पुन्हा समजा एखाद्या घटस्फोटीत स्त्रीने जर पोटगीकरता न्यायालयात अर्ज केला तर अधर्म पसरविणाऱ्या तथाकथित धार्मिक नेत्यांचा ससेमिरा मागे लागतो. मग भीक नको पण कुत्रा आवर असं म्हणायची वेळ येते. या सगळ्या गोंधळात तो पुरूष मात्र चार विवाह करायला आणि मोडायला मोकळा. न्या. कृष्णा अय्यर यांच्य महत्वपूर्ण निकालानुसार जो AIR Kerala 1971 पान नं. २६१ वर आहे.

"Marrige under islam is but a civil contract and not any religions ceremony deemed obsolutely essential" याचा अर्थ असा की इस्लाम अंतर्गत विवाह हा धार्मिक संस्कार नसून केवळ एक करार आहे. जर हा करार आहे तर मग या कराराने भारतीय करार कायदा १८७२ च्या तरतूदींचे पालन करणे आवश्यक आहे.

खिश्चन व्यक्तिगत कायद्याअंतर्गत खिश्चन पुरूष पत्नीवर अनैतिकतेचा आरोप सिध्द करून घटस्फोट मिळवू शकतो. त्या स्त्रीला मात्र अनैतिकतेच्या आरोपाबरोबर क्रौर्य अथवा पतीने टाकून दिले आहे हे सिध्द करावं लागत. व्यक्तिगत कायद्यांमध्ये स्त्री हे एक खेळणं आहे. एकीकडे 'यत्र नार्यस्तू पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता' असं म्हणायचं आणि दुसरीकडे स्त्रीला मेंढरासारखं वागवायचं हे भारतातच होऊ शकतं कारण इथे कायद्यावर धर्माचे प्रभुत्व आहे त्रूटीपूर्ण व्यक्तिगत कायद्यांची तीनही उदाहरणे दाखवून द्यायला पुरेसे आहेत की कुठलाही व्यक्तिगत कायदा हा सर्वसमावेशक नसून संकुचित आहे.

अगदी Special marriage Act 1954 सुध्दा याला अपवाद ठरू शकत नाही. प्रत्येक धर्माकरता वेगवेगळे कायदे असून सुध्दा घटनेत नमूद केलेल्या स्त्रीपुरूष समानतेचा मात्र अभावच दिसून येतो.

कायदाच तू हिंदू, तू मुसलमान, तू खिस्ती असा भेदभाव करतो. कायदे वेगळे असल्याने मिळणारी वागणूक वेगळी, न्याय वेगळा, फायदे तोटे वेगळे; अशा स्थितीत सर्वजण राष्ट्राच्या दृष्टीने समान कसे होतील?

शहाबानो खटल्यामधे सर्वोच्च न्यायालयाने घटनेला धरून निर्णय दिला तरीही त्या समाजाने मानवतेचा, स्त्रीयांच्या सुरक्षिततेचा, प्रतिष्ठेचा कुठलाही विचार न करता शरियतवर हा घाला आहे आम्ही हे खपवून घेणार नाही. असा ओरडा केला. सरकारनेसुध्दा त्यांच्या दबावाला बळी पडून एका अबलेवर अन्याय केला.

'ऐका व्यथा सतीच्या न्यायासना विनंती
बोला कुणीतरी हो अजिता जिता कथाती
बुरखा झुगारूनी ती मरहूम यावन स्त्री
गर्दीत गारद्यांच्या सामील रामशास्त्री'

धर्माबद्दल माणसाच्या मनात जन्मत: जी आपुलकी आहे त्यामुळे त्याने केलेले नियम तो जसेच्या तसे पाळायला तयार होतो. परंतु कुठल्याही धर्मातले नियम हे त्या त्या काळात त्या त्या परिस्थितीत समाजातील विद्वानांनी केलेले नियम आहे. काळाप्रमाणे नियमही बदलायला हवेत कालबाह्य नियमांचं आचरण करणं म्हणजे बसत नसलेला सदराही अंगात कसाबसा घालण्यासारखं आहे. चार विवाह करणाऱ्या कुटुंब प्रमुखाला आपल्या मुलांची योग्य काळजी घेता येणार नाही. आणि मग साहजिकच संस्कारहीन निरक्षर आणि निरूत्साही तरूण, तरूणी अतिरेक्यांच्या हाती सापडतील. भारतात वाढणाऱ्या दहशतवादाचे हे सुध्दा एक महत्वाचे कारण आहे. भारतात १% गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांसाठी एकच फौजदारी कायदा आहे. पण ९९% सामान्य समाजाला मात्र समान नागरी कायदा नाही.

समान नागरी कायदा विरोध हा कलम २५ व २९



वर आधारित आहे. कलम २५ नुसार प्रत्येकाला आपला धर्म अनुसरायचा, रक्षिण्याचा आणि वाढविण्याचा अधिकार आहे. या आधारावर असंच म्हटलं जातं की 'शरियत' हे धर्मापासून वेगळं करता येणार नाही. आणि तसं झालं तर ते कलम २५ च्या विरूध्द ठरेल. पण धर्माची व्याख्या काय? स्वामी विवेकानंद म्हणतात. 'कर्म, उपासना, मन:संयम आणि ज्ञान या उपायांचा अवलंब करून स्वत:च अव्यक्त ब्रह्मस्वरूप व्यक्त करण्यातच सगळा धर्म आहे. थोडक्यात समाजाला धारण करतो तोच धर्म. मतं, वाद, क्रियाकांड, अनुष्ठानं, शास्त्र, मंदीर या सगळ्या गोष्टी गौण आहेत. ही झाली आपली अध्यात्मिक बाजू आता कायद्याच्या दृष्टीने विचार करायचा झाला तर याच कलम २५ च्या दुसऱ्या पोटकलमात स्पष्टपणे म्हटलं आहे की समानता अथवा समाज सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने व्यक्तिगत कायद्यात बदल करणे हे घटनाबाह्य ठरत नाही.

कलम २५ नुसार प्रत्येकाला आपली संस्कृती जोपासण्याचा पूर्ण अधिकार आहे. शरियत आणि इस्लामी कायदे हे त्यांच्या संस्कृतीचा भाग आहे असाही युक्तिवाद केला जातो. पण कुठलीच संस्कृती दुसऱ्याच्या अधिकारांचे हनन करण्यास सांगत नाही. ईश्वरदत्त कायदे वगैरे या गोष्टी फक्त इ.स. पूर्व ६२२ व्या वर्षीच बोलणं ठीक आहे. पण आज आपण २१ व्या शतकात आहोत आणि २१ व्या शतकाप्रमाणे वागणं हीच आज काळाची खरी गरज आहे. मनुष्य हा रूढीप्रिय माणूस आहे. पण जर कुठलीही परंपरा मग ती हिंदूची असो, मुसलमानांची असो अथवा खिश्चनांची असो ती जर राष्ट्रहीताला घातक ठरत असेल तर तिच्यावर बंदी घातलीच पाहिजे.

समान नागरी कायदा म्हणजे हिंदू कायदा असा गैरसमज कोणीही बांधवांनी करू नये. समान नागरी कायदा कुठल्याही धार्मिक नेत्यांच्या अथवा राजकीय नेत्यांच्या मागण्यांनुसार करू नये. अथवा तो करीत असतांना कुठलेही धार्मिक ग्रंथ विचाराधीन ठेवू नये. समान नागरी कायदा पर्यायी न ठेवता सक्तीचा झाला तरच तो उपयोगी सिध्द होऊन समानता प्रस्थापित होईल.

आपल्या उपनिषदांमधेसुध्दा हाच समानतेचा संदेश दिला आहे.

समानिवा आकूति समाना ह्रदयानिव।
समानमस्तुवोमन् यथावत् सुसहासती॥

याचा अर्थ असा की आमचे विचार, निश्चय, ह्रदये समान होवोत. सावरकरांच्या बलशाली राष्ट्राचे स्वप्न साकार करायचे असेल तर समान नागरी कायदा आवश्यक आहे.

★★★

# मनाचे श्लोक (विडंबन)

सुहास पाचपांडे
द्वितीय वर्ष (विज्ञान)

मना सज्जना, नित्य पाही सिनेमा।
नको लक्ष घालू, कधी मुख्य कामा॥
ट्रांझिस्टरची गळा घाली माळ।
विड्या फुंकणे चालू दे सर्वकाळ॥१॥
मना नित्य व्यासंग "वरळी धमाका"॥
बॅगी पँटची राहणी सर्व काळ।
चौकात चित्ती धरी स्मरणमाळ॥२॥
मना पाप ते श्रेष्ठ आधी करावे।
य:कश्चित ते सत्य सोडोनी द्यावे॥
मना कल्पना नको ती प्रॅक्टीकलची।
करी पाठ रे लिस्ट पहिले मुलींची॥३॥
कधी पुस्तकासी नको लाऊ हात।
तयाने घडे रे उगा क्षुद्र पाप॥
परिक्षेमध्ये करी रे नित्य कॉपी।
असे पास होण्यास ही युक्ती सोपी॥४॥
मना शिक्षकाचे नको ऐकू काही।
जमे तेवढे नित्य भांडीत राही॥
जरी जाशी वर्गा घडे तेही पाप।
म्हणूनी करी नित्य पीरेड्स ऑफ॥५॥

# दूरदर्शन आणि दुर्दशन

अमोल जोशी
११ वी (वाणिज्य)

दूरदर्शन म्हणजे दूरचे दर्शन; अर्थातच 'टेलीव्हीजन' ज्यायोगे आपण देश-परदेशातील पाहु व ऐकू शकतो पण.... 'दुर्दशन' म्हणजे मात्र वाईट दर्शन!

या दुरदर्शनलाच आज अगदी दुर्दशन असे म्हटले तरीसुध्दा काहीहि वावगे ठरणार नाही. अशी आज परिस्थिती आहे. या दूरदर्शनमुळेच आणि त्यावर प्रसारित होणारी अश्लील, हिडीस गाणी, अर्थहीन, दिशाहीन मालिका यामुळे सामान्य जनमानसावर काय वाईट परीणाम होतात, याची निव्वळ कल्पना करणेच बरे!

संस्कृत भाषेत एक सुभाषित आहे; ते असे
'दुर्जन परीहर्तव्यो, विद्ययालोंक्रत:पि सन।
मणिना भूषिता सर्प किर्मसौ न भयंकर॥

याचाच अर्थ म्हणजे; 'दुर्जन कितीही विद्याविभूषित असला तरी त्याला टाळावेच. अहो, मणिविभूषित, 'सर्प' सुध्दा भयंकरच असतो.''।

हा अर्थ साधा परंतु मार्मिक आहे आणि आज दूरदर्शनचीहि अशीच परिस्थिती आहे नाव फक्त दूरदर्शन; पण प्रत्यक्ष दर्शन मात्र अश्लील गाणी, विचित्र मालिका, बिभीत्स आणि तितकेच हिंसात्मक व गल्लाभरू चित्रपट यांचेच जास्त! या देशाचे भावी आधारस्तंभ म्हणवले जाणारे तरूण; हेच अंधानुकरण करतात आणि पार वाया जातात. काय होणार या देशाचे?

अमेरीकेमध्ये एका १३ वर्षाच्या मुलाने, सिनेमा पहात असतांना नायकाचे अनुकरण करत आपल्याच मित्राला सुरा मारून ठार केले; आता बोला! या दूरदर्शन बालमनावर किती प्रभाव पाडला आहे, याचेच हे उदाहरण आहे.

महात्मा गांधींनी एका संदेशात म्हटले होते की, ''परदेशी संस्कृतीच्या देवाण घेवाणींसाठी आपल्या देशाची कवाडे खुली ठेवा. पण ही संस्कृती आचरणांत आणू नका!'' आज दूरदर्शनवर नेमके उलट पहायला मिळते. भजन, कीर्तन, कव्वाली, गजल ही आपली संस्कृतीची दर्शकि न दाखवता 'पॉप, रँप,' यासारखा आचरट विचरट धांगडधिंगा प्रसारित केला जातो. अहो, जिथे 'राष्ट्रपित्याचे म्हणणे कुणी ऐकत नाही, तिथे आपले म्हणणे तर दूरच! याच पॉप-रँप चे अनुकरण, नव्हे अंधानुकरण आजचे युवक करतात व स्व-संस्कृतीस दुरावतात.

या दूरदर्शनवरच आणि इतर वाहिन्यांवर प्रसारीत होणारा एक कार्यक्रम म्हणजे 'फॅशन शो' मी तर म्हणेल, या कार्यक्रमात अंगप्रदर्शन कसे करावे, अंग कसे लचकवत चालावे, याचच पध्दतशीर दर्शन होते. खरं तर अंगप्रदर्शन करूनच आणि तोडक्या कपड्यातच काही सौंदर्य दिसत नसते. तर ते जन्मजात असावे लागते. पण हे सांगणार कोण?

सुस्मिता सेन आणि ऐश्वर्या रॉय या दोघी सौंदर्यसम्राज्ञी भारतातल्याच आहेत त्यांच्या सौंदर्याबाबतही दुमत नाही. पण---- पण सुस्मिता 'पेप्सी प्या, पेप्सी प्या' अशी जाहिरात करते, आणि ऐश्वर्या सुध्दा टि.व्ही. वर 'कोका कोला प्या' अशी जाहीरात करते. ती ही अपुऱ्या कपड्यातच! निर्लज्ञपणाचा तर कळसच जणू!

सध्या याच दूरदर्शनवर एक जाहिरात येते, ती 'पार्ले' बिस्कीटांची त्यात एक समारंभ एका घरात चालू असतो. चहा बिस्कीटे यांचे वाटपही चालू असते इतक्यात त्याच घरातील एक लहान मुलगी हळूच पळत जाते, एका 'ट्रे' मधील बिस्कीटे (गुपचूप) उचलते आणि आपल्या आजीकडे धावत जाते. त्या आजीला तोपर्यंत माहीतंच नाही की आपल्या नातीने बिस्कीटे चोरलीत पण जेव्हा हे तिला कळते, तेव्हा आजीचे प्रेम उचंबळून येते, आणि ती आपल्या नातीचे (आंजारून गोजारून) कौतुक करते. तेव्हाच एक गाणे लागते, ''जीने की राह यही है सहीऽऽ'' मुर्खपणाचा कळस म्हणजे ही जाहिरात.



यात चक्क घरी चोऱ्या करा आणि तोच जगण्याचा खरा मार्ग असे दाखवले, आणि लोक बघतात हे नवलच! आज आधीच मुलांवर (सु) संस्कार होणे अशक्य त्यातल्यात्यात ही जाहिरात म्हणजे चक्क मुलांच्या चोऱ्यांना प्रोत्साहनच!

दूरदर्शनवरच प्रसारीत होणारी मालिका म्हणजे 'कॅम्पस' त्यात चक्क कॉलेजच्या आवारातच मुले सिगरेट पितांना व चाकु, सुरे, तलवारींनी मारामारी करतांना दाखवली आहेत. हेच अंधानुकरण आज मुले करतात आणि 'भूषण' मानतात.

आपल्या भारतीय संस्कृतीत परस्त्रीला माता-भगिनी समान मानतात पण या पॉप-रॅप च्या प्रसारणात तर संस्कृती गुंडाळून हिडीस व विभीत्स दर्शनचं इतके असते की आपली संस्कृती काय, परंपरा काय, याचा विचारच नाही.

तेव्हा ज्या दूरदर्शनमुळे मुले हिंसक बनतात, वातावरण दूषित होते, राष्ट्रपित्याच्याही विचारांना धुडकावले जाते; ते दूरदर्शन काय कामाचे? 'ते' 'दूरदर्शन' नव्हे; तर दुर्दशनच'!

★★★

# काळजातल्या दुष्काळात

प्रशांत धांडे

काळजात पडलया दुष्काळाच्या
उपाययोजना तुझ्या काळजात
शोधायचं ठरवलं होतं
पण तू ही आलीस दुष्काळासारखी
आणि माझ्याजवळ
मळा-मळा अश्रू घाळत बसली!
आता मी एक करतो
तुझे अश्रू काळजात पेरून ठेवतो
नि अश्रू अंकुरल्यावर
बहरण्याचे स्वप्न पहात बसतो
तोवर तुझ्या-माझ्या वेदना
काळजाच्या उजाड माळरानात
मुक्तपणे चरू दे.

# वेदना

काळोखल्या काळजातल्या
घामेजल्या वेदनेनं
आसवं न घाळण्याची
मला शपथ घातली
अन् मी तिला
डोळ्यांच्या समोर
पापण्यांच्या आत
चिंब भिजलेली पाहिली!

# संस्कृत साहित्यातील सुभाषिते

भवानसिंग नारायण मेहेरे
१२ वी (कला)

''सुभाषित'' म्हणजे चांगले बोलणे. संस्कृत भाषेत सुभाषितांना अनन्य साधारण महत्व दिले जाते. जो विचार अनेक शब्दांनी सांगावा लागतो तो विचार सुभाषित पटकन् एखाद्या ओळीत सांगून जाते. सुभाषितांची शैली ही 'अल्पाक्षरी' परंतु 'सारगर्भ' अशी असते. मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रावर ही सुभाषिते प्रकाश टाकतात. माणसाला ती सुसंस्कृत व प्रभावित करतात. जीवनात प्रत्येक वेळेस ते आपल्याला स्पर्श करून जातात. संस्कृत वाङ्मयात सुभाषितांचा प्रचंड खजिना आहे तो मनाला आनंद तर देतो पण तत्वबोधही करून देतो. सुभाषितांचे महत्त्व सांगतांना सुभाषितकार म्हणतात -

पृथिव्यां त्रिणी रत्नानि जलमन्नं सुभाषितम्।

मूढै: पाषाणखण्डेषु, रत्नसंज्ञा विधीयते॥

म्हणजे पृथ्वीवर तीनच रत्ने आहेत. जल, अन्न/ आणि सुभाषिते. खरं तर मूर्ख लोक दगडाच्या तुकड्यालाच रत्न म्हणतात. ही सुभाषिते म्हणजे रत्नच होत. माणसाच्या अंगावरील आभूषणे, अलंकार ही माणसाची शोभा वाढवतात. त्याचप्रमाणे सुभाषिते ही संस्कृत साहित्याची शोभा वाढवतात.

पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राला पिळल्यानंतर त्यातून पाझरणाऱ्या अमृतमय रसासारखी सुभाषिते मधुर आहेत. सुभाषित म्हणजे माणसांचा (पुरूषांचा) श्रेष्ठ दागिना आहे. आणि तो पण एकमेवच.

सुभाषितांचे अनेक विषय आहेत. विद्या, धन, सज्जन, स्वार्थी, परोपकारी, दुर्जन, दैव.

विद्येवर सुभाषितांचे महत्व सांगतांना ते म्हणतात, विद्येशिवाय माणूस अपूर्ण आहे. विद्या हा माणसाचा उत्तम गुण आहे, हे सुरक्षित आणि गुप्त असे धन आहे. विद्येमुळे आपली सर्व ध्येये साध्य होऊ शकतात. खरे तर होतातच. सर्व सुख प्राप्त करून देणारी ही देवता आहे. म्हणूनच विद्या नसलेल्या माणसाची तुलना ही पशू सोबत होते.

सुन्दरोऽपि सुशीलोऽपि कुलीनोऽपि महाधन:।

शोभते न विना विद्यां सर्वस्य भूषणम्॥

माणूस देखणा असला तरी, सदाचारी, संपन्न असला तरी, चांगल्या कुळात जन्माला आला असेल, खूप श्रीमंत असेल, पण विद्या नसेल तर या सर्व गोष्टी अशोभनीय आहेत. कारण विद्या हेच सर्व सुखाचे भूषण आहे. आळशी माणसाचे वर्णन करतांना ते म्हणतात. तो सर्व सुखापासून वंचित राहतो. दुरावला जातो. त्याला विद्येचे महत्त्वच कळत नाही.

अलसस्य कुतो विद्या। अविद्यस्य कुतो धनम्।

अधनस्य कुतो मित्रम्। अमित्रस्य कुतो सुखम्॥

मानवी जीवन हे चमत्कृतीपूर्ण आहे. आणि कधी कधी तर विद्येपेक्षा धनाला जास्त महत्व दिले जाते. विद्याविभूषित पंडितापेक्षा एखाद्या सधन माणसाला प्रतिष्ठा मिळते. मान मिळतो. म्हणून सुभाषितकाराला नाइलाजास्तव म्हणावे लागते की ज्याच्याजवळ जास्त धन, पैसा तोच समाजात श्रेष्ठ, ही तर सत्य परस्थिती आहे.

॥सर्वे गुणा: कांचनमाश्रयन्ते॥

सज्जन आणि त्यांची परोपकारी वृत्ती यावर भाष्य करतांना सुभाषितकारांची लेखणी अव्याहत चालूच असते. कारण समाजप्रबोधन, सुसंस्कृत समाजाची निर्मिती तेच तर त्यांचे एकमेव कार्य सज्जनाला त्यांनी छाया देणाऱ्या आणि स्वत: उन्हात तिष्ठत असणाऱ्या वृक्षाची उपमा दिली आहे. तसेच ''नारिकेलसमाकारा'' म्हणून देखील संबोधिले जाते. म्हणजे नारळ वरून खडबडीत असले तरी आतून मऊ, गोड, मधुर असते. तसेच उद्योगाला पण खूप महत्त्व दिले जाते. कोणतेही कार्य उद्योगाशिवाय साध्य होऊ शकत नाही. संपन्न होत नाही.

''उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथै:।''

दैव सुध्दा उद्योगाशिवाय, प्रयत्नाशिवाय साधत नाही. याचं समर्थन करतांना कवि एक दाखला देऊन म्हणतात.

यथा ह्येकेन चक्रेण न रथस्य गतिर्भवेत्।

एवं पुरूष कारेण विना दैवं न सिध्यति॥

म्हणजे ज्याप्रमाणे एका चाकाने रथाला गति प्राप्त होत नाही, त्याचप्रमाणे प्रयत्नाशिवाय यश प्राप्त होत नाही.

चमत्कृती म्हणजे उखाणे, कोडे हे सुध्दा त्यात आढळतात. उदा. श्लोकाच्या प्रत्येक चरणात प्रश्न विचारले जातात आणि शेवटच्या चरणात त्याचे उत्तर त्यामुळे चमत्कृति निर्माण होते. ती अशा प्रकारे-

कस्तुरि जायते कस्मात् को हन्ति करिणां शतम्।

किं कुर्यात् कातरो युध्दे मृगात् सिंह: पलायते॥

म्हणजे कस्तुरी कोणापासून मिळते? शंभर हत्तींना कोण मारतो? भित्रा युध्दात काय करतो? या तीनही प्रश्नाचे उत्तर आहे.

मृगात् सिंह पलायते (मृगापासून सिंह पळतो)

जीवनाचा सर्वकष विचार करतांना सुभाषितकारांची तेजस्वी बुध्दी ही विनोदाला सुध्दा आपल्या काव्याचा विषय बनवते.

कमले कमला शेते हर: शेते हिमालये।

क्षीराब्धौ च हरि: शेते मन्ये मत्कुणशंकया॥

जिल्हा पातळीवर जे संघ विजयी होतात त्यांना विभागीय पातळीवर खेळण्याची संधी मिळत असते. वरील सर्व विजयी संघ विभागीय पातळीवर खेळलेले आहेत. पैकी बॉल मिंटनचा संघ विभागीय पातळीवर विजयी होऊन तो नागपूर येथे राज्यपातळीवर खेळण्यासाठी केला तेथे मात्र औरंगाबादच्या अजिंक्य संघाशीच प्रथम गाठ पडल्यावर अपयश पदरी आले. मात्र संघातील रणजित राणे याच्या दैदिप्यमान खेळामुळे त्याची राज्याच्या संघासाठी निवड होऊन तो राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी ''गुवाहाटी'' येथे रवाना तसेच गुणेश प्रकाश जैस्वाल हा खेळाडू खुल्या (ओपन) बॉल बॅडमिंटन संघामध्ये राज्य स्तरावर खेळून आला. या त्याच्या यशाने प्राचार्य डी. एस. नेमाडे यांनी त्याचे विशेष कौतुक केले.

तसेच विभागीय पातळीवर पोहणे या स्पर्धेत -

१) कु. दिपाली सोपानराव पाटील
२) कु. पद्‌मजा विनोद काळे
३) कैलास भालचंद्र नगरकर

हे वैयक्तिकरित्या विजयी होऊन राज्यस्तरावर खेळण्यासाठी सातारा येथे गेलेत. मात्र तेथे पुणे मुंबईच्या खेळाडूंपुढे टिकाव धरू शकले नाहीत.



वर्षभराच्या कामकाजामध्ये जिमखाना कमेटी सदस्य, प्राचार्य डी. एस. नेमाडे, उपप्राचार्य व्ही. जे. चौधरी, उपप्राचार्य ए. बी. पाटील, उपप्राचार्य पी. एल. कोल्हे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच उल्लेखनीय म्हणजे, प्रा. आर. बी. चौधरी व प्रा. सौ. एल. एस. पाटील यांनी संघ व्यवस्थापकाचे काम करून सहकार्य केले, तसेच प्राध्यापक, मित्रवर्ग व इतर क्रीडा रसिक यांनी केलेल्या मदत व सहकार्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.

क्रीडा प्रमुख
पी. डी. तळेले.

## एन. सी. सी.

## राष्ट्रीय छात्र सेना

दरवर्षा प्रमाणे १९९५-९६ या वर्षीही २६६ विद्यार्थी व ५४ विद्यार्थिनींनी राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये प्रशिक्षण घेतले. लष्करी प्रशिक्षणाबरोबरच वृक्षारोपण, रक्तदान, ट्राफिक कंट्रोल, प्रौढशिक्षण, पल्स पोलिओ मोहिम इ. कार्यक्रमात छात्रसैनिक सहभागी झाले.

ह्या वर्षी महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर नगराध्यक्ष माननीय बंडु दादा काळे यांचे हस्ते वृक्षारोपण होवून विद्यार्थ्यांनी विविध झाडे लावली. तसेच आपल्या महाविद्यालयातील SUO वैशाली नेरकर हिने लष्करी प्रशिक्षणाबरोबर ज्युडो कराटे मध्ये विशेष प्राविण्य मिळविले तिला राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये ऑरेंज बेल्ट प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर तिने दोन सुवर्णपदके व एक रजतपदक मिळविले. तसेच UO श्वेता समदाणी हिला महाविद्यालयाची सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी (B.S.) म्हणून निवडण्यात आले. ही फार अभिमानाची बाब आहे.

दरवर्षा प्रमाणे या वर्षी ही अमरावती येथे प्रा. आर. डी. कॅम्प संपन्न झाला. त्यात आपल्या महाविद्यालयातील SUO पंकज मालवी, SUO प्रविण चव्हाण, UO विजय महाजन, UO अंबादास ठाकूर, UO संजय मोरे, SGT भावना चौधरी, CPL वैशाली गोसावी, L/CPL अल्का सिंग, L/CPL नेहल जैन, L/CPL तेजस्विनी चौधरी, CPL सीमा राऊत, CPL मंजुषा आयाती, CPL तृप्ती सपकाळे, CDT नंदा पाटील हे सहभागी झाले होते. ह्या सर्वांची पुढे CATC-I साठी नगर येथे निवड झाली होती. तेथे अमरावती गृपचा परेड कमांडर म्हणून SUO प्रविण चव्हाण हा होता. तर अमरावती गृपची बेस्ट कॅडेट म्हणून अल्का सिंग हिची निवड झाली होती. तसेच दौंड येथे झालेल्या प्री. बी. एल. सी. मध्ये UO सतिष मोरे सहभागी झाला होता. तसेच विद्यार्थिनींचा प्री. बी. एल. सी. अंबरनाथ येथे पार पडला. त्यात नंदा पाटील, सीमा राऊत हे सहभागी झाले होते. ह्यावर्षीचा ''ऑल इंडीया ॲडव्हान्स लिडरशीप कॅम्प'' खम्मम (आंध्र प्रदेश) येथे झाला. त्यात UO राहुल वानखेडे, SGT नितीन खोंडे, SGT अजय भाटिया हे सहभागी झाले होते. तेथे महाराष्ट्राचे नेतृत्व UO राहुल वानखेडे याने केले. आग्रा येथे झालेल्या नॅशनल इंटिग्रेशन कॅम्पमध्ये CPL महेंद्र पंजे, CPL राजन अत्तरदे, CPL शिरीष नेमाडे, CPL राजेश भोळे, L/CPL मनिष चौधरी, CPL सचिन राजपूत, L/CPL कपिल चौधरी, CDT मनोज चौधरी, CDT समीर तळेले, CDT गणेश कोल्हे इ. छात्रसैनिक व कॅप्टन एस. एम. रडे हे सहभागी झाले होते. विद्यार्थिनींचा नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प सिरवेल येथे पार पडला. त्यात तृप्ती चौधरी, CDT स्वप्ना पाटील, CDT ममता छाजेड, CDT रश्मी भंगाळे, CDT मनिषा शिंपी, CDT ज्योत्स्ना चाळके, CDT जागृती देशपांडे, CDT वर्षा पाटील, CDT सोनाली भंगाळे इ. छात्रसैनिक सहभागी झाले होते. तेथे सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये त्यांनी प्रथम बक्षिस मिळविले. दरवर्षी प्रमाणे शिवाजी ट्रेकींग कॅम्प कोल्हापूरला झाला. त्यात SGT सैय्यद अली निसार अली, CDT युवराज पाटील, CDT

काझी, CPL अमर कस्तुरे हे सहभागी झाले. विद्यार्थ्यांचा नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प बेलेवाडी (पुणे) येथे संपन्न झाला.
त्यात SGT महेंद्र पांडे, SGT सचिन पाटील, प्रशांत अत्रे, पुंडलिक पाटील, CPL विनीत कुलकर्णी, संजय माळी,
महेश पाटील, संजय शिवदे, जितेंद्र वारूळकर, अतुल कुलकर्णी, CPL राहुल नट्टे, रामनरेश परदेशी, योगेश सावदेकर
हे सहभागी झाले होते. तसेच पद्मालय येथे झालेल्या सायकल एक्सिपीडीशन मध्ये ३० विद्यार्थी सहभागी झाले
होते. त्यात UO सतिष मोरे व UO संजय कुलकर्णी ह्यांनी नेतृत्व केले. या एक्सिपीडीशन मध्ये कॅप्टन एस. एम.
रडे हे सुध्दा सहभागी झाले होते.

ह्या वर्षी आपल्या महाविद्यालयात एक आगळावेगळा कार्यक्रम पार पडला आणि तो म्हणजे एन.सी.सी. चे वार्षिक
स्नेहसंमेलन. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे प्रभारी पोलिस अधिक्षक अतुलचंद्र कुलकर्णी हे उपस्थित
होते व अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य व्ही. जे. चौधरी हे होते. या कार्यक्रमासाठी SUO विलास बोंडे, SUO
संजय चौधरी, SUO रविंद्र ठाकूर, SUO रविंद्र चौधरी, SUO मनोहर वाघ, SUO वैशाली कुलकर्णी, SUO वैशाली
नेरकर, SUO पंकज मालवी, SUO संदेश सुरळकर, SUO प्रविण चव्हाण, UO श्वेता समदाणी, UO राहुल वानखेडे,
UO अंबादास ठाकूर, UO सतिष मोरे, UO संजय कुलकर्णी, SGT भावना चौधरी, SGT नितीन खोंडे, SGT अजय भाटिया, SGT
भुषण आग्रे यांनी मोलाचे सहकार्य केले.

विशेष महत्वाची बाब म्हणजे दर वर्षाप्रमाणे ह्या वर्षीही आपल्या महाविद्यालयाचे UO विजय महाजन व UO
संजय मोरे हे दोन छात्रसैनिक दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताकदिन सोहळ्यात सहभागी झाले होते. विशेष गोष्ट म्हणजे
UO विजय महाजन ह्याची P.M. रॅलीचा परेड कमांडर म्हणून निवड झाली व UO संजय मोरे याची राजपथ संचलनासाठी निवड
झाली.

ह्या वर्षीचा 'B' सर्ट परिक्षेचा निकाल ९९% लागला असुन 'C' सर्ट परिक्षेचा निकाल १००% लागला. त्यात
SUO संजय चौधरी, SUO विलास बोंडे, SUO मनोहर वाघ तर विद्यार्थिनींमध्ये SUO वैशाली नेरकर, वैशाली भोळे, गायत्री सपकाळे,
वैशाली कुलकर्णी, सोनल खंदार, प्रिती नाईक, स्वराली राजदेरकर हे उत्तीर्ण झाले.

तसेच आपल्या महाविद्यालयाचे एन.सी.सी. ऑफीसर कॅप्टन एस.एम.रडे यांची मेजर म्हणून तर लेफ्टनंट आर.
आर. भालसिंग यांच कॅप्टन म्हणून पदोन्नती झाली आहे. ह्यावर्षी पोलिस ग्राऊंडवर होणाऱ्या परेड संचलनासाठी एन.सी.सी.
प्लाटुनचे नेतृत्व SUO पंकज मालवी याने केले तर दर्शक म्हणून SUO प्रविण चव्हाण हा होता. हा प्लाटुन बेस्ट
प्लाटुन म्हणून काढण्यात आला. त्याचप्रमाणे विद्यार्थिनींच्या एन.सी.सी. प्लाटुनचे नेतृत्व UO श्वेता समदाणी हिने केले.

वर्षभरातील स्पर्धामध्ये बेस्ट सिनिअर अंडर ऑफीसर पंकज मालवी, बेस्ट रॅंक होल्डर, SUO प्रविण चव्हाण,
बेस्ट ज्युनिअर अंडर ऑफीसर राहुल वानखेडे, बेस्ट फायटर UO सतिष मोरे, फर्स्ट इन मॅपरीडींग SUO संदेश
सुरळकर, फर्स्ट इन क्विझ दिपक पाटील, फर्स्ट इन क्रॉस कंट्री जितेंद्रसिंग परदेशी, बेस्ट कॅडेंट आशिष कापसे
आणि बेस्ट सर्व्हिस इन एन.सी.सी. अंबादास ठाकूर तर विद्यार्थिनींमध्ये बेस्ट अंडर ऑफीसर श्वेता समदाणी, बेस्ट
कॅडेट अल्का सिंग, फर्स्ट इन मेडीकल SGT भावना चौधरी, बेस्ट सर्व्हिस CPL रूपाली कुलकर्णी, फर्स्ट इन क्रॉस
कंट्री मंजुषा आयाती, फर्स्ट इन क्विझ रत्ना पाटील फर्स्ट इन मॅपरीडींग मीना परदेशी, फर्स्ट इन नंदा पाटील,
बेस्ट फायटर सीमा राऊत यांना प्राचार्य डी. एस. नेमाडे यांच्या हस्ते मेडल प्रदान करण्यात आले.

तसेच विद्यार्थ्यांचे ह्या वर्षीचे वार्षिक प्रशिक्षण शिबीर बांभोरी येथे पार पडले. ह्या कॅम्पचे नेतृत्व SUO प्रविण
चव्हाण यांनी केले. तर या कॅम्पला कर्नल व्हि. के. दत्ता तसेच कुलगुरू एन. के. ठाकरे यांनी भेटी दिल्या. या
शिबीरात विविध उपक्रमांमध्ये SUO पंकज मालवी, SUO संदेश सुरळकर, UO राहुल वानखेडे, UO अंबादास ठाकूर,
UO सतिष मोरे यांनी प्राविण्य मिळविले.



एन.सी.सी. च्या वेळोवेळी होणाऱ्या उपक्रमात बटालियन प्रमुख एच. एस. त्रिपाठी साहेब व पी. आय. स्टाफ,
मु. जे. महाविद्यालय जिमखाना विभाग, भूगोल विभाग यांचे सहकार्य लाभत असते.

कॅप्टन एस. एम. रडे
एन.सी.सी. ऑफीसर

मेजर सौ. मालती जावळे
कम्पनी कमांडर

कॅप्टन आर. आर. भालसिंग
एन.सी.सी. ऑफीसर

## राष्ट्रीय सेवा योजना

या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाची सुरूवात महाविद्यालयाच्या परिसरात जळगावचे प्रथम नागरिक
माननीय बंडूदादा काळे व प्राचार्य नेमाडे यांच्या हस्ते वृक्षारोपण व वृक्ष संगोपण उपक्रमाने करण्यात आली. राष्ट्रीय
सेवा योजनेच्या उद्बोधनाच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व युवक, राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दीष्ट्ये व या वर्षातील
नवीन उपक्रमाविषयी उपप्राचार्य ए. बी. पाटील, पी. एल. कोल्हे कार्यक्रम अधिकारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### वृक्ष मित्र मंडळ –

महाविद्यालयाच्या परिसरातील उ.म.वि. परिसरातील दत्तक खेडे कानसवाडे येथील वृक्ष संगोपनासाठी राष्ट्रीय सेवा
योजनेतील विद्यार्थ्यांचे वृक्ष मित्र मंडळ स्थापन करण्यात आले. महाविद्यालयाच्या परिसरातील श्रम रोप वाटिकेतील
रोपाची देखभाल करण्यासाठी २५ विद्यार्थ्यांच्या गटाकडे कामे सोपविण्यात आली. श्रम रोप वाटिकेतील रोपांची वाटप
कानसवाडे परिसरातील शेतकऱ्यांना शेतांच्या बांधावर लागवडीसाठी करण्यात आली.

### जनजागृती उपक्रम –

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवा निमित्त २ ऑक्टोबर १९९५ रोजी महाविद्यालय व शहराच्या
विविध भागात विशेष उपक्रम राबविण्यात आले. सकाळी ७.३० वाजता प्राचार्य नेमाडे यांनी विद्यार्थ्यांना समाजसेवेची
शपथ दिली. महाविद्यालयात गांधीजींचे विचार मंथन या विषयी चर्चा करण्यात आली. महाविद्यालयातून शहराच्या विविध
भागातून जनजागृती मोहीम राबविण्यात आली. स्टेडियम ग्राऊंडवर मा. स. नि. देसाई, कुलसचिव, उ.म.वि. यांनी
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गांधीजींचे तत्वज्ञान प्रचार व जनजागृती मोहीम दत्तक ग्राम कानसवाडे येथे राबविण्यात
आली.

### सद्भावना दिन –

भारताचे लाडके पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जन्मदिना निमित्त दत्तक ग्राम कानसवाडे गावात प्रत्येक घराजवळ
शेतकऱ्यांच्या खळ्यात फळझाडांची लागवड करण्यात आली. आंबा, लिंबू, बदाम, पेरू, सीताफळ, शेवगा या फळझाडांची
लागवड करण्यात आली. कानसवाडी ग्रामस्थ, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व विद्यार्थी यांनी सद्भावना दिना निमित्त
फळझाडांची लागवड करण्यात आली. या उपक्रमात महिला व पालकांचा सहभाग उल्लेखनीय होता.

## साक्षरता सप्ताह –

जागतिक आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त ८ सप्टेबर ते १४ सप्टेबर पर्यंत साक्षरता विषयी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. तज्ञ व्यक्तींची भाषणे साक्षरता दिंडी, चित्रकला प्रदर्शन, चर्चासत्र, महिला शिक्षण या विषयी कार्यक्रम राबविण्यात आले. कानसवाडी, हरिविठ्ठल नगर, महाविद्यालयाच्या परिसरात चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कानसवाडे येथे साक्षरता दिंडींची सुरूवात माजी सरपंच विकासभाऊ सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांचे उपस्थितीत करण्यात आले. साक्षरता कार्यक्रमात महिलांचा सहभाग या विषयी चर्चासत्राचे आयोजन कानसवाडे येथील समाज मंदीरात करण्यात आले.

## एडस् जनजागरण मोहीम –

आंतरराष्ट्रीय एडस् दिनानिमित्त १ डिसेंबर ९५ रोजी जळगाव शहर परिसरात मु. जे. महाविद्यालय, जेट किंग जळगाव, के.सी.ई. सोसायटीचे माध्यमिक विद्यालय यांच्या विद्यमाने भव्य एडस् जनजागरण मोहीम राबविण्यात आली. एडस् जनजागरण मोहीमेची सुरूवात प्राचार्य, मा. मिलिंद चौधरी डायरेक्टर जेटकिंग, उपप्राचार्य कोल्हे, मुख्याध्यापक फेगडेसर यांच्या उपस्थितीत करण्यात आली. एडस् विषयी बॅनर, फलक हॅण्डबील, घोषवाक्य यांच्या सहाय्याने शहराच्या विविध भागात एडस् रॅली काढण्यात आली. नेहरू पुतळा ते टॉवर पर्यंत १००० विद्यार्थी व विद्यार्थिनी एडस् दिनानिमित्त मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयात जिमखाना विभागात एडस् चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. दत्तक गाव कानसवाडे येथे एडस् जनजागरण कार्यक्रमांतर्गत उपक्रम राबविण्यात आले.

## पल्स पोलियो कार्यक्रम –

९ डिसेंबर ९५ व २६ जानेवारी ९६ रोजी जळगाव शहरातील विद्युत कॉलनी मु. जे. महाविद्यालय परिसरात राष्ट्रीय सेवा योजनेतील मुले व मुली यांनी सर्वेक्षण करून ३ वर्षाखालील मुलांना पोलियो डोस देण्याचे कार्यात नगरपालिकेच्या कर्मचारी वर्गाला मदत केली. हरिविठ्ठल नगर, कानसवाडे येथे पल्स पोलियो डोस देण्यासाठी व जनजागृतीसाठी २ गृप पाठविण्यात आले होते. कानसवाडे येथे महिलांनी आपल्या ६५ बालकांना पल्स पोलिओ डोस देऊन राष्ट्रीय कार्याला मदत केली.

## हिवाळी शिबीर उ.म.वि. परिसर –

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबीर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बांभोरी परिसरात घेण्यात आले. शिबीराच्या कालावधीत श्रमदान, वृक्ष संगोपण, सर्वेक्षण, बौध्दिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. उ.म.वि. परिसरातील ५६०० झाडांना ओळे करणे, आगीपासून बचावासाठी ५ फुट बाय ५ फुट क्षेत्रातील कोरडें गवत काढून प्रत्येक झाडाला २ बादल्या पाणी टाकण्याचे कार्य शिबीराच्या कालावधीत करण्यात आले. गेस्ट हाऊस, कुलगुरू निवास, लेडिज होस्टेल, प्राध्यापक निवास परिसरातील निगा घेण्यात आली.

विद्यापीठाच्या परिसरातील रस्त्यावरील गवत काढणे, मुरूम पसरविणे व दुरूस्तीचे कामे करण्यात आली. टाकरखेडे गावातील पर्यावरण सर्वेक्षणाचक कार्य करण्यात आले. विविध तज्ञ व्यक्तिंची भाषणे, चर्चासत्र, गटवार चर्चा, व्यसनमुक्तीचा विशेष कार्यक्रम शिबीराचे कालावधीत राबवण्यात आले. मा. कुलगुरू एन. के. ठाकरे, मा. सी. टी. पाटील, मुख्य अभियंता, उ.म.वि. माजी खासदार भाईसाहेब वाय. एस. महाजन, मा. डॉ. जी. पी. पाटील व सौ. पाटील (यु.एस.ए.), प्राचार्य नेमाडे, उपप्राचार्य व्ही. जे. चौधरी, महाविद्यालयातील प्राध्यापकांनी शिबीराला भेटी देऊन शिबीरातील उपक्रमाविषयी कौतुक केले.



## विद्यार्थ्यांचे सुयश –

एफ.वाय.बी.ए. तील विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद, समाज कल्याण विभागांतर्गत आयोजित केलेल्या व्यसनमुक्ती पथनाट्य स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळविले. श्री. सुरेश पाटील लिखीत परिवर्तन पथनाट्याचे प्रयोग जळगांव शहराच्या कॉलनीत झोपडपट्टीत व कानसवाडे येथे दाखवण्यात आले. वर्धा येथील राष्ट्रीय स्तरावरील गांधी विचार प्रणालीच्या शिबीरासाठी संदीप चौधरी, सोनाली वराडे, नितिन बडगुजर यांची निवड झाली. विद्यापीठस्तरीय शिबीरात राजेंद्र सुर्यवंशी, ललीता ठोंबरे, हेमांगी उपाध्ये हे सहभागी झाले होते. किशोर कोल्हे, महेंद्र धांडे, बोरोले, किशोर बडगुजर संदीप चौधरी, भालेराव यांच्या कार्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम राबवण्यासाठी प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठातील अधिकारी, कानसवाडे येथील सरपंच, ग्रामस्थ, हरीविठ्ठल नगरातील नागरिक, माझे सहकारी प्राध्यापक व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

कार्यक्रम अधिकारी
डॉ. ए. एस. भोळे.

# ग्रंथालय वार्ता

ज्ञान वृध्दींगत होण्यासाठी ग्रंथाची गरज असते. म्हणून आमच्या महाविद्यालयाचे वैशिष्ट्ये कोणत असेल तर सर्वांगी समृध्द पुस्तकांनी भरभरून असलेला ग्रंथागार होय. ग्रंथालय वर्धिष्णू असते याप्रमाणे दरसाल ग्रंथालयात पुस्तकांची भर पडत असते. कॉलेजच्या वार्षिक बजेट मधून यंदा ७०१ पुस्तके खरेदी करण्यात आलेली आहेत. त्याच प्रमाणे कनिष्ट महाविद्यालयाच्या बजेट मधून ६३० पुस्तके खरेदी करण्यात आलेली आहेत. त्यामुळे महाविद्यालयाच्या पुस्तकांची संख्या १,०३,४४२ झाली आहे. या शिवाय १५० नियतकालिके, मासिके ग्रंथालयात येतात.

यावर्षी ग्रंथालयाच्या संदर्भात विशेष बाब म्हणजे प्रत्येक शाखेला प्रत्येक वर्गात गुणानुक्रमाने प्रथम आलेल्या तीन विद्यार्थ्यांना पुस्तके, मासिके व इतर सामान्यज्ञान यावरील ग्रंथ उपलब्ध करून दिलेले आहेत. या सवलतीचा ६० विद्यार्थ्यांनी लाभ घेतलेला आहे.

याशिवाय गेल्या दोन वर्षापासून झेरॉक्स मशिन ग्रंथालयात उपलब्ध झालेले आहे. त्यामुळे सर्वांना त्याचा फायदा मिळत आहे.

प्र. दे. बऱ्हाटे
ग्रंथपाल

## ''विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृह''

सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या वसतिगृहात अनेक विधायक व सृजनशील उपक्रम राबविण्यात आले. वसतिगृहाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थी व विद्यार्थिनींची राहण्याची स्वतंत्र, उत्तम व्यवस्था होय. तसेच वसतिगृहातील विद्यार्थी व विद्यार्थिनी क्लब पध्दतीने मेस चालवतात ही सुध्दा वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे.

अभ्यासाबरोबरच विद्यार्थी-विद्यार्थिनींवर संस्कार करण्याच्या दृष्टीने अनेक कार्यक्रम राबविले जातात. त्यांच्या सुप्त गुणांचा विकास होऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा या दृष्टीने वसतिगृहात 'कला व सांस्कृतिक मंडळाची' स्थापना केलेली आहे. 'कला व सांस्कृतिक मंडळाचे' उद्घाटन प्राचार्य श्री. द. स. नेमाडे यांच्या हस्ते होऊन त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना होऊन त्यांना प्रेरणा मिळाली.

विद्यार्थिनींसाठी डॉ. उल्हास पाटील यांचे 'स्त्रियांचे आरोग्य' या विषयावर भाषण आयोजित केले होते. त्यामुळे विद्यार्थिनींना शारिरिक व मानसिक आरोग्य तसेच स्त्रियांना होणारे रोग त्यावरील उपाय, रोग होऊ नयेत म्हणून सावधगिरी इ. गोष्टींची माहिती मिळाली.

विजयादशमीच्या सुमुहूर्तावर परंपरेप्रमाणे वसतिगृहातील विद्यार्थी विद्यार्थिनीं तर्फे मेस कर्मचाऱ्यांना श्री. विद्याधर पानट यांच्या हस्ते स्नेहपूर्वक भेट वस्तु देण्यात आल्या. त्यादिवशी सहभोजनाचा कार्यक्रम झाला.

श्रीमती मरियम ढवळे यांचे 'विद्यार्थ्यांचे प्रश्न' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी प्रश्नांबरोबरच विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच श्री. श्रीनिवास इनामदार यांचे विद्यार्थ्यांना ''स्पर्धात्मक परीक्षांची तयारी कशी करावी'' या बाबत मार्गदर्शन मिळाले त्यांच्या व्याख्यानाने अनेक विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांची स्फूर्ति मिळाली.

विद्यार्थिनींनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून त्यात उत्स्फूर्तपणे भाग घेतला. त्यात देशभक्तिपर गीत, भक्तिगीत, नृत्य, वात्राटिका, नाट्यछटा इ. चा समावेश होता.

विद्यार्थ्यांकरिता 'वसतिगृहातील मुलांचे आरोग्य' या विषयावर डॉ. रणजीत चव्हाण यांचे व्याख्यान आयोजित केले होते. तसेच 'विविध राष्ट्रीय विषय' या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या. विद्यार्थिनींची पाटणादेवी, कालीमठ व वेरूळ येथे सहल आयोजित केली होती. वर्षभरात मेस मॅनेजर श्री. कोपरकर व खंडारे यांनी मेसचे कामकाज अत्यंत चोखंदळपणे हाताळले. वसतिगृहाच्या कामकाजांसाठी प्राचार्य व उपप्राचार्य यांचे वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन लाभले. विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि वसतिगृहातील कर्मचाऱ्यांनीही वर्षभरातील कार्यक्रम व्यवस्थितपणे, उत्स्फूर्तपणे पार पाडले. सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी वसतिगृहाची मूल्ये व परंपरा जतन करून बंधुभावाचे व खेळीमेळीचे वातावरण ठेवले त्यामुळे ते अभिनंदनास पात्र आहेत.

**विद्यार्थिनी वसतिगृह प्रमुख**
**प्रा. डॉ. सौ. मालती जावळे**

**विद्यार्थी वसतिगृह प्रमुख**
**प्रा. डॉ. एस. एस. राणे**



## स्टॉफ ॲकेडमी

प्राध्यापकांना आपल्या स्वतःच्या विषयाखेरीज इतर विषयांचीही अद्ययावत माहिती असावी, याद्दृष्टीने स्टॉफ ॲकेडमी
द्वारा विविध विषयातील तज्ञ व्यक्तिंची व्याख्याने सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात आयोजित करण्यात आली.
स्टाफ ॲकेडमीचे उद्घाटन माननीय भाईसाहेब वाय. एस. महाजन व प्राचार्य डी. एस. नेमाडे यांचे अध्यक्षतेखाली
संपन्न झाले. उद्घाटनपर भाषणात मा. भाईसाहेबांनी बरट्रांग रसेल यांच्या तत्वज्ञानाची सखोल माहिती दिली.

''शिस्तभंगाची कारवाई'' या विषयावर मा. आर. डी. राणे, प्राचार्य अण्णा साहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय,
जळगाव यांचे व्याख्यान झाले. नोकरी करीत असतांना अनुशासन पालनाचे महत्व त्यांनी सांगितले. प्रा. शामकान्त
कुलकर्णी, मु. जे. महाविद्यालय, जळगाव यांनी कौटिल्य अर्थशास्त्राचा आधुनिक संदर्भ या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान
दिले. कौटिल्य अर्थशास्त्राची व्यापकता या विषयी त्यांनी महत्वपूर्ण माहिती दिली.

''हृदय विकार व ध्यान धारणा'' या विषयावर डॉ. जे. बी. राजपूत हृदय रोग तज्ञ, जळगाव यांनी मूलभूत
माहिती सांगितली. हृदयाचे कार्य कसे चालते?, रक्तदाब म्हणजे काय?, हृदय विकाराचा झटका येणे म्हणजे काय?
या विषयी त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत विवेचन केले. सध्याच्या धकाधकीच्या व तणावाच्या काळात ध्यान धारणेचे
महत्व या विषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम आयोजनासाठी मा. प्राचार्य, डी. एस. नेमाडे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच वेळोवेळी सर्व प्राध्यापक
बंधु भगिनींनी उत्स्फूर्त सहकार्य केले. सर्वांचे स्टॉफ ॲकेडमी तर्फे आभार.

**चेअरमन**
**डॉ. एस. एस. राणे.**

## वादविवाद मंडळ (कनिष्ठ महाविद्यालय)

१९९५-९६ या वर्षाचा वादविवाद मंडळाचा अहवाल सादर करतांना मला विशेष आनंद वाटत आहे. औरंगाबाद
येथे सप्टेंबर ९५ मध्ये लोकमत टाइम्स वादविवाद स्पर्धा झाल्यात या खुल्या स्पर्धेत अकरावीतील धनंजय देशपांडे
आणि सचिन कासट यांच्या संघाने ढाल मिळवून धनंजय देशपांडे यास प्रथम क्रमांकाचे वैयक्तिक पारितोषिकही मिळाले.
तसेच २ ऑक्टो. ९५ ला जयहिंद महाविद्यालय धुळे येथे म. गांधी वक्तृत्व स्पर्धेत कु. कांचन मुजुमदार एफ.वाय.बी.
आणि स्वरूपा बाविस्कर एफ.वाय.बी.एस्सी. यांच्या संघाने ''माझ्या स्वप्नातील भारत'' या विषयावर आपले विचार
मांडून प्रथम क्रमांकाची ढाल मिळवली व कांचन मुजुमदार हिला वैयक्तिक द्वितीय क्रमांकाचे पारितोषिकही मिळाले.
दि. १ ऑक्टो. ९५ रोजी मालेगांव येथे 'कर्मवीर भाऊसाहेब हिरे आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत धनंजय
देशपांडे यास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. दि. ८ जाने. ९६ रोजी नाशिक येथे ''गो. ह. देशपांडे स्मृति''
वादविवाद स्पर्धेत धनंजय देशपांडे आणि वैदेही घाणेकर यांच्या संघाने प्रथम क्रमांकाची सांघिक ढाल मिळविली व
धनंजय देशपांडे यास वैयक्तिक प्रथम क्रमांकाचे रू. १००१ चे पारितोषिकही मिळाले.

अशा प्रकारे मु. जे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वादविवाद व वक्तृत्व यात घवघवित यश मिळविले आहे.

**प्रा. सौ. सुजाता देशपांडे**

## मागासवर्गीय समिती
## (एस.सी.एस.टी.एन.टी.ओ.बी.सी. समिती)

मागासवर्गीय समितीचे उद्घाटन दि. ३१।८।९५ रोजी महाविद्यालयात डॉ. एस. पी. ननीर (सहा. संचालक उच्च शिक्षण) जळगांव यांचे हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डी. एस. नेमाडे यांनी भुषविले.

आपले मनोगत व्यक्त करतांना डॉ. ननीर यांनी या महाविद्यालयात मागासवर्गीय विद्यार्थ्याचे शैक्षणिक तसेच आर्थिक व अभ्यासविषयक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने अगदी जागरूकपणे प्रयत्न केला जातो याबाबत गौरवोद्‌गार काढले. कै. अण्णाभाऊ साठे यांच्या ७५ व्या जयंतीनिमित्ताने डॉ. ननीर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

चेअरमन
प्रा. दिलीप चव्हाण.

सदस्य- १) प्रा. एस. एस. सावळे २) प्रा. एस. एन. तायडे ३) प्रा. कु. के. पी. नंदनवार ४) प्रा. एन. एस. बोरसे
५) प्रा. व्ही. व्ही. बिऱ्हाडे

## नियोजन मंडळ (वरिष्ठ महाविद्यालय)

१९९५-९६ या वर्षात नियोजन मंडळातर्फे दि. २३।८।९५ रोजी प्रा. सौ. मंगला जंगले, प्राचार्य एस.एन.डी.टी. जळगाव यांचे व्याख्यान आयोजित केले होते. तसेच एन्रॉन प्रकल्पाचे अर्थशास्त्र या विषयावर विद्यार्थ्यांचे चर्चासत्र आयोजित केले होते. तसेच शिक्षक दिनानिमित्त उपयोजित अर्थशास्त्र या विषयावर लेख लिहून त्यांचे वाचन करण्यात आले. नियोजन मंडळाला डॉ. एस. डी. जोशी, प्रा. सौ. शोभा नेमाडे, प्रा. डी. सी. चव्हाण, प्रा. एम. एम. बडवे, प्रा. बोरसे यांचे बहुमुल्य सहकार्य लाभले.

चेअरमन
प्रा. सौ. एस. टी. विराजदार

## कलामंडळ - (कनिष्ठ महाविद्यालय)

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांमध्ये कला अभिरूची निर्माण करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी या शैक्षणिक वर्षातही कलामंडळाची स्थापना करण्यात आली.

या वर्षाच्या कलामंडळाचे उद्घाटन श्री. अरूण नारखेडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यांनी मुलांना मार्गदर्शन केले. ''अंत:मनाची पेटवू ज्योत'' असा संदेश त्यांनी दिला. इतकेच नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये



सत्य, शील आदी सद्गुणांची जोपासना विद्यार्थ्यांनी कशी करावी त्याविषयी मार्गदर्शन केले. तसेच १२ वीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन व्हावे म्हणून या विषयावर प्रा. डॉ. एम. ए. झांबरे यांचे भाषण आयोजित करण्यात आले होते. तसेच इंग्रजी विषयाच्या नविन प्रश्नपत्रिकेच्या भूमिकेवर डॉ. अ. नि. माळी. प्राचार्य, प्रताप महाविद्यालय, अमळनेर आणि त्यांच्या महाविद्यालयात इंग्रजी विषयाची कार्यशाळा आयोजित केली होती. तसेच श्री गणेश रोटे यांनी ''माझी लेह मोहिम'' या विषयावर सायकल वरून केलेल्या प्रवासातील आठवणी सांगितल्या, तसेच नादर खान नागपुरकर यांचे जादूचे प्रयोग, अंताक्षरी, गीतगायन या सारखे मनोरंजनाचे कार्यक्रम करण्यात आले.

प्रा. एन. डी. चौधरी
अध्यक्ष

कलामंडळ
प्रा. आर. बी. चौधरी, प्रा. एस. एम. रडे, प्रा. पी. एच. चौधरी, प्रा. व्ही. व्ही. बिऱ्हाडे

## विज्ञानमंच अहवाल

विज्ञानमंच 'अ' गटाचे उद्घाटन दि. १७।९।९५ रोजी प्राचार्य एम. ए. झांबरे यांचे हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सदानंद कुपेरकर, जिल्हा शिक्षणाधिकारी जळगांव आणि मु. जे. महाविद्यालयाचे प्राचार्य नेमाडे सर राटे. श्री. कुपेरकर यांनी विज्ञानमंचाचे महत्व समजावून सांगितले. तर प्राचार्य नेमाडे यांनी विज्ञाननिष्ठा जागृती कशी होईल याबद्दल बोधप्रद भाषण केले. प्रारंभी समन्वयक प्रा. ए. जे. चौधरी यांनी विज्ञानमंच या उपक्रमाची माहिती दिली सूत्र संचालन प्रा. सोमवंशी यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. जे. डी. नारखेडे यांनी केले.

'अ' गट शहरी विभागातील विद्यार्थ्यांना नवनवीन प्रयोग करण्याची संधी दिली गेली. शैक्षणिक माहिती देणारे चित्रपट दाखवण्यात आलेत. तसेच अत्याधुनिक वैज्ञानिक माहिती देण्यासाठी वरीष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील अनुभवी, तज्ञ प्राध्यापकांची भाषणे आयोजित करण्यात आलीत, 'अ' गट विज्ञान मंचाचा समारोप २४।२।९६ रोजी करण्यात आला.

विज्ञानमंच 'ब' गट ग्रामीण भाग: या गटाचे उद्घाटन दि. २९।१०।९५ रोजी प्राचार्य नेमाडे यांचे हस्ते संपन्न झाले. या गटाचे शिबीर ८ दिवस चालले. वैज्ञानिक कारखाने, नवनवीन माहिती देणारे चित्रपट, आणि प्रत्यक्ष अनुभूती आणून देण्यासाठी प्रात्यक्षिक प्रयोग ही या शिबीरातील कार्यक्रमांची वैशिष्ट्ये होती. विद्यार्थी रस घेऊन सर्व उपक्रमांना हजर असत. 'प्रश्नमंजुषा' हा कार्यक्रम तर विद्यार्थ्यांना फारच आवडला या गटाचा समारोप दि. ४।११।९५ रोजी करण्यात आला.

सर्व विज्ञान मंचाचे कार्यक्रम राबवतांना प्रा. एम. एस. झोपे, प्रा. टी. एम. भारंबे, प्रा. आर. ए. पाटील, प्रा. जे. डी. नारखेडे, प्रा. सोमवंशी, प्रा. ए. पी. पाटील, प्रा. पी. भोळे, प्रा. ए. पी. पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

प्रा. ए. जे. चौधरी
समन्वयक विज्ञान मंच

## वाणिज्य मंडळ (कनिष्ठ महाविद्यालय)

दरवर्षाप्रमाणे या शैक्षणिक वर्षातही वाणिज्य मंडळाची स्थापना करण्यात आली. या वर्षाच्या वाणिज्य मंडळाचे उद्घाटन श्री. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. आर. डी. राणे यांच्या शुभ हस्ते झाले. प्रास्ताविक भाषणात मंडळाचे अध्यक्ष प्रा. एस. ए. चौधरी यांनी वाणिज्य मंडळ निर्मिती मागील हेतू आणि भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर प्राचार्य राणे यांनी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषय किती महत्वाचा आहे,

तसेच प्रत्यक्ष माणसाच्या जीवनात अर्थशास्त्राची उपयुक्तता कशी आहे? त्याचप्रमाणे अर्थशास्त्र आणि वाणिज्यशाखा एकमेकास कसे पुरक आहेत? ते सोदाहरण सांगितले.

त्याचप्रमाणे डॉ. प्रा. ई. बी. माळी यांचे 'जीवनामध्ये वाणिज्याचे महत्व' या विषयावर मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लामले त्यातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनात वाणिज्याचा वापर कसा करता येईल ते सोदाहरण सांगितले तर 'शेअर बाजाराची तोंड ओळख' या विषयावर प्रा. एस. ए. चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. उपरोक्त कार्यक्रमात प्रा. प्र. म. चौधरी, प्रा. जीवन अत्तरदे, प्रा. एस. एम. रडे आणि विद्यार्थ्यांचे सहकार्य लामले त्याबद्दल धन्यवाद!

प्रा. एस. ए. चौधरी
अध्यक्ष
वाणिज्य मंडळ

कार्यकारी मंडळ
१) प्रा. डॉ. ई. बी. माळी, २) प्रा. के. एम. महाजन,
३) प्रा. बी. एम. चौधरी, ४) प्रा. एस. ओ. उमाळे

## युवती सभा (कनिष्ठ महाविद्यालय)

युवती सभेचे उद्घाटन जुलैच्या शेवटच्या आठवड्यात जळगावातील नामवंत स्त्रीरोग तज्ञ डॉ. शैलजा चौधरी यांच्या हस्ते झाले. ''व्यक्तिगत आरोग्य'' या विषयी त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला बहुसंख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात युवती सभेने आपल्याच कॉलेजची विद्यार्थिनी कु. सोनाली पाठक व प्रा. आर. बी. चौधरी यांचा गौरवाचा सोहळा आयोजित केला होता. कु. सोनाली पाठक ही बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत बोर्डात इतिहास या विषयात प्रथम आली. तिला कॉलेजची आठवण म्हणून युवती सभेने सरस्वतीची मूर्ति भेट दिली. त्याचप्रमाणे प्रा. आर. बी. चौधरी यांचा ही यथोचित गौरव करण्यात आला. कु. सोनालीने 'अभ्यास कसा करावा?' या विषयी आपले विचार मांडून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. प्रा. आर. बी. चौधरी यांनी कु. सोनालीचे अभिनंदन करून विद्यार्थी कसा असावा या विषयी मनोगत व्यक्त केले.

सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात रोचक असा ''अंताक्षरी'' चा करमणूकीचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता प्रमुख पाहुण्या म्हणून जळगावातील ख्यातनाम गायिका श्रीमती सुवर्णा दातार होत्या. कार्यक्रमात त्यांनी स्वत: दोन गाणी म्हटली. प्रा. लता पाटील यांनीही गाणी म्हटली. कार्यक्रमाला मुलींनी स्तुत्य असा प्रतिसाद दिला. कार्यक्रमाला प्रा. रेखा मुजूमदार, प्रा. पी. बी. चौधरी, प्रा. तळेले यांनी परीक्षक म्हणून काम करून सहकार्य केले.

दिवाळीच्या सुटीत युवती सभेने विद्यार्थिनींची ''गोवा-सहल'' आयोजित केली होती. पैठण, जायकवाडी, पंढरपूर, कोल्हापूर, गोवा, गणपतीपुळे, पुणे, शिंगणापूर, महाबळेश्वर, नेवासा इ. स्थळांना भेटी दिल्या गेल्या.

जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात मुलींचा करमणूकीचा कार्यक्रम करण्यात आला त्यात गीत-गायन, रेकॉर्ड डान्स, शास्त्रीय नृत्य, फनी गेम व त्याचबरोबर रांगोळी प्रदर्शन व हस्त कौशल्याच्या वस्तुंचे प्रदर्शन भरविण्यात आले.

युवतीसभेच्या सर्वच कार्यक्रमांना मुलींनी अतिशय स्तुत्य असा प्रतिसाद दिला.

युवतीसभा अध्यक्षा,
प्रा. सौ. उषा सावंत.

कार्यकारिणी सदस्या
१) प्रा. सौ. उषा सावंत, २) प्रा. सौ. ललिता वाणी, ३) प्रा. सौ. लता पाटील,
४) प्रा. सौ. रेखा मुजूमदार, ५) प्रा. कु. करूणा संपकाळे.



# प्राध्यापकांचे विशेष कार्य

**१. डॉ. आर. टी. चौधरी**

Guided following two candidates of M.Phil (Physics) degree, awarded by the North Maharashtra University, Jalgaon, in 'A' Grade.

i) Prof. D. M. Nerkar for the work on "Thermoluminescence of x-irradiated thallium activated sodium bromide phosphors."

ii) Prof. D. R. Patil for the work on "Trap-depths and centres associated with various thermal glow peaks in thallium doped potassium bromide."

- पी. ओ. नहाटा महाविद्यालय, भुसावळ येथे पदव्युत्तर (भौतिकशास्त्र) वर्गासाठी अभ्यागत व्याख्याता.
- Member of the committee for framing F.Y.B.Sc. (Physics) syllabus of N.M.Univ., Jalgaon.

**२. प्रा. शामकांत कुलकर्णी**

पुणे येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात पुढील निबंधांचे वाचन

१) ''कौटिलीय अर्थशास्त्रातील प्रादेशिक प्रशासन व्यवस्था''

२) ''प्राचीन भारतातील बौध्दिक नेतृत्व''.

**३. डॉ. इ. एम. वाठ**

- Guided following two candidates of M.Phil (Zoology) degree, awarded by the North Maharashtra University, Jalgaon, in 'A' Grade.

i) Miss. Bharti Talele for the work on ''Studies on some aspects of biology of fresh water snail melonoides- Lineatas.''

ii) Prof. Madhusudan Bauskar for the work on ''Studies on some aspects of biology and physilogy of crab- pararefluza jaguemonti''.

- B.O.S. Member in Zoology, for five years, Amaravati university.
- Member of Syllabus committee for Zoology
Member of ''Annual reports committee,'' NMU, Jalgaon.

**४. डॉ. इ. एम. वाठ**
**प्रा. सौ. यु. एस. मानुधने**

- Accepted a research paper entitled "Roll of calcium in the shall regeneration of smail malenoides lineatus (Gray)" for prublication in

the National Environmental science Academy Journal, New Delhi.

५. डॉ. आर. टी. महाजन

Guided Prof. S. S. Patole, a candidate of M.Phil (Zoology) degree, awarded by the N.M.U. Jalgaon for the work on "Fish toxicqnts of plant orgin."

Participated in the seminar organized by public information deresctorate, CSIR, New Delhi on Medicinal Plants.

Accepted a research paper entitled "Antifertility agents of plant orgin" for publication in the journal of medicine and medicinal plants, Haridwar.

• Delivered guest lectures on :

i) Enzymology at P. G. Dept. of microbiology, Amaravati Univ., under UGC fellowship scheme.

ii) Clinical investigodion and toxicology, at Dept. of chemistry, Nahata College, Bhusawal.

६. प्रा. एस. एस. राजे

"Performance evaluation of stock exchanges in India" a research project sanctioned by U.G.C. New Delhi.

७. प्रा. एस्. एस्. राजे

प्रा. एम. पी. जोशी

Research Paper entitled "Consumer awarness of Eco-friendly packages." accepted for presentation in the 4th international environment conference, New Delhi.

८. प्रा. एम. पी. जोशी

Research paper entitled

i) "Commercial object of theater in the 2nd half of the 20th century". accepted for presentation in the 4th international conference of Eropeon theater, Germancy.

ii) "Managerial diffusion and influence of ancient Greek theatre throughout the world" accegled for presentation in the 5th international conference on European theater, Greece.

९. प्रा. वाय. ए. सैंदाणे

Passed C.A. Examination in May 1995.



१०. प्रा. जे. जी. मगर

"Study of isozymes variation in some varieties of desi cotton, G. arborum L through starch Gel electrophoresis," a research project sanctioned by U.G.C., New Delhi.

११. **Prof. S. N. Bharambe**

Dept. of Geography -

i) Indian Institute of Geographer च्या वार्षिक चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंध वाचन (१४ ते १६ एप्रिल, १९९६)

"Land Resource & Population in Jalgaon district" A geographical analysis.

ii) महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषदेच्या "भूगोल संशोधन पत्रिकेत

"A Spatio tempural study of Crop-diversification in Khandesh" हा शोधनिबंध प्रसिध्द Vol-VII, No.-2, Dec.

१२. प्रा. डॉ. सौ. वासंती साळवेकर

महाराष्ट्र शासनाच्या विद्यमाने महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीच्या सदस्या म्हणून प्रा. डॉ. वासंती साळवेकर (हिंदी विभाग) यांची नियुक्ती झालेली आहे.

१३. प्रा. डॉ. एस. ए. बाहेकर -

इतिहास - "शिंदखेडचे जाधव आणि त्यांचे मराठ्यांच्या इतिहासातील कार्य" (१५७० ते १७१०) या विषयावर डॉ. एस. आर. कायंदे, प्रताप महाविद्यालय अमळनेर यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून उ.म.वि. जळगांव पहिली पी.एच.डी. पदवी प्राप्त केली. तसेच अखिल भारतीय इतिहास परिषद ९५ - युगांतर शिक्षण संस्था सिव्हील टाईम्स नागपूर द्वारा आयोजित अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या अधिवेशनात "लखुजी जाधवराव आणि शहाजी भोसले यांचे संबंध" हा शोध निबंध सादर केला.

१४. प्रा. डॉ. जे. एन. चौधरी -

गणित या विषयात पीएच.डी. प्राप्त झाली.

१५. प्रा. जे. एम. अग्रवाल -

वाणिज्य शाखेतील एम.फील प्राप्त झाली.

१६) प्रा. एस. एम. जावळे (प्राणीशास्त्र) -

Presumted the paper in the confermance of AEB at Agricllture University Hydrabad. The effect of cisterum noeturnum extract on cockroacl pereplaneta americance.

# सन १९९५-९६ या वर्षासाठी विविध शिष्यवृत्ती मिळविणारे मानकरी

| अ.क्र. | पारितोषिकाचे/ शिष्यवृत्तीचे नांव | तपशील | रू. | शिष्यवृत्ती/ पारितोषिक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे नांव |
|---|---|---|---|---|
| ०१. | खेर गंभीरमल पारितोषिक | सर्वोत्कृष्ट विद्यार्थी | २७५ | समदाणी श्वेता वल्लभदास |
| ०२. | पी. व्ही. रत्नपारखी पारितोषिक | प्रथम वर्ष कला आणि विज्ञान या दोन्ही शाखातून महाविद्यालयातून सर्व प्रथम येणारा विद्यार्थी | २८६ | मोहकर अनिल आत्माराम |
| ०३. | डॉ. के. व्ही. पराडकर पारितोषिक | १२ वी विज्ञान या परीक्षेत जीवशास्त्र या विषयात सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ५५ | १) लहेरी आरवा फिरोज<br>२) शेख रूखसाना नूर मो. |
| ०४. | फाऊंडर मेंबर नानासाहेब दावलभक्त पारितोषिक | १२ वी विज्ञान परीक्षेत जीवशास्त्र (बी ग्रुप) घेऊन सर्वाधिक गुण मिळविणारा व वैधकीय शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास | १२० | पाटील हेमंत अशोकराव |
| ०५. | डी. यु. वाणी पारितोषिक | १२ वी विज्ञान या परीक्षेत गणित या विषयात सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ५५ | कुलकर्णी शिरीन विलास |
| ०६. | डी. आर. नाडकर्णी पारितोषिक | १२ वी विज्ञान या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | ५५ | पाटील हेमंत अशोकराव |
| ०७. | तापीराम भगवान चौधरी आणि रमाबाई चौधरी (थोरगव्हाण) पारितोषिक | १२ वी विज्ञान या परीक्षेत महाविद्यालयातून सर्व प्रथम येणारा विद्यार्थी | ५५ | पाटील हेमंत अशोकराव |
| ०८. | वि. वा. गंधे आणि सत्यभामा गंधे पारितोषिक | तृतीय वर्ष कला (मराठी स्पे.) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ३१९ | कु. नेरकर स्वाती नरेंद्र |
| ०९. | प्रा. म. ना. अदवंत शिष्यवृत्ती | तृतीय वर्ष कला (मराठी स्पे.) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ७७ | कु. नेरकर स्वाती नरेंद्र |
| १०. | नर्मदाबाई नवलराम पाटील पारितोषिक | तृतीय वर्ष कला (मराठी स्पे.) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक (अॅग्रीगेट) गुण मिळविणारा विद्यार्थी | २२० | कु. नेरकर स्वाती नरेंद्र |
| ११. | रामभाऊ प्रभुदेसाई पारितोषिक | तृतीय वर्ष कला (मराठी प्रधान) द्वितीय व तृतीय वर्षातील मराठी या विषयांत (अॅग्रीगेट) गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | कु. नेरकर स्वाती नरेंद्र |
| १२. | बारजीभे शिष्यवृत्ती | १२ वी कला परीक्षेत इंग्रजी या विषयांत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | कु. पाठक सोनाली अशोक |
| १३. | सौ. शांताबाई पाटील शिष्यवृत्ती | उच्च माध्य. (१२ वी) कला परीक्षेत सर्व प्रथम येणारा आणि याच महाविद्यालयात प्रथम वर्ष कला या वर्गात प्रवेश घेणारा विद्यार्थी | ५५ | पाठक सोनाली अशोक |
| १४. | तापीराम भगवान चौधरी आणि. रमाबाई चौधरी (थोरगव्हाण) पारितोषिक | १२ वी कला परीक्षेत महाविद्यालयातून सर्व विद्यार्थिनीत सर्व प्रथम येणारी विद्यार्थिनी | ५५ | पाठक सोनाली अशोक |
| १५. | सौ. लीला महादेव अदवंत पारितोषिक | उच्च माध्य. (१२ वी) कला या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | सोनवणे सुदर्शनकुमार सुरेशकुमार |
| १६. | सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | महाविद्यालयातून ११ वी कला या वर्गात प्रवेश घेणारा विद्यार्थी व इ. १० वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा | १२५ | कु. सोनवणे संगीता धनराज |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७. | सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | १२ वी वाणिज्य या परीक्षेत महाविद्यालयांत सर्वाधिक गुण मिळविणारा व प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गात याच महाविद्यालयात प्रवेश घेणारा विद्यार्थी | १२५ | सोमानी सचिन सुरजमल |
| १८. | पाटील पोतनीस पारितोषिक | १२ वी ते पदव्युत्तर वर्गामधील उत्तम चारित्र, वर्तणूक व चांगली शैक्षणिक पात्रता असणारा (अपेक्षित पण आवश्यक नाही) महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना कॉलेज मेस मध्ये स्वतःच्या मदतीसाठी काम करणारा विद्यार्थी | ११० | योग्य उमेदवार उपलब्ध नाही |
| १९. | विमल पिता भोजू चौधरी पारितोषिक | तृतीय वर्ष विज्ञान (प्रधान रसायनशास्त्र) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारी विद्यार्थिनी | १२५ | कु. पाटील मनिषा बाबुराव |
| २०. | महादेव काशिनाथ थत्ते पारितोषिक | तृतीय वर्ष विज्ञान (केमिस्ट्री प्रिन्सिपल) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी (विदाऊट बॅकलॉग) | ११० | सोनवणे अनिल छगन |
| २१. | सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) | उच्च माध्य. (१२ वी विज्ञान) या परीक्षेत महाविद्यालयात सर्वाधिक गुण मिळविणारा व प्रथम वर्ष विज्ञान याच महाविद्यालयात प्रवेश घेणारा विद्यार्थी | १२५ | कु. मिरूड डोझी कृष्णा |
| २२. | प्रा. अं. ग. चिपळूणकर पारितोषिक | तृतीय वर्ष कला (इंग्रजी) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा व याच महाविद्यालयात एम.ए. (इंग्रजी) वर्गात प्रवेश घेणारा विद्यार्थी | ११० | पाटील राजेश पंढरीनाथ |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३. | सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | या महाविद्यालयात ११ वी विज्ञान या वर्गात प्रवेश घेणाऱ्या व शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | १२५ | कु. पाटील स्वप्ना लक्ष्मण |
| २४. | मनुभाई देसाई पारितोषिक | या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्यांमध्ये शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | कु. पाटील स्वप्ना लक्ष्मण |
| २५. | सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | या महाविद्यालयात ११ वी वाणिज्य या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | १२५ | १) साखला धरमकुमार किशोरकुमार<br>२) शिंपी विनायक अरूण |
| २६. | सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | तृतीय वर्ष वाणिज्य या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | १२५ | बाफना राजेश सज्जनराज |
| २७. | कै. बाबुराव लेले | तृतीय वर्ष कला या परीक्षेत इंग्रजी (आवश्यक) या विषयात महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | पाटील गणेश डिगंबर |
| २८. | सौ. लीला महादेव अदवंत पारितोषिक | प्रथम वर्ष कला या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | नारखेडे दिपक रमेश |
| २९. | शरद डी. प्रधान पारितोषिक | तृतीय वर्ष विज्ञान संख्याशास्त्र (प्रधान) या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | झांबरे सुनिल जनार्दन |
| ३०. | डॉ. शं. रा. पुणतांबेकर पारितोषिक | तृतीय वर्ष कला या परीक्षेत हिंदी (प्रधान) विषय धरून सर्वाधिक गुण मिळविणारा (अॅग्री मार्कस्) विद्यार्थी | २२० | बेलदार संजय काशिनाथ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१. | प्रा. मो. स. भावे पारितोषिक | प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गातून वार्षिक परीक्षेत अर्थशास्त्र या विषयात सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | १०१ | देठीया नितेश कांतीलाल |
| ३२. | प्रा. मो. स. भावे पारितोषिक | तृतीय वर्ष कला या वर्गातून अर्थशास्त्र हा विषय विशेष विषय घेऊन (द्वितीय व तृतीय वर्षातील अर्थशास्त्राचे एकूण पेपर) सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | १०१ | चव्हाण विठ्ठल भुरलाल |
| ३३. | प्रा. मो. स. भावे पारितोषिक | एम.ए. अर्थशास्त्र (संपूर्णस्तर) या वर्गातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | २०१ | मोहता शर्मिष्ठा गोपाळ |
| ३४. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | एम.ए. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | ५०१ | बावस्कर संजीव पंडीत |
| ३५. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | एम.ए. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थिनी | ५०१ | कोल्हे शैलजा विठ्ठल |
| ३६. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | एम.एस्सी. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | ५०१ | किरंगे दिनेश भानुदास |
| ३७. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | एम.एस्सी. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थिनी | ५०१ | कु. रडे प्रिती भानुदास |
| ३८. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | एम.कॉम. वर्गात सर्वप्रथम येणारा | ५०१ | पाटील वामन तुकाराम |
| ३९. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | एम.कॉम. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थिनी | ५०१ | कु. जोशी शिल्पा शशीकांत |
| ४०. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | बी.ए. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | २५१ | कुलकर्णी प्रभाकर सितारामपंत |
| ४१. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | बी.ए. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थिनी | २५१ | कु. शिरसाठ अर्चना किसन |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४२. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | बी.एस्सी. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | २५१ | झांबरे सुनिल जनार्दन |
| ४३. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | बी.एस्सी. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थिनी | २५१ | कु. पाटील मनिषा बाबुराव |
| ४४. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | बी.कॉम. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | २५१ | बाफना राजेश सज्जनराज |
| ४५. | घन:शाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक | बी.कॉम. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थिनी | २५१ | कु. राठोरे कांता पी.आर.सिंग |
| ४६. | सौ. स्मिता व प्रा. अरविंद ग. कर्णिक पारितोषिक | महाविद्यालयात टी.वाय.बी.एस्सी. प्राणिशास्त्र या विषयात पहिला येणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी | १०० | कु. मन्सुरी शबाना नझीर |
| ४७. | कै. शरदचंद्र दामोदर पाटील पारितोषिक | तृतीय वर्ष बी.एस्सी. वनस्पतीशास्त्र (प्रमुख) या विषयात सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी/विद्यार्थिनीस | २०० | कु. जैन वनिता पुनमचंद |
| ४८. | प्रा. एल. एन. पाटील पारितोषिक | बी.एस्सी. (केमिस्ट्री प्रिन्सिपल) या विषयात महाविद्यालयातून सर्व प्रथम येणारा/ येणारी विद्यार्थी/ विद्यार्थिनी व याच महाविद्यालयात एम.एस्सी. (ऑर्गनिक केमिस्ट्री) या वर्गात प्रवेश घेणारा/ घेणारी विद्यार्थी/ विद्यार्थिनी | ५०० | योग्य उमेदवार उपलब्ध नाही |
| ४९. | गुरू-मातृ-पितृ-स्मृती एम.डी. वाणी पारितोषिक | इ. १२ वी सायन्स मध्ये महाविद्यालयातून सर्व प्रथम येणारा विद्यार्थी | १०० | पाटील हेमंत अशोकराव |

● प्रकाशक
**प्राचार्य डी. एस. नेमाडे**
मुलजी जेठा महाविद्यालय, जळगाव ४२५००२

● मुद्रक
**आनंद प्रिंटर्स**
११५/५, जिल्हा पेठ, जळगाव ४२५००१ दूरध्वनी २९०१४

● टाईपसेटींग
**अक्षरमुद्रा**
५१, पहिला मजला, भिकमचंदजी जैन मार्केट, जळगाव दूरध्वनी २४६३०, २४७१६